(१)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०६/२००९

**अभिनंदन ठराव क्र. ०१ :-**

अभिनव शेतकरी शिक्षण संस्थेला डिग्री इन फार्मसी, डिग्री इन इंजिनिअरींग, पोस्ट ग्रॅज्युएशन, डिग्री व मास्टर इन बिझीनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर इन कॉम्प्युटर ॲप्लीकेशन या तांत्रिक कॉलेजना केंद्रशासनाकडून परवानगी प्राप्त झालेली आहे. त्याबद्दल व अभिनव शेतकरी शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रफुल्ल काशिनाथ पाटील यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे श्री. प्रफुल्ल काशिनाथ पाटील यांच्या ग्लोबल ट्रस्टला मिलेट्री स्कुल व अँजल सोसायटीला पायलट प्रशिक्षण कॉलेजची परवानगी मिळाली आहे. त्याबद्दल ही त्यांचे मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे अभिनंदनाचा ठराव मांडत आहे. तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी यांचे उमेदवार डॉ. संजिव गणेश नाईक हे ठाणे लोकसभा मतदारसंघातुन प्रचंड मताधिक्याने खासदार म्हणून निवडून आलेले आहेत. त्याबद्दल त्यांचे मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर.** **अनुमोदन :- श्रीम. उमा पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०६/२००९

**अभिनंदन ठराव क्र. ०२ :-**

बहुजन विकास आघाडी यांचे उमेदवार श्री. बळीराम जाधव हे वसई – पालघर लोकसभा मतदारसंघातुन प्रचंड मताधिक्याने खासदार म्हणून निवडून आलेले आहेत. त्याबद्दल त्यांचे मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. राजु भोईर** **अनुमोदन :- श्री. मोहन जाधव**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०६/२००९

**प्रकरण क्र. ०१ :-** दि. १०/१०/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०३ :-**
दि. १०/१०/२००८ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०६/२००९

**प्रकरण क्र. ०२ :-** **केंद्रशासनाच्या JNNURM कार्यक्रमाअंतर्गत परिवहन सेवेकरीता २५० बसेस खरेदी करणेकरीता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत व अनुदानाकरीता सदर प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे अग्रेसीत करणेबाबत.**

**संदर्भ :-** **मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०५/२००९ रोजी पारित झालेला ठराव क्र. ०१ प्रमाणे.**

**ठराव क्र. ०४ :-**

केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमाअंतर्गत शहरी भागातील पायाभूत सुविधा करीता प्रकल्पांना केंद्र व राज्य शासनामार्फत अनुदान देण्यात येते. या योजनेअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका सुद्धा नागरी संकुलनासमवेत समाविष्ट करण्यांत आलेले आहे. केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमाअंतर्गत न्यू दिल्ली येथे झालेल्या बैठकीमध्ये शहरी दळणवळण "अर्बन ट्रान्सपोर्ट" या सदराखाली पब्लीक ट्रान्सपोर्ट करीता बसेस घेण्याचा प्रस्ताव अनुदानास प्राप्त ठरवू शकतो. या चर्चेच्या अनुषंगाने मिरा भाईंदर परिवहन सेवेकरीता एकूण २५० बसेस खरेदी करण्याचा प्रस्ताव व त्याप्रमाणे सविस्तर अहवाल केंद्र सरकारकडे सादर करणे संयुक्तीक ठरणार आहे. सरासरी एक बस खरेदी करण्याकरीता रु. २५ लक्ष (प्रत्यक्ष बस खरेदी करतेवेळीचे बाजार मूल्यानुसार होणारी रक्कम) खर्च येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सुमारे रु. २५ लक्ष इतकी आदारभूत किंमत घेवून एकुण २५० बसेस खरेदी करण्याकरीता रु. ६२.५० कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे. याबाबत केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमाअंतर्गत अनुदानाकरीता सविस्तर तांत्रिक तपशिलासह प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करुन त्यांचे मार्फत सविस्तर अहवाल तयार करण्यात येईल. तद्नंतर प्रकल्प अहवाल राज्य स्तरीय समन्वय संस्था एम.एम.आर.डी.ए. यांच्यामार्फत राज्य शासनास सादर करता येईल. राज्य शासनाच्या सुकाणू समितीच्या मंजुरी नंतर सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमाअंतर्गत केंद्रीय सी.एस. ॲन्ड एम.एस. यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यांत येईल. केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यास सुमारे ५० टक्के अनुदान प्राप्त होवू शकेल. (केंद्र शासनाचे ३५ टक्के व राज्य शासनाचे १५ टक्के.)

सबब प्रशासनातर्फे तांत्रिक व कायदेशीर बाबी तपासले असता योग्य असल्याचे गृहीत धरुन मिरा भाईदर शहराकरीता परिवहन सेवेसांठी एकूण २५० बसेस खरेदी करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमाअंतर्गत मंजुरीसाठी पाठविण्यात व त्यासाठी येणारा खर्च रु. ६२.५० कोटी रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

मनपाच्या चालू अर्थसंकल्पात रू. २.४० कोटीची तरतूद अअंदाज  अंदाज पत्रकातून हस्तांतरण या लेखाशिर्षाखाली केलेली आहे. या लेखाशिर्षातून JNNURM कार्यक्रमांतर्गत बसेस खरेदी करणेकरीता सल्लागार नेमून सल्लागार फी (सेवा कर वगळून) रक्कम रू. ४० लक्ष उपमुख्यलेखाशिर्षाखाली पुनरविनियोजित करण्यांत यावी. व सल्लागार फी रू. ४० लक्ष (सेवा कर वगळून) देणेस ही सभा वित्तीय मंजूरी देत आहे. सदर कामी मे. आयुक्त आणि अर्बन मास ट्रांझिट कंपनी लि. यांच्या सोबत केलेल्या करारनाम्यास देखील ही सभा मंजूरी देत आहे.

केंद्र शासनाच्या JNNURM च्या सर्वसाधारण चौकटीप्रमाणे अनुदान देताना केंद्र शासनाकडून अशी अपेक्षा केलेली असते की शहर स्तरावर काही सुधारणांचा कार्यक्रम राबविण्यात यावा. बस खरेदीसाठी अनुदान देताना केंद्र शासनाने खालील मुद्दांकरीता सुधारणा कार्यक्रम प्रामुख्याने सुचवला आहे.

अ) शहराची पार्कींग पॉलीसी, तसेच जाहिरात विषयक धोरण बनवणे.

ब) परिवहन सेवेत Intaligent Transport systam (IST) समाविष्ट करणे

क) भाड्यामध्ये सुसूत्रता आणणे.

ड) अन्य अनशांगिक सुधारणा.

केंद्र शासनाला सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) पाठवताना, ज्यामध्ये अशा सुधारणांबाबतची शहराची भूमिका कळवणे आवश्यक आहे. याबाबतचे तपशिल बऱ्याच अंशी प्रशासकीय स्वरूपाचे असल्याने ही महासभा याबाबत आवश्यकतेनुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना देत आहे.

सद्यस्थितीत केंद्रशासनाची योजना ३० जून २००९ पर्यंतच उपलब्ध आहे. केंद्रशासनाला प्रस्ताव पाठविण्याआधी MMRDA व राज्य शासनाची सहमती प्राप्त करून घेणे आवश्यक ठरेल. या योजनेबबात मंजूरी देण्यासाठी केंद्र शासनाने गठीत केलेल्या समितीची आगामी बैठक दि. २६ जून २००९ रोजी आहे. सदर बैठकीत मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाचा प्रस्ताव येण्यासाठी तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे. त्यामुळे इतिवृत्त मंजूरीची वाट न पहाता प्रशासनाने त्वरेने पुढील कार्यवाही करणेकरीता, ही सभा या ठरावाद्वारे मंजूरी देत आहे.

सूचक :-  अनुमोदन :-

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०६/२००९

**प्रकरण क्र. ०३** :- संगणकचालक व लघुलेखक यांचेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र.** :- ५

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यात आलेला आहे. संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृत्तांत तयार करणेकामी लघुलेखकांची आवशकता असल्याने मा. महासभा दि. २०/०६/२००६, ठराव क्र. २९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकेमार्फत त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दि. ०९/०१/२००८ रोजीच्या मा. महासभेत लघुलेखक व संगणक चालक यांचेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे असा विषय चर्चेस आला असता सर्व संगणक चालक व लघुलेखक यांची शैक्षणिक पात्रता व कामाची क्षमता याची माहिती घेणेसाठी एक समिती गठित करण्यात येवून त्यांचेमार्फत तसेच संगणक विषयी तज्ञ व्यक्तींमार्फत संगणक चालक व लघुलेखक यांची शैक्षणिक पात्रता व संगणक विषयीचे ज्ञान तपासून मा. महासभेपुढे अहवाल सादर करण्यात आला होता. या अहवालानुसार संगणक चालक व लघुलेखक यांना ११ महिन्यांची मुतदवाढ देण्यात आली होती. सदर मुदत दि. ३१/०५/२००९ रोजी संपलेली आहे. अस्थायी आस्थापनेवरील संगणक चालक व लघुलेखक ह्यांच्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात रु. ४० लाख इतकी तरतुद केलेली आहे.

महानगरपालिकेतील नागरी सुविधा केंद्र तसेच सर्व विभागातील संगणकावरील कामाची व्यापता पाहता संगणक चालक रु ५,०००/- प्रती महिना (२६ दिवसांकरीता) व लघुलेखक रु. ६,०००/- प्रती महिना (२६ दिवसांकरीता) या मानधनावर नेमणूक करण्यास ही सभा मंजुरी देत आहे. महानगरपालिकेने संगणक चालक व लघुलेखक यांच्या नेमणूकीबाबत पुढील कार्यवाही करावी. तसेच संगणक चालक व लघुलेखक ह्यांच्या पदनिर्मितीचा प्रस्ताव नव्याने शासनाकडे मंजुरीस्तव रितसर फेरसादर करुन शासनाकडे त्याचा पाठपुरावा करावा.

**सुचक** :- प्रफुल्ल पाटील

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**अनुमोदक** :- [illegible]

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(7)

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०६/२००९

**प्रकरण क्र. ०४ :-** दि. ०६/०४/२००९ रोजी मौजे - नवघर स.नं. २ (जुना), १९४ (नविन) हि.नं.९ भाईंदर (पु.) येथे तोडत असलेल्या इमारतीत झालेल्या अपघातात निधन झालेल्या व्यक्तिंच्या कुंटुंबियांना आार्थिक सहाय्य मिळणेबाबत.

**ठराव क्र. :-** ६

**मौजे नवघर, स.नं. २१८ (जुना), १९४(नविन) हि.नं. ९ भाईदर (पु.) (इंद्रलोक भागात)** मिरा-भाईंदर मनपाच्या सांडपाणी वाहुन नेणाऱ्या मुख्य नाल्यावर श्री. सतिश तुकाराम कदम, रा. शितलनगर, मिरारोड (पु.) यांनी तळ अ ३ मजले अनधिकृत इमारत उभी केली होती.

कायदेशीर तरतुदी पुर्ण करुन दि. ३१/०३/२००९ रोजी अभियोक्ता सौ. अनुराधा आपटे व विधी अधिकारी यांनी दिलेल्या कायदेशीर अभिप्रायानुसार दि. ०६/०४/२००९ रोजी मिरारोड पोलिस स्टेशन येथुन योग्य तो पोलिस बंदोबस्त घेवुन मनपाचे अधिकारी व कर्मचारी तसेच बांधकाम [illegible]डण्यासाठी मे. आशापुरा कंस्ट्रक्शन कंपनी कडुन तीन जे.सी.बी. १) एम.एच. -०४.५२४२ २)एम.एच.-०४.डी.टी.४३२ ३)एम.एच.-०४. व्हि.५१५० निविदेच्या करारनामा व दि. ३१/०३/२००९ च्या कार्यादेश प्रमाणे मागविण्यांत आलेले होते. सदर जे.सी.बी. मशिन ड्रायव्हर १) श्री. प्रदिप हरिभाऊ जाधव, रा. काशिमिरा २) श्री. सरवण उर्फ बबलु अशोक यादव रा. काशिमिरा व ३) श्री. शानु पुंडलिक नाईकवाडी, रा. काशिमिरा असे होते.

सदर इमारत पुर्व सुचना मिळण्यापुर्वीच स. ११.३० वाजताचे सुमारास सदर इमारत अचानक क्षणार्धात कोसळल्याने दुर्घटना घडली त्यात जे.सी.बी. ड्रायव्हर म्हणुन काम करीत असलेले १) एम.एच. -०४.५२४२ २)एम.एच.-०४.डी.टी.४३२, श्री. प्रदिप हरिभाऊ जाधव, श्री. सरवण उर्फ बबलु अशोक [या]दव रा. काशिमिरा रा. काशिमिरा हे ढिगाऱ्याखाली अडकल्याने जागीच मयत झाले आहे. सदर प्रकरणी प्रत्येक मृतांच्या नातेवाईक यांना २ लाख रु. महानगरपालिका व ठेकेदाराकडून २ लाख रु. महानगरपालिकेने घेवून सदर आर्थिक सहाय्य त्यांच्या मुलांच्या नावाने मुदत ठेवीमध्ये सज्ञान होईपर्यंत ठेवावे असा मी ठराव मांडत आहे.

तसेच मा. महासभेत मा. पत्रकार श्री. अनिल खेडेकर यांना रु ५० हजार., श्री. बाबुराय श्रीसंपत राजभर यांना रु. १ लाख व मा. पत्रकार श्री. श्यामसुंदर मालपानी यांच्या मागणीनुसार रु. १ लाख मंजुर करण्यात येत आहेत.

**सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे** **अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**महापौर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. १८/६/२००९

**प्रकरण क्र ०५ :- महानगरपालिकेच्या विविध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे कामी प्रशासकिय/ आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ०७**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मालकिची एकुण ८० वाहने असुन सदर वाहने आवश्यकतेनुसार विविध विभागात उदा.अग्नीशमन, पाणीपुरवठा, आरोग्य, रुग्णवाहिका, शववाहिनी, फिरता दवाखाना, इ. वाहनांवर स्थायी वाहनचालक याची संख्या अपुरी असल्याने ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे आवश्यक आहे. अत्यावश्यक सेवेतील वाहने दोन ते तीन पाळीत चालु असतात. सदर वाहनावर मनपाकडुन आवश्यकतेनुसार वार्षिक ठेका पध्दतीने वाहनचालक /ऑपरेटर यांचा पुरवठा करण्यात येतो.

सन २००९-१० या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकिय तरतुदीत वाहन चालक पुरवठा करणे कामी खालील प्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | लेखाशिर्ष | सन २००९-१० करीता उपलब्ध तरतुद |
|---|---|---|
| १ | अस्थायी अस्थापना ठेका वाहनचालक (सा.प्र/कर/अग्नीशमन,आरोग्य व इतर) | ४५,००,०००/- |

महानगरपालिकेकडे सध्या उपलब्ध असलेले एकुण ५४ इतके वाहन चालक आहेत. तसेच ठेका पध्दततीने गरजेनुसार वेळोवेळी लागणारे वाहन चालक मागविणे आवश्यक आहे. वार्षिक ठेकापध्दतीने वाहन चालक गरजेनुसार पुरवठा करणे कामी सन २००९-१० या वर्षात अंदाजित रु.४३,००,००० इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी मनपाच्या वाहनांवर अत्यावश्यक सेवा व इतर विभागात आवश्यकतेनुसार कंत्राटी (ठेका) पद्धतीवरील वाहनचालक/ऑपरेटर पुरवठा करणेकामी प्रसिध्द वर्तमान पत्रात वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करून संबंधितांकडुन सिलबंद निविदा मागविणेच्या व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- [signature]    अनु :- [signature]

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला.**

[signature]
मा.महापौर

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०६/२००९

**प्रकरण क्रमांक ( ०६ ) :- विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार प्राप्त होणाऱ्या ॲमिनिटी ओपन स्पेस (नागरी सुविधा क्षेत्र) या जागेत सार्वजनिक सोई उपलब्ध करणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

ठराव क्र. ( ०८ )

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने मंजूर केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार प्राप्त होणाऱ्या ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेत सार्वजनिक सोयी उपलब्ध करण्याबाबत मा. आयुक्त यांना संपूर्ण अधिकार आहेत. तथापी सदर जागेत करावयाच्या सार्वजनिक सोयीकरीता मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सर्व गटनेत्यांची ~~नियम ३१~~ समिती गठीत करण्यात येउन सदर समिती मार्फत ॲमिनिटी ओपन स्पेस मध्ये करावयाच्या सार्वजनिक सोयीबाबत व सदर सोयी कोणत्या पध्दतीने कराव्यात याबाबत अंतिम निर्णय घेण्यात यावा.

सुचक :- श्री जयंत पाटील

अनुमोदन :- श्री अनिल भोसले

^ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ नुसार

ठराव सर्वानुमते मंजूर

# मिरा-भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा सभा दि.१८/६/२००९

**प्रकरण क्रमांक ( ०७ ) भाईंदर (पूर्व) स्काय वॉक बांधणे कामातील जैसल पार्क जैन मंदिर पर्यंत स्कॉय वॉक बांधणे कामाबाबत फेर विचार करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र.** ( ०९ )

मिरा भाईदर महानगरपालिका हद्दीत मिरा रोड, भाईंदर (पश्चिम) व भाईंदर (पूर्व) येथे स्काय वॉक बांधण्याची कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित करण्यात आलेली असून सदर कामाबांबत मा. महासभा दि.१८/०९/२००८ ठराव क्र.३७ अन्वये मा. महासभेने मा. सदस्याच्या सुचनेसंह पारीत केलेला ठराव प्राधिकरणाकडे पुढील कार्यवाही करीता पाठविण्यात आलेला आहे. भाईंदर (प.) व मिरा रोड येथे स्काय वॉक बांधण्याची कामे प्रगती पथावर असून भाईंदर (प.) रेल्वे समांतर बांधावयाच्या स्काय वॉक च्या कॉलम मुळे नाल्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण होणार असल्याने सदर काम सुरु करण्यात आलेले नाही. तसेच भाईंदर (पूर्व) येथे रेल्वे स्टेशन ते केबिन रोड पर्यंतच्या स्काय वॉक चे कॉलम रेल्वेच्या जागेतून घ्यावयाचे असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला अजून पर्यंत रेल्वे प्रशासनाने परवानगी दिली नसल्याने सदर काम सुरु करण्यात आलेले नाही.

भाईंदर (पूर्व) येथे जैसलपार्क जैन मंदिर ते रेल्वे स्टेशन पर्यंत स्कॉय वॉकचे काम देखिल प्रस्तावित करण्यात आलेले आहे. तथापी जैसलपार्क येथे सबवे चे काम प्रस्तावित असून जैसलपार्क जैन मंदिर ते रेल्वे ट्रॅक पर्यंत सबवे च्या रस्त्याकरीता रस्ता खोदून उतारानुसार खाली करावयाचा असल्याने सद्यस्थितीत सदर स्काय वॉक च्या कॉलमना अड़थळा निर्माण होणार असल्याने सदर स्काय वॉक चे काम रद्द करण्यात यावे. सदर स्काय वॉक ऐवजी रेल्वे स्टेशन ते शिवसेना ऑफिस व पुढे शौचालयावरुन रेल्वे समांतर स्काय वॉक बांधण्यात यावा. तसेच केबिन रोड वरील स्काय वॉक रावळनगर पर्यंत पुढे बांधण्यात यावा.

**सुचक :-** सौ. शानू गोहिल **अनुमोदन :-** श्री मदनसिंग

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सभापती**
**स्थायी समिती**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०६/२००९

प्रकरण क्र. ९ :- श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे यांचे दिनांक १०/०६/२००९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.--- सब वे बांधणे व रेल्वे खालील कल्वर्ट बांधणे कामाबाबत.

(सदरचा विषय मा. महापौरांच्या आदेशाने फेटाळण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०६/२००९

प्रकरण क्र. १० :- सन्मा. सदस्या श्रीम. प्रभात प्रकाश पाटील यांचे दिनांक १२/०६/२००९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- मिभामनपा क्षेत्रात पालिका शाळांतील इ.८ वीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी माध्यमिक विभाग इ.८ वी ते १० सुरु करणेबाबत.

(सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करण्यात आली.)

सही/-
महापौर
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा० महासभा दि. १८-०६-२००९

**प्रकरण क्र.८ : मिरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय दप्तर,बुट व मोजे वह्या मोफत वाटप करणे बाबत.**

~~प्रशासकीय~~ ठराव क्र. १० :

मिरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षा मंडळाच्या एकूण ३४ शाळा असुन शाळेत अंदाजे एकूण ९९१० विद्यार्थी शिकत आहेत. मिरा-भाईंदर महानगरपालिका शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गोर-गरीब व आर्थिक दृष्टया दुर्बल असल्याने मोफत गणवेशा सोबत त्यांना मोफत शालेय दप्तर,बुट, मोजे व वहया उपलब्ध करून दिल्यास मनपाच्या शाळेतील मुलांचा एक प्रकारे ड्रेसकोड तयार होवून मुले निटनेटकी तसेच सुंदर दिसुन शाळेचा दर्जा उंचवण्यास त्यामुळे मदत होणार आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाकरीता सन २००९-१० या वर्षात **"लेखाशर्ष ड-१, प्राथमिक/माध्यमिक शिक्षण (४) शाळेतील विद्यार्थ्यांना वहया, पुस्तके, गणवेश, बॅच मोफत"** यामध्ये रू. २४,००,०००/- (अक्षरी रू. चौवीस लाख मात्र) शिल्लक आहेत. सदर तरतुदीतुन मुलांसाठी शालेय दप्तर, बुट, मोजे व वहया इत्यादींच्या निविदा मागवुन खरेदी करणे करीता मा. महासभा प्रशासकिय व आर्थिक मंजूरी देत आहे.

**सुचक :** Mrs. Merlyn M. D'Sa

**अनुमोदक :** नयना गजानन म्हात्रे (NGM)

ठराव सर्वानुमते मंजूर

**मा. महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०६/२००९.

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम (के) अन्वये प्रस्ताव)

**प्रकरण क्र. ११ :- मिरा-भाईंदर शहरासाठी नविन पाणी पुरवठा योजनेस मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ११ :-**

मिरा-भाईंदर शहराची वाढत्या लोकसंख्येचा विचार करीता सध्याची पाणी टंचाई व भविष्यात शहराला होणारा पाणीपुरवठा कमी पडु नये म्हणुन शहराची पाणी पुरवठा व्यवस्था सुधारण्यासाठी विविध योजना राबविणे प्रस्तावित आहे.

मिरा-भाईंदर शहराच्या विकास आराखडयानुसार शहराची लोकसंख्या ८ लाखाच्या आसपास असुन ती २०४१ साली २८ लाखापर्यंत जावू शकते. तसेच पाण्याची आवश्यकता ४३० दशलक्ष लिटर प्रतिदिन पर्यंत जाईल असे अपेक्षित आहे. सदयस्थितीत शहरास केवळ ९१ दशलक्ष लिटर प्रतिदीन इतकाच पाणीपुरवठा होत आहे. पाण्याची तीव्र टंचाई लक्षात घेवुन महानगरपालिकेने विविध जलस्त्रोतांचा शोध घेवुन प्रकल्प अहवाल तयार करणे या कामाकरिता सल्लागाराची नेमणुक केली होती. सल्लागाराने प्रस्तावित केलेल्या विविध योजनांपैकी महानगरपालिकेस सुर्या प्रकल्पातुन १०० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने दि.०४/०६/२००९ रोजीच्या पत्रानुसार मंजूर केला आहे व मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या कोटयातून १०० द.ल.लि. पाणी देण्याचे एम.एम.आर.डी.ए. ने तत्वतः मान्य केलेले आहे. असे एकूण २०० द.ल.लि. पाण्याचे आरक्षण सुर्या धरणातून मंजूर केले आहे. महानगरपालिकेच्या सल्लागाराने सदर योजनेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला असुन संपुर्ण योजनेचा खर्च रु. ७१८.०० कोटी इतका अपेक्षित आहे.

तसेच शहरासाठी मंजुर झालेले एम.आय.डी.सी. कोटयातील ३० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी व सुर्या प्रकल्पाचे प्रतिदीन २०० दशलक्ष पाणी याकरिता व शहरात विकसीत होणाऱ्या भुभागकरिता अंतर्गत पाणी वितरण व्यवस्थेत समग्र सुधारणा आवश्यक आहे. या कामासाठी महानगरपालिकेने सल्लागांराकडुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. या अहवालात जलवितरण व्यवस्था शहरात विविध क्षमतेचे जलकुंभ उभारणे तसेच जलकुंभाच्या जोडणीसाठी पाणी वितरण व्यवस्था या प्रमुख प्रकल्प घटकाचा समावेश आहे. या सर्व प्रकल्पाचा अंदाजे खर्च रु.३७५.०० कोटी इतका अपेक्षित आहे.

तसेच देशातील सदयस्थितीतील पाणीपुरवठा व्यवस्था व भविष्यात उपलब्ध होणारे पाणी व नव्याने निर्माण होणाऱ्या पाणीपुरवठा व्यवस्थांचे प्रभावी व्यवस्थापन करणे,

पाण्याचा दाब सर्व ठिकाणी समान ठेवणे, यंत्रणेची देखभाल, दुरुस्ती करणे, ठराविक काळाने यंत्रणेचे ऑडीट करणे, नागरिकांना बिल भरणा सुविधा उपलब्ध करणे, तक्रार निवारण कक्ष व यंत्रणा उभारणे याकरिता आवश्यकतेनुसार खाजगी क्षेत्राचा सहभाग व भागीदारी महानगरपालिकेस अपेक्षित आहे. जेणेकरुन वरील सुविधा पुरविण्याच्या गुणवत्तेत वाढ होवुन महानगरपालिकेच्या यंत्रणेवरील ताण कमी होईल.

मिरा - भाईंदर शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये समग्रीत सुधारणा कार्यक्रम राबविण्यासाठी खालील कार्यवाही करण्यास आवश्यक ती अधिकार प्रदान करीत आहे.

१ :- महाराष्ट्र सरकारच्या जलसंपदा विभागाने व इतर सरकारी संस्थांनी परवानगी दिलेल्या / मंजुर केलेल्या जलस्त्रोताचा व शहराच्या भविष्याच्या दुष्टीने आवश्यक अशा इतर जलस्त्रोतांचा विकास व इतर अनुषांगिक काम करुन घेण्याकरिता 'प्रशासकीय व आर्थिक मान्यता / मंजुरी देत आहे.

२ :- महाराष्ट्र सरकार व इतर सरकारी संस्थांनी मंजुर केलेल्या जलस्त्रोताचा व भविष्यात मंजुर होणाऱ्या जलस्त्रोताचा विकास व योजना राबविण्याकरिता भागीदारीतुन प्रकल्प योजना पुर्णतः राबविणे अथवा आंशिक सहभाग घेणे तसेच प्रकल्पाची देखभाल करणे याकरिता विविध सरकारी संस्थांना तसेच प्राधिकरणांना (उदा.एम.एम.आर.डी.ए., एम.आय.डी.सी) अधिकार प्रदान करणे याकरिता ही महासभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

३ :- महाराष्ट्र सरकारच्या जलसंपदा विभागाने सुर्या प्रकल्पातुन मंजुर केलेल्या २०० द.ल.लि. कोटयातील पाणी उपसा करणे, शुध्दीकरण करणे, पाणी शहरापर्यंत आणण्यासाठी वाहीनी टाकणे व इतर आवश्यक यंत्रणा उभारणे याकरिता रु.७१८ कोटी (रु. सातशे अठरा कोटी रुपये) इतक्या रकमेचा प्रकल्प अहवालास त्यातील तपशीलास व प्रकल्प घटकाला आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

४ :- सुर्या प्रकल्पातुन तसेच भविष्यात उपलब्ध होणाऱ्या जलस्त्रोताच्या अनुषंगाने तसेच शहराच्या भविष्यातील विस्तार आराखडयाच्या अनुषंगाने शहरातील अंतर्गत पाणी वितरण व्यवस्थेत समग्र सुधारणा करणे याकरिता रु.३७५ कोटी (रु.तीनशे पंचाहत्तर कोटी रुपये) इतक्या रकमेच्या प्रकल्प अहवालास त्यातील तपशीलासह प्रकल्प घटक व प्रकल्प सल्लागार नेमण्यास ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

५ :- वरील सर्व प्रकल्प योजना राबविणे व अनुषांगिक कामे याकरिता आवश्यक आर्थिक पाठबळ, अनुदान मदतनिधी व आवश्यक असल्यास कर्ज रुपाने उभारण्यास ही महासभा मान्यता देत आहे.

६ :- वरील सर्व प्रकल्प योजना व अनुषांगिक कामे राबविण्याकरिता आवश्यक तरतुदी व वित्तीय व्यवस्थापन या वर्षाच्या (२००९-१०) सुधारीत अंदाजपत्रकात तसेच भविष्यातील प्रत्येक वर्षाच्या आर्थिक अंदाजपत्रकात करण्यासाठी ही महासभा मान्यता देत आहे.

७ :- सदर काम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दरसुचीनुसार करण्यात यावे.

८ :- तसेच वरील सर्व प्रकल्प योजना आवश्यकतेनुसार ई.पी.सी. अथवा पी.पी.पी. तत्वावर व माध्यमातुन राबविणे व विकसीत करणे याकरिता ही महासभा मंजुरी देत आहे.

९ :- शहरातील जल व्यवस्थापन आवश्यकतेनुसार खाजगी क्षेत्राच्या सहभागातुन सुधारणे व देखभाल करणे याकरीता एजन्सीच्या नेमणुकीस ही महासभा मान्यता देत आहे.

१० :- शहरातील प्रकल्प आवश्यकतेनुसार पी.पी.पी तत्वावर तसेच खाजगी क्षेत्राच्या माध्यमातुन राबविण्यास आवश्यक आकृतीबंधास व प्रारुप मसुदयास त्यातील समाविष्ट अटीसह मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६(४१अ) व कलम ६६ अ अन्वये ही सभा अधिकार प्रदान करीत आहे. त्याच प्रमाणे ही महासभा आवश्यकतेनुसार खालील कार्यवाही करिता आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना ही सभा आवश्यक ती अधिकार प्रदान करीत आहे.

१) शासनाच्या परवानगीच्या अधीन राहुन विशेष हेतु यंत्रणेची निर्मिती करणे.

२) शासनाच्या परवागीच्या अधीन राहुन विशेष हेतु यंत्रणेच्या भागभांडवलामध्ये खर्च न करता घ्यावयाचा सहभाग अथवा खर्च अथवा अनुदानाद्वारे सहभाग घेणे.

३) महापालिकेचे प्रतिनीधी म्हणुन विशेष हेतु यंत्रणेच्या संचालक मंडळात संचालक म्हणुन महापौर व आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांची नियुक्ती करण्यासाठी

४) सदर विशेष हेतु यंत्रणेस निविदा / करारपत्रातील शर्तीनुसार उपलब्ध शासकीय अनुदान / अर्थसहाय्य पुरवणे

५) पाणीपुरवठा व्यवस्था सुलभरित्या कार्यवाहित राहणेसाठी आवश्यक बैठका घेणे, जनजागृती करणे

६) सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने शासनाकडे / अन्य वित्तीय संस्थांकडे शासकीय अनुदान / कर्ज प्रस्ताव याकरिता करावयाचे सादरीकरण.

७) महापालिकेच्या मालकीच्या पाणीपुरवठा केंद्राच्या मालमत्तेचे योजना व्यवस्थापनाकरिता शासनाच्या परवानगीने करावयाचे हस्तांतरण

८) शासन / मुख्य वित्त पुरवठादार यांच्या आवश्यकतेनुसार व शासन परवानगीने प्रकल्पाच्या व करारपत्राच्या अटी व शर्ती मध्ये करावे लागणारे आवश्यक फेरबदल करणे.

९) प्रकल्प कामाच्या उभारणीसाठी व सुलभीकरणासाठी आवश्यक भुसंपादन प्रस्ताव तयार करणे व भुसंपादनाकरिता आवश्यक पत्र व्यवहार करणे.

१०) वरील सर्व मुद्यांसह इतर अनुषांगिक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना ही सभा देत आहे.

सुचक :- जयंत पाटील      अनुमोदक :- प्रफुल्ल पाटील

ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०६/२००९

प्रकरण क्र. ११(अ)

<u>मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन (क) नुसार प्रस्ताव.</u>

ठराव क्रमांक ( १२ )

मिरा-भाईदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारत बांधकाम करतेवेळी फादरी तलाव भाईदर या जागेतून २५ कातकरी (आदिम जमात) व ३ अनु.जाती कुटुंबांना (सोबतच्या यादीप्रमाणे) हटविण्यात आले होते. तद्नंतर सदर कुटुंबाना महानगरपालिकेने वेळोवेळी महानगरपालिकेच्या जागेमधून हटविलेले आहे. सद्यस्थितीत सदर कुटुंबे डॉ. आंबेडकर नगर, नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान समोरील रस्ता दुभाजकात राहत असून सदर कुटुंबाना तात्पुरत्या स्वरूपात टेंभा हॉस्पीटल मधील रहिवाशांप्रमाणे भाडे तत्वावर करारनामा करून **"बेघरांना घरे"** या आरक्षणात बांधलेल्या व महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या सदनिका देण्यात याव्यात व सदर रस्ता दुभाजकातील अन्य झोपडया तातडीने काढून सदर जागा विकसित करण्यात यावी .

नयना गजानन म्हात्रे
**सुचक :- सौ. नयना गजानन म्हात्रे**

**अनुमोदन :- श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**
**मिरा-भाईदर महानगरपालिका**

## भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदाना समोरील रस्त्यातील दुभाजकात राहणाऱ्या कातकरी (आदिम जमात) व अनु. जाती कुटूंबांची यादी

१. श्रीम. मथुराबाई शिमग्या वाघे
नरु किसन वाघे

२. प्रकाश सुरेश वाघे
श्रीम. शकुंतला प्रकाश वाघे

३. राजु चैत्या वाघे
श्रीम. गुलाब राजु वाघे

४ लहू शंकर मुकणे
श्रीम. अनु लहु मुकणे

५. विष्णू शंकर मुकणे
श्रीम. पुष्पा विष्णू मुकणे

६. श्रीम. बनु गुऱ्या मुकणे

७. काळू गोपीनाथ मुकणे
श्रीम. लाडकु काळू मुकणे

८. सुरेश नवश्या वाघे
श्रीम. लाडकी सुरेश वाघे

९. सुरेश सिताराम वाघे
श्रीम. बेबी सुरेश वाघे

१०. सुनिल सुरेश वाघे
श्रीमती लक्ष्मी सुनिल वाघे

११. मारुती विठ्ठल वाघे
श्रीमती उपासना मारुती वाघे

१२. रमेश तुकाराम निंबाळकर
श्रीम. वनिता रमेश निंबाळकर

१३. लक्ष्मण जान्या वाघे
श्रीम. गिता लक्ष्मण वाघे

१४. श्रीमती सविता गोपिनाथ मुकणे उर्फ सविता बाबू मसदकर
बाबू हेमराज मसदकर

१५. बबन शंकर वाघे
श्रीम. बेबी बबन वाघे

१६. श्रीम. रेखा मधू पवार

१७. श्रीम. देवकीबाई वालक्या वाघे

१८. दिपक पांडू वाघे
श्रीम. अनिता दिपक वाघे

..2

१९. मदन बाबू मुकणे
श्रीम. बुदाबाई मदन मुकणे

२०. रवि/काळू/नागेश शिवा वाघे

२१. गणेश रमेश निंबाळकर
श्रीम. सोना गणेश निंबाळकर

२२. श्रीम. यशोदा वालक्या वाघे उर्फ जया दूर्वा गायकवाड
दुर्वा अनंता गायकवाड

२३. श्रीम. अनिता राजेश वाघे उर्फ अनिता प्रकाश परेरा
प्रकाश जॉन परेरा

२४. सुकूर कूशा म्हसकर
श्रीम. संगिता सुकूर म्हसकर

२५. सुरेश गोविंद मुकणे

१. श्री. बळवंत त्रिंबक मोहोड
सौ. छाया बळवंत मोहोड

२. ज्ञानेश्वर हेमराज मसदकर
संतोष हेमराज मसदकर (अंध)

३. श्रीमती भारती करण मसदकर

**एकुण २८**

नयना गजानन म्हात्रे
**सुचक**
**सौ. नयना गजानन म्हात्रे**
**नगरसेविका**

**अनुमोदन**
**श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर**
**नगरसेवक**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०६/२००९

**दु:खवठा ठराव १३ :-**

माजी नगरसेवक श्री. योगेश शर्मा यांचे निधन झालेले आहे. तसेच महानगरपालिकेचे कॉन्ट्रॅक्टर श्री. जगदेव यांच्या वडीलांचे निधन झालेले आहे. तसेच सन्मा. सदस्य श्री. प्रशांत पालांडे यांच्या मातोश्रींचे निधन झालेले आहे. तसेच खारी गावातील रहिवासी श्री. बाळकृष्ण महादेव पाटील यांचे दि. १५/०५/२००९ रोजी निधन झालेले आहे. तसेच आपल्या मिरा भाईंदरचे कर्मचारी श्री. तुकाराम हरिश्चंद्र पाटील यांच्या पत्नी सौ. शांतीबाई तुकाराम पाटील यांचेही दि. १६/०६/२००९ रोजी निधन झाले त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदन :- श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मा. महासभा
# दि. ०१/०७/२००९

**अभिनंदन ठराव** :- २४

मिरा-भाईंदर चे सुपुत्र, कर्मट समाजसेवक आ. मुझफ्फर हुसैन यांना महाराष्ट्र विधान परिषदेचे उत्कृष्ठ संभाषण पटूचा पुरस्कार **राष्ट्रपती, श्रीम. प्रतिभाताई पाटील** यांच्या हस्ते दि. २९/०६/२००९ रोजी प्रदान करण्यात आला. याबद्दल या सभागृहातर्फे व मिरा-भाईंदर वासियांतर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. दिनेश नलावडे

अनुमोदक :- श्री. मिलन पाटील

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/०७/२००९

**अभिनंदन ठराव क्र. १५ :-**

ठाणे लोकसभेतील नवनिर्वाचित खासदार डॉ. संजीव गणेश नाईक साहेब यांची राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पार्लमेंटमध्ये प्रतोद पदी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदनाचा मी ठराव मांडत आहे. तसेच विधानपरिषदेमध्ये आणि विधानसभेमध्ये सन्मा. आमदार सौ. मंदाताई म्हात्रे आहेत. श्री. गुरुनाथ कुलकर्णी आहेत, जेवढे आहेत, भाजपचे आहेत, शिवसेनेचे आहेत. सगळ्या लोकांना उत्कृष्ट संसदपटूचा, उत्कृष्ट भाषणाचा पुरस्कार मिळालेला आहे. अशा बारा-पंधरा लोकांची यादी आहे. त्या सगळ्यांचे या ठिकाणी सरसकट अभिनंदन करण्यात येत आहे असा मी प्रस्ताव मांडतो.

**सुचक :- श्री. आसिफ शेख** **अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/०७/२००९.

**प्रकरण क्र. १२ :- दि. २१/१०/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. १६ :-**

दि. २१/१०/२००८ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :** **अनुमोदन :-**

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/०७/२००९

**प्रकरण क्र. १३ :- वॉर्ड साफसफाई कामास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे.**
**ठराव क्र. :- १७**

**मा. आयुक्त सो. यांच्या विषया संदर्भात गोषवारा वाचन करण्यात आला.**

मिरा भाईंदर शहराची लोकसंख्या मोठ्याप्रामाणात वाढत असून उघड्यावर दैनंदिन बाजार मोठ्याप्रमाणावर भरत आहेत. शहरात शॉपिंग कॉम्प्लेक्स, मॉल, मल्टीप्लेक्स यामध्ये घनकचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. शहरामध्ये औद्योगिक वसाहत देखील मोठ्याप्रमाणात आहेत. शहराचे नागरीकरण मोठ्या प्रमाणात होत असल्याने वाढत्या लोकसंख्ये बरोबर घनकचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. वाढती लोकसंख्या, वाढते घनकचऱ्याचे प्रमाण, घरोघरी जाउन कचरा गोळा करून उत्तन येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी वाहतुक करावी लागत आहे. वाढती लोकसंख्या व वाढता घनकचरा यासर्वांचा विचार करता सध्या असलेल्या कंत्राटी मजुर व वाहनांमध्ये वाढ करावी लागणार आहे.

दैनंदिन कामात सुसुत्रता येण्याच्या दृष्टीने शहराचे २४ गटामध्ये विभाजन करण्यात आले. प्रत्येक गटामध्ये समाविष्ट केलेल्या प्रभागामधील रस्ते, गटारे, साफसफाई कामाची घनता व त्या गटातुन दररोज उत्पन्न होणारा कचरा तसेच नविन नागरी वस्तीमधील साफसफाई कामाचा व दररोज निघणारा कचरा याचा विचार करून, प्रत्येक गटाचे अंदाजपत्रक तयार करण्यास मान्यता देत आहे.

प्रभागनिहाय दैनंदिन साफसफाई ठेकेदारांमार्फत केली जात आहे. परंतु, पावसाळ्यामध्ये पावसाळ्यापुर्वी प्रभागा अंतर्गत असलेले कच्चे / पक्के नाले त्यांची देखील दर वर्षी वेगळ्या यंत्रणेमार्फत नालेसफाईची कामे करावी लागतात. प्रभागामध्ये असलेले (पावसाळ्यापुर्वी सफाई करावयाचे) कच्चे /पक्के नाले ही कामे प्रभागसफाई कामाबरोबर एकत्रित ठेका काढून करून घेतल्यास संबंधित ठेकेदारावर दोन्ही कामाची जबाबदारी निश्चित करून काम परिणामकारक होण्यास मदत होईल. नालेसफाईच्या कामाबाबत संबंधित ठेकेदारास जबाबदार धरता येईल व पर्यायाने जबाबदारी निश्चित केल्यास ठेकेदारास त्याचा धाक निर्माण होईल.

प्रभागनिहाय दैनंदिन साफसफाई व प्रभाग अंतर्गत नालेसफाई कामी एकत्रितपणे ठेकेदार निश्चित करून कामे परिणामकारक होणेस मदत होईल. शहरातील रस्ते, गटारे सफाई करणे, घरोघरी जाउन कचरा गोळा करणे तसेच कचऱ्याची वाहतुक करणे ही दैनंदिन कामे रोजच्या रोज परिणामकारक करून घेण्याच्या दृष्टीने ठेकेदारांवर बंधनकारक अशा अटी लादण्यात याव्यात. कामे परिणामकारक होतील यादृष्टीने अटी व शर्ती तयार करण्यात याव्यात.

मिरा भाईंदर महानगरपालिका पुर्वापारपासुन डंम्परद्वारे कचरा वाहतुक करण्यात येत आहे. याकामी ठेकेदार हे जुन्या पद्धतीचे उघड्या स्वरूपाचे डंपर वापरत असतात. त्यामुळे कचरा वाहतुक करतेवेळी काहीवेळा कचरा रस्त्यावर इतरस्तः पडून त्यापासुन दुर्गंधी पसरून नागरिकांना नाहक त्रास होत असतो. महानगरपालिकेने बृहन्मुंबई महापालिकेच्या धर्तीवर आवश्यकतेनुसार बंदिस्त वाहने/कॉम्पॅक्टरद्वारे कचरा उचलून वाहतुक केल्यास एका बंदिस्त वाहने/कॉम्पॅक्टर मार्फत

मोठ्याप्रमाणावर कचरा वाहतुक करता येईल. बंदिस्तवाहने/कॉम्पॅक्टरसाठी मोठ्याप्रमाणावर गुंतवणूक करावी लागणार असल्याने सदरचे टेंडर हे पाच वर्षासाठी काढणेस तसेच दैनंदिन प्रभाग साफसफाई व प्रभागा अंतर्गत येणारे नाले पावसाळ्यापुर्वी कराव्या लागणाऱ्या नालेसफाई कामाचा समावेश करून दोन्ही कामाचा एकत्रितपणे ठेका देण्याच्या कामास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे. वॉर्डप्रमाणे कर्मचारी नेमावेत व त्यांना गणवेश देण्यात यावा तसेच त्यावर वॉर्ड क्र. नोंदवावा. तसेच दैनंदिन साफसफाईचा ठेका १ वर्षासाठी द्यावा व घनकचरा व्यवस्थापन ५ वर्षासाठी द्यावा. दोन्ही टेंडर ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात यावेत.

**सुचक :- श्री. मिलन पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रफुल्ल पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | शानु जोरावरसिंग गोहिल | १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | राजु यशवंत भोईर |
| २ | पाटील उमाताई शाम | २ | वर्षा गिरधर भानुशाली | २ | जाधव मोहन महादेव |
| ३ | दिनेश दगडू नलावडे | ३ | सिंह मदन उदितनारायण | ३ | प्रविण मोरेश्वर पाटील |
| [illegible] | वेतोस्कर राजेश शंकर | ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | पाटील अनंत रामचंद्र |
| ५ | सुनिता कैलास पाटील | ५ | शरद केशव पाटील | ५ | पालांडे प्रशांत जाधव |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | ६ | गावंड मंदाकिनी आत्माराम |
| ७ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | ७ | बाविघर सिसिलीया विजय | ७ | म्हात्रे मोहन गोपाळ |
| ८ | निर्मला बाबूराव सावळे | ८ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | |
| ९ | कुरेशी याकुब ईस्माईल | ९ | पांडे स्नेहा शैलेश | | |
| १० | भोईर शशिकांत जगन्नाथ | १० | दुबे रामनारायण सदानंद | | |
| ११ | सुनिता शशिकांत भोईर | ११ | यादव मिरादेवी रामलाल | | |
| १२ | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | | | | |
| १३ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | | | | |
| १४ | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | | | | |
| १५ | जंगम लक्ष्मण गणपत | | | | |
| १६ | सपार उमा विश्वनाथ | | | | |
| [illegible] | जुबेर अब्दुल्ला इनामदार | | | | |
| १८ | श्रीमती.पुजारी कांचन शेखर | | | | |
| १९ | सय्यद नुरजहाँ नझरहुसैन | | | | |
| २० | शेख नुर मोहम्मद अेहमद | | | | |
| २१ | शफीक अहमद सादत खान | | | | |
| २२ | भाटकर प्रेरणा प्रमोद | | | | |
| २३ | मर्लिन मर्विन डिसा | | | | |
| २४ | वैती विजया हेमचंद्र | | | | |
| २५ | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | | | | |
| २६ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | | |
| २७ | मोदी चंद्रकांत भिकालाल | | | | |
| २८ | दिप्ती भट | | | | |
| २९ | अनिल दिवाकर सावंत | | | | |
| ३० | शेख सलिम दाउद | | | | |
| ३१ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | | |
| ३२ | गणेश गोपाळ शेट्टी | | | | |
| ३३ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | | | | |
| ३४ | व्यास सुधा वासुदेव | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३५ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | | |
| ३६ | नयना गजानन म्हात्रे | | | | |
| ३७ | वैती नर्मदा यशवंत | | | | |
| ३८ | पाटील जयंत महादेव | | | | |
| ३९ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | | | | |
| ४० | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | | | | |
| ४१ | पाटील मिलन गोविंदराव | | | | |
| ४२ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | | |
| ४३ | ठाकूर प्रकाश पांडूरंग | | | | |
| ४४ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | | | |
| ४५ | शर्मा भगवती तुगनचंद | | | | |
| ४६ | पाटील वंदना मंगेश | | | | |
| ४७ | चक्रे वंदना रामदास | | | | |
| ४८ | माळी हेमा रविंद्र | | | | |
| ४९ | जोत्स्ना जालिंदर हसनाळे | | | | |
| ५० | अनिता जयवंत पाटील | | | | |
| ५१ | परेरा टेरी पॉल | | | | |

ठराव बहुमताने मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/०७/२००९

**प्रकरण क्र.१४ :-** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरी गुन्ह्यांसाठी स्वतंत्र पोलिस स्टेशन व स्वतंत्र न्यायालय स्थापन करणेबाबत...

**ठराव क्र. ९८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची स्थापना दि. २८ फेब्रुवारी २००२ रोजी झाली आहे. सन२००१ च्या जनगणनेप्रमाणे शहराची लोकसंख्या ५,२०,३८८ इतकी होती. महानगरपालिकेचे एकुण क्षेत्र ७९.४० चौ.कि.मी इतके आहे. सध्या शहराची लोकसंख्या साधारणतः ८.५० लाखापेक्षा जास्त आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका राज्य शासनाच्या वर्गीकरणानुसार हि 'ड' वर्ग दर्जाची महानगरपालिका आहे. मिरा-भाईंदर हे मुंबई लगतचे शहर असल्याने शहरातील लोकसंख्येत झपाट्याने वाढ होत आहे. महानगरपालिका अंतर्गत अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण विरोधात एम.आर.टी.पी. व महानगरपालिका कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल करणे त्या व्यतीरिक्त अनधिकृत नळजोडण्या, अनधिकृत जाहिरात, फेरीवाले यांच्या विरुध्द वेळोवेळी गुन्हे दाखल करावे लागतात. काही प्रकरणात कारवाईच्या वेळी होणाऱ्या विरोधामुळे निर्माण होणारी कायदा व सुव्यवस्था परिस्थिती हाताळणे फारच जिकरीचे होत आहे. परिस्थिती हाताबाहेर जाऊन शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतात. या बाबी विचारात घेता वेळीच तपास होऊन गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी महानगरपालिकेच्या संबंधीत कामकाजाकरीता स्वतंत्र पोलीस स्टेशन व स्वतंत्र न्याययंत्रणा स्थापन होणे गरजेचे आहे. अशा प्रकारचा प्रस्ताव मा. महासभा यांनी दि. १९/११/२००८, ठराव क्र. ६८ ने पारीत केलेला आहे.

सदर ठरावाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने शासनास दि. १८/०४/२००९ रोजी स्वतंत्र पोलिस स्टेशन व स्वतंत्र न्यायालय स्थापन करणेबाबत विनंती केलेली होती. शासनाने सदर प्रकरणात राज्यातील नागरी भागात अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण निर्मूलनासाठी स्वतंत्र शासन निर्णय केलेला आहे.

शासन निर्णयानुसार अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण तसेच महापालिका हद्दीत विशेष न्यायालय स्थापन करुन त्याचा स्थायी रित्या पुर्ण खर्च उचलण्याची जबाबदारी महापालिकेवर राहील. महानगरपालिका 'ड'साठी अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण तसेच विशेष न्यायालय स्थापन करणेस संभाव्य आकृतीबंध निश्चित करुन दिलेला आहे.

प्रकरणात शासनाने महानगरपालिकेच्या मनपा/सा.प्र./११/०३/२००९-१०, दि.१८/०४/२००९ चे पत्राचे अनुषंगाने शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.कंडोमपा/१००६/

प्र.क्र. १९२/२००६/नवी-२८, दि. २ मार्च २००९ मधील शासन निर्णयामधिल तत्वांप्रमाणे शासन पत्र दि. २६ मे २००९ अन्वये सुधारित ठराव करुन स्वयंस्पष्ट प्रस्ताव शासनास फेर सादर करावा. असे कळविलेले आहे. 28

नागरी पोलिस, विशेष पोलिस ठाणे व विशेष न्यायालयांसाठी प्रस्ताव तयार करताना 'ड' वर्ग महापलिका क्षेत्रासाठी शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे संभाव्य आकृतीबंध आहे.

## परिशिष्ट 'अ'

**अतिक्रमण निर्मुलन व अनधिकृत बांधकाम नियंत्रण इं. साठी महानगरपालिका / नगरपालिका स्तरावर प्रस्तावित नागरी पोलिस यंत्रणेसाठी आकृतीबंध**

| अ.क्र. | पदाचा तपशील | वेतनश्रेणी (असुधारित) | पदाची संख्या |
|---|---|---|---|
| १. | सहा. पोलीस आयुक्त/ पोलिस उपअधिक्षक | ८०००-२७५-१३५०० | १ |
| २. | पोलिस निरीक्षक | ७४५०-२२५-११५०० | १ |
| ३. | पोलीस उपनिरीक्षक | ५५००-१७५-९००० | ४ |
| ४. | पोलीस हवालदार | ४०००-१००-६००० | ४ |
| ५. | सशस्त्र पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | २४ |
| ६. | महिला पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | १६ |
| ७. | पोलीस नाईक /वाहनचालक | ४०००-१००-६००० | ३ |
| | | एकुण | ५३ |

## परिशिष्ट - ब

**नागरी गुन्हयाच्या नोंदणी, तपास व खटला भरण्याकामी स्थापन करावयाच्या विशेष पोलीस स्टेशन यांचे आकृतीबंध**

**पोलिस स्टेशन-नमुना २ ('ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी)**

| अ.क्र. | पदाचा तपशील | वेतनश्रेणी (असुधारित) | पदाची संख्या |
|---|---|---|---|
| १. | सहायक पोलीस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | १ |
| २. | पोलीस उपनिरीक्षक | ५५००-१७५-९००० | १ |
| ३. | सहायक पोलीस उपनिरीक्षक | ४५००-१२५-७००० | १ |
| ४. | पोलीस हवालदार (सशस्त्र) | ४०००-१००-६००० | ४ |
| ५. | पोलीस शिपाई (सशस्त्र) | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ८ |
| ६. | कनिष्ठ लिपीक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १ |
| ७. | वाहनचालक | ४०००-१००-६००० | १ |
| | | एकुण | १७ |

## परिशिष्ट-क

## नागरी गुन्हयांसाठी स्थापन करावयाचे विशेष न्यायालय

### न्यायालये- नमुना-२ ('ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी)

| अ.क्र. | पदाचा तपशील | वेतनश्रेणी (असुधारित) | पदाची संख्या |
|---|---|---|---|
| १. | सह दिवाणी व फौजदारी न्यायाधीश (व.स्त.) | १२८५०-३००-१३१५०-४००-१७५५० | १ |
| २. | सहाय्यक अधिक्षक | ५०००-१५०-८००० | १ |
| ३. | लघुलेखक (नि.श्रे.) | ५५००-१७५-९००० | १ |
| ४. | वरिष्ठ लिपीक | ४०००-१००-६००० | १ |
| ५. | कनिष्ठ लिपीक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | २ |
| ६. | बेलिफ | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १ |
| ७. | शिपाई | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | २ |
| | | एकुण | ९ |

वरील सर्व बाबी विचारात घेता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात नागरी गुन्हयासाठी स्वतंत्र पोलिस स्टेशन व स्वतंत्र न्यायालय स्थापन करणेस हि सभा सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :-** (सही)

**अनुमोदन :-** (सही)

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/०७/२००९

**प्रकरण क्र. १५ :-** मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेतील मंडईकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार गौण फेरफार करणे व मंडईकरिता नविन आरक्षण प्रस्तावित करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणेबाबत.

**ठराव क्र.७९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयात भाजी, फळ व फुल मार्केट करीता आवश्यकतेनुसार नव्याने आरक्षण प्रस्तावित करणे, आरक्षणाच्या क्षेत्रात व वापरात बदल करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलमानुसार फेर बदल करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७(१) नुसार मंजुरी देण्यात येत आहे. सदर समितीस फेरबदलाचे प्रस्ताव शासनाकडून मंजूर करण्याचे पूर्ण अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत. मंजूर करून प्रस्तावित केलेल्या मार्केट आरक्षणाच्या जागेवर मार्केट करीता खुल्या शेड बांधण्यात याव्यात व त्यामध्ये भाजी, फळ, फुल व मांसाहारी मार्केट सुरू करावे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदन :- श्री. तुळशीदास म्हात्रे**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. लक्ष्मण जंगम व अनुमोदक श्री. चंद्रकांत मोदी यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

आरक्षण क्र. २६९ या जागेवर भाजी मंडई करणे अपेक्षित आहे. तरी सदर समितीने यादी आरक्षणाचा सविस्तर आढावा घ्यावा.

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील व अनुमोदक श्री. लक्ष्मण जंगम यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

आरक्षण क्र. १८५, (बसस्टॅन्ड) मौजे भाईंदर स.क्र. १३६ पै., १३७ पै. क्षेत्र ३९, सदर जागेतील बांधकामाबाबत न्यायालयात दावा प्रलंबित आहे. सदर दाव्यातील, संबंधीत मा. न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून बस स्टॅन्डचे आरक्षण काढून त्याठिकाणी शाकाहारी व मांसाहारी मार्केटचे आरक्षण टाकण्यात यावे. मौजे गोडदेव स.क्र. ६७(जुना) ११२ (नविन) या जागेत ELU प्लानप्रमाणे तलाव दर्शविलेला असून ते नियोजन समितीने आरक्षण टाकलेले नाही. तसेच सदर जागेमधून मुख्य नाला, नर्मदा नगर व औद्योगिक गाळे तसेच रहिवाशी वस्ती असल्याने त्याठिकाणी आरक्षण टाकण्याचा प्रस्ताव वगळण्यात येत आहे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

भाईंदर पूर्वेच्या वाढत्या लोकसंख्येला भाजी मार्केटची गरज आहे. एस. एन. कॉलेजच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात भाजी विक्रेते बसतात. हे भाजी विक्रेते रस्त्यावर बसल्यामुळे रस्त्यावर चालणाऱ्या जनतेस तसेच वाहनांना अडचणीचे होत आहे. त्यामुळे कॉलेज समोरील तलावात (सुशोभिकरण केलेले तलाव सोडून) भराव करुन भाजी मार्केट बनविल्यास लोकांची गरज भागुन

रस्त्याही मोकळा होईल. तसेच उर्वरीत जागेत खेळाचे मैदान बनविल्यास भाईंदर पूर्वेच्या तरुणांचा मैदानाचा प्रश्न कायमचा सुटेल.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/०७/२००९

**प्रकरण क्र. १६ :-** **मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास आराखड्यातील विकास योजनेतील रस्ते महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ नुसार भुसंपादन करणेस प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देणेबाबत.**

**ठराव क्र.** २० :-

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/युडी-१२, दि. १४/०५/९७ तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि. २५/०८/२००० अन्वये मंजुर झालेली असून ती अनुक्रमे दि. १५/०७/९७ व दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. सदर विकास योजनेत एकूण १९ महसूली गावांचा समावेश असून महानगरपालिकेच्या क्षेत्राची व्याप्ती ७९४०.५६ हेक्टर इतकी आहे.

मंजुर विकास योजनेतील रस्ते तयार करावयाचे असून महापालिकेमार्फत वेळोवेळी अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार रस्त्याची कामे हाती घेण्यात येतात. सदर रस्त्याची जागा वेळोवेळी वाटाघाटीद्वारे व टी.डी.आर. / एफ.एस.आय. देवून ताब्यात घेण्यात येते. तथापी काही जागेबाबत संबंधित जमिन मालकाकडून विकासकाचा प्रस्ताव सादर न झाल्याने भूसंपादन करणे आवश्यक झालेले आहे. सदर रस्त्याचा तपशिल खालीलप्रामाणे आहे.

१) हटकेश उद्योगनगर मधील ३०.०० मी. रूंद विकास योजना रस्त्यामधील छत्रपती शिवाजी महाराज मार्ग ते ग्रीन कोर्ट क्लब पर्यंतचा रस्ता.

२) प्लेझंट पार्क ते मिरागाव व एम.आय.डी.सी. पर्यंतचा ३०.०० मी. रूंद विकास योजना रस्ता.

३) रॉयल कॉलेज ते एम.आय.डी.सी. पर्यंत ३०.०० मी. रूंद विकास योजना रस्ता.

४) भाईंदर (प.) अंमतवाणी सत्संग समोरील स्मशानभुमी पर्यंत जाणारा १८.०० मी. रूंद विकास योजना रस्ता.

५) भाईंदर (पु.) एम.आय. उद्योग नगर मधील १२.०० मी. रूंदिच्या रस्त्याचे रूंदीकरण.

६) भाईंदर (पु.) केबिन रोड ते रेल्वे फाटकास जोडणारा १८.०० मी. रूंद रेल्वे समांतर रस्ता.

७) घोडबंदर गावातील १८.०० मी. रूंदीच्या रस्त्याचे रूंदीकरण करणे.

८) भाईंदर (पु.) जेसल पार्क ते घोडबंदर खाडी समांतर डी.पी. रस्ता.

९) भाईंदर (प) उड्डाणपुल ते मिरा रोडकडे जाणारा रेल्वे समांतर १३.०० मी. रूंदीचा रस्ता.

१०) भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन ते सुभाषचंद्र बोस मैदान पर्यंतचा ३०.०० मी. रूंदीचा रस्ता.

११) भाईंदर उत्तन – १८.०० मी. व ३०.०० मी. रूंदीचा रस्ता.

१२) भाईंदर (प.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (६० फुटी रोड) येथिल शिवसेना शाखेसमोरील सुरूवातीचा १८.०० मी. रस्ता रूंद करणे.

वरील रस्ते तयार करताना योजनेतील उर्वरीत रस्त्याची जागा व विकास योजनेतील रस्ता रुंदीकरणातील जागा ताब्यात घेण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार व जिल्हाधिकारी यांचे मार्फत भुसंपादन कायदा १९४८ चे कलम ६ नुसार भूसंपादन

करण्याकरिता व सदर भूसंपादन करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक सूचनांसह मंजुरी देण्यासाठी ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदन :- ॲड. एस. ए. खान**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्या श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे व अनुमोदक श्रीम. नर्मदा वैती यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

१३) मौजे खारी, स.क्र. २६(१५४) या जागेमधून जाणारा जैन मंदिर ते राहूल पार्क पर्यंतचा १८.०० मी. रूंद विकास योजना रस्ता.

१४) मौजे काशी, स.क्र. ६ या जागेमधून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ते जरीमरी तलावापर्यंतचा १८.०० मी. रूंद विकास योजना रस्ता.

हे दोन रस्ते विकसित करण्यासाठी जागा संपादन करणे आवश्यक असल्याने या भूसंपादन प्रस्तावात समावेश करण्यात यावा

१५) निलकमल अपार्टमेंट ते सफारी हॉटेल येथील डी.पी. रस्ता.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. सलिम शेख यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

१६) मुंशी कंपाउंड रस्ता.

१७) प्लेझंट पार्क ते डॉन बॉस्को स्कुल ते जकात नाका

१८) चर्च ते उघाडी

१९) भाईंदर (प.) भाईंदर सेकंडरी स्कुल मनोरमा अपार्टमेंट पासून पुढे जाणारा रस्ता.

२०) भाईंदर (प.) भाईंदर सेकंडरी स्कुल वर्धमान अपार्टमेंट पासून गॅस गोडाउन पुढे जाणारा रस्ता.

२१) आ.क्र. १२२-ड भाईंदर (पू.) येथे दफनभूमी तयार करणे.

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा व अनुमोदक श्री. एस.ए. खान यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडून गेल्या पाच वर्षात मोठ्या प्रमाणात टी.डी.आर. देण्यात आलेला आहे. सदर टी.डी.आर. देते वेळी कागदपत्रांची योग्य ती छाननी न केल्यामुळे चुकीच्या पद्धतीने व बेकायदेशिर रित्या काही टी.डी.आर. दिल्याने मोठ्या प्रमाणत तक्रारी येत आहेत. तरी मागील पाच वर्षात दिलेल्या टी.डी.आर. प्रकरणांची मा. आयुक्त यांनी चौकशी करावी. आवश्यकता वाटल्यास राज्य शासनाकडून चौकशी करण्याकरिता सक्षम अधिकारी नेमावा, तक्रारी प्राप्त झालेल्या टी.डी.आर. चा वापर इमारतीमध्ये करू नये व संपूर्ण चौकशी अहवाल पुढील महासभेपुढे सादर करावा. सदर ठरावाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/०७/२००९

प्रकरण क्र. १७ :- जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुनःनिर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे संगणकीकरणासंबंधी सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मंजुरी मिळविणेबाबत.

ठराव क्र. :- ३१

केंद्रशासनाच्या (JNNURM) कार्यक्रमा अंतर्गत National Mission Mode Project (NMMP) मधील सुचने प्रमाणे e-Governance मध्ये महानगरपालिकेच्या विविध विभागाचे संगणकीकरण करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. एकूण ३५ शहरांपैकी मिरा भाईंदर महानगरपालिकेचा National Mission Mode Project (NMMP) मध्ये समावेश करण्यात आलेला आहे. e-Governance मार्फत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधेत व योजनेत पारदर्शकता व कालबद्धता येणे अपेक्षित आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेस (JNNURM) या योजनेअंतर्गत केंद्रशासन व राज्यशासन यांच्याकडून निधी उपलब्ध होणार आहे. त्यापैकी केंद्रशासनाकडून ३५ टक्के व राज्यशासनाकडून १५ टक्के निधी उपलब्ध होणार आहे. महानगरपालिकेला त्यापैकी उर्वरित ५० टक्के वाटा उचलावा लागणार आहे. निधी उपलब्ध करून घेणेसाठी महानगरपालिकेचा संगणकीकरणासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला आहे. संपुर्ण संगणकीकरण करण्याच्या प्रकल्पास सविस्तर प्रकल्प अहवालानुसार अंदाजे रू. १२.५ कोटी निधीची आवश्यकता लागणार आहे.

सध्या महानगरपालिकेने मालमत्ता कर विभाग, जन्ममृत्यु विभागाचे संगणकीकरण झाले असुन पाणी पुरवठा विभागाची मागणी बिलांबाबत कारवाई पुर्ण झालेली आहे. तसेच मार्केट व परवाना विभागाचे डेटा एन्ट्री कामकाजाबाबत कारवाई सुरू आहे.

तथापि तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास सदर प्रकल्पाच्या खर्चास सदरचा सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्रशासनाच्या मंजुरीस्तव पाठविण्याकरिता या ठरावान्वये प्रशासकिय व अर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत** **अनुमोदक :- डॉ. राजेंद्र जैन.**

**सदर ठरावात सन्मा सदस्य डॉ. राजेंद्र जैन यांची खालील सुचना मांडली**

1) Employment of permanent I.T. educated staff looking under C.F.C. / Commissioner.

2) Presention of early D.P.R. in Mahasabha

3) Notieses to all departments for what information will be present.

4) Discussion in Mahasabha on 3rd parts.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

(सही) ०१/७/०९

**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि.१/०७/२००९



प्रकरण क्रमांक ( १८ ) :- भाईंदर व मिरा रोड रेल्वे स्टेशन दरम्यान रेल्वेखालील कल्वर्ट बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

ठराव क्र. ( २२ )

भाईंदर व मिरा रोड रेल्वे स्टेशन दरम्यान रेल्वेखाली कल्वर्ट बांधणे कामी मा. सर्वसाधारण सभा दि.२५/०६/२००१ ठराव क्र.३६१ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली होती. ठरावात सदर काम हे रेल्वे प्रशासनाकडे रक्कम भरुन करुन घेण्याचे नमूद होते. तथापी रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पत्र व्यवहार व पाठपूरावा केल्यानंतर रेल्वेने सदर काम हे महानगरपालिकेने निविदा मागवून करण्याबाबत कळवून भाईंदर व मिरा रोड रेल्वे स्टेशन दरम्यान १) भाईंदर जुने रेल्वे फाटका जवळ व २) मिरा रोड पूजानगर अशा दोन ठिकाणी MICRO TUNNELING SYSTEM ने कल्वर्ट बांधण्यास आराखडे दि.२६/०५/०९ रोजीच्या पत्रान्वये मंजूर करुन दिलेले आहेत. सदर कामी रु.१८,९१,०७,५५८/- एवढया रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सन २००९-१० या वर्षाच्या अर्थसंकल्पात कल्वर्ट व सब-वे करीता रु.६.०० कोटी एवढी तरतुद ठेवलेली आहे. सदर कामी महानगरपालिकेमार्फत निविदा मागवून रेल्वेच्या देखरेख व नियंत्रणाखाली काम करावयाचे असून ३१ मार्च २०१० पर्यंत अपेक्षित खर्चा करीता पूर्न विनियोजनाद्वारे आवश्यक तरतुद उपलब्ध करावी लागणार आहे. तरी सदर अंदाजपत्रकास व निविदा मागविण्याकरीता तसेच सन २००९-१० या वर्षाच्या अर्थसंकल्पातील खर्च न होणाऱ्या लेखाशिर्षातून नमुना क्र.१० अन्वये पुर्नविनियोजन पत्रक तयार करुन आवश्यक रक्कम पुर्नविनियोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. ॲड. एस. ए. खान अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/०७/२००९

प्रकरण क्र. १९ :- जेसलपार्क ते घोडबंदरकडे जाणारा खाडी समांतर डी.पी. रस्ता तयार करणेबाबत सुधारीत खर्चास विचार विनिमय करुन मान्यता देणेबाबत.

ठराव क्र २३ :-

भाईंदर (पूर्व) येथे जेसल पार्क ते घोडबंदरकडे जाणारा डी. पी. रोड करीता मोठ्या प्रमाणावर खर्च असल्याने व महानगरपालिका निधीतून सदर रस्त्याचे काम हाती घेणे शक्य नसल्याने सदर काम JNNURM अंतर्गत एकात्मिक रस्त्याच्या सविस्तर प्रकल्प अहवालात समाविष्ट करुन सदर सविस्तर प्रकल्प अहवाल पुढील महासभेपुढे सादर करण्यात यावा.

सुचक :- श्री. भगवती शर्मा     अनुमोदक :- ॲड. एस. ए. खान

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही) ८/७/१०

पिठासिन अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा सभा दि. ०१/०७/२००९

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन (१) (के) अन्वये प्रस्ताव

प्रकरण क्र. २० :- भाईदर (प.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर व भोलानगर येथे ४५.०० मीटर रस्ता रुंदीकरणात विस्थापित झालेल्या कुटुंबाना भाडयाने घरे उपलब्ध करुन देणे.

ठराव क्र. (२४)

भाईदर (प) येथे उड्डाणपूल ते नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानापर्यत ४५.०० मीटर रूंदीचा रस्ता विकास आराखडयात दर्शविलेला आहे. सदर रस्त्याच्या मधील दुभाजकात सदर कुटुंबे झोपडया बांधून राहत आहेत. सदर कुटुंबापैकी दि. ०१/०१/१९९५ पूर्वीच्या असलेल्या झोपडी धारकांची कागदपत्रे व पुरावे तपासून पात्र असलेल्या झोपडी धारकांची संख्या ७३ आहे. सोबत यादी जोडली आहे. तरी सदर कुटुंबाचे रीतसर पुर्नवसन होईपर्यत टेंभा हॉस्पीटलच्या जागेतील कुटुंबाप्रमाणेच महानगरपालिकेकडे Housing For Dishoused या आरक्षणाच्या जागेत उपलब्ध असलेल्या सदनिका करारनामा करून भाडयाने देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- सौ. निर्मला सावळे अनुमोदन :- श्री. एस. ए. खान

ठराव सर्वानुमते मंजुर

पिठासिन अधिकारी
मिरा भाईदर महानगरपालिका

## आबेडकर नगर / आनंद नगर / भोलानगर येथिल तुटलेल्या झोपडयांची यादी

| अ.क्र | झोपडपट्टी धारकांचे नांव | सादर केलेले पुरावे | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अरविंद सच्चिदानंद गुप्ता | फोटो पास दि. २२/१/०४<br>मुलाचे जन्म प्रमाण पत्र | - |
| २ | भगवान पांडूरंग माने | फोटो पास दि. ३०/६/०४<br>मुलीचे जन्म प्रमाण पत्र<br>खरेदी करारनामा | - |
| ३ | शामराव नारायण पावळे | फोटो पास दि. २३/१/०४<br>मुलीचे शाळेचा दाखला<br>खरेदी करारनामा | - |
| ४ | रत्नाकर कृष्णा प्रधान | फोटो पास दि. ३०/७/०४ | |
| ५ | सहनी प्रदिप कुमार | फोटो पास दि. ३१/१/०४<br>रेशनिंग कार्ड | |
| ६ | सुनिल पांडूरंग माने | फोटो पास दि. ३/७/०४<br>मुलीचे जन्म प्रमाण पत्र | |
| ७ | हनुमंता अनमय्या काटेअमा | फोटो पास दि.२१/१/०४<br>निवडणूक ओळखपत्र<br>दि.१/१२/९४ | |
| ८ | पार्वती आनंद माने | फोटो पास दि. २९/१०/०४<br>खरेदी करारनामा | |
| ९ | शंकर सुमन मोर्या | मुलीचे जन्म प्रमाण पत्र<br>फोटो पास दि. ९/०१/०६<br>रेशनिंग कार्ड | |
| १० | प्रभूनाथ रामयण कुशवाहा | फोटो पास दि. २२/१२/०३<br>मुलाचा जन्म दाखला | |
| ११ | धुरंधर तुरंती पासी | फोटो पास दि. ५/१२/०३<br>निवडणूक ओळखपत्र<br>दि. १/१२/९४ | |
| १२ | पप्पू रामप्रसाद शर्मा | फोटो पास दि. १८/२/०५<br>मुलीचा जन्म दाखला | |
| १३ | राजेंद्र चंद्रभान कागडा | फोटो पास दि. १/१/०५<br>मुलीचा जन्म दाखला<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| १४ | सुशिला शिवा कसबे | फोटो पास दि. १४/१/०४<br>सेवक पत्र | |
| १५ | सुभाष नागुराव सुर्यवंशी | फोटो पास दि. २१/१/०४<br>निवडणूक ओळखपत्र<br>दि.१/१२/९४ | |
| १६ | राजेंद्र प्रसाद गौतम | फोटो पास दि. १४/१०/०३<br>ड्राव्हिंग लायन्सस<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| १७ | रामकरण बनवारी सहाणी | फोटो पास दि. १४/१/०४<br>मुलीचा जन्म दाखला<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| १८ | सुमन गंगाराम वर्मा | फोटो पास दि. १/३/०४<br>निवडणूक ओळखपत्र<br>दि.१/१२/९४ | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| १९ | राजकुमार गुप्ता | फोटो पास दि. १३/१/०४<br>रेल्वेचे ओळखपत्र | |
| २० | दशरथ विठल पवार | फोटो पास दि. २५/२/०४<br>मुलीचा शाळेचा दाखला | |
| २१ | दिलीप सिंह जुग्गुसिंह गांधर | फोटो पास दि. १९/१/०४ | |
| २२ | राजकिशोर मरुआ शहा | फोटो पास दि. २०/९/०४<br>मुलीचा जन्माचा दाखला<br>द्रारिद्रय रेषेखालील कुंटूब दाखला<br>बॅक पास बुक | |
| २३ | मुकेश कुमार शहा | फोटो पास दि. १३/१/०४<br>मुलीचा जन्माचा दाखला<br>द्रारिद्रय रेषेखालील कुंटूब दाखला घरपट्टी पावती | |
| २४ | लक्ष्मण कृष्णा चव्हाण | फोटो पास दि. २३/१/०४<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| २५ | ज्योती सिताराम चौधरी | फोटो पास दि. १/१२/०३<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स ।<br>मुली / मुलाचा जन्माचा दाखला<br>निवडणूक ओळखपत्र<br>दि. १/१२/९४ | |
| २६ | रमेश दलपत माछी | फोटो पास दि. ४/६/०४<br>टॅक्स पावती | |
| २७ | अजयकुमार मोहनदास | फोटो पास दि. १९/१/०४<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| २८ | कमलाबाई गणपत राठोड | फोटो पास दि. ३१/१/०४<br>करारनामा | |
| २९ | प्रधान दयेतरी करूणा | फोटो पास दि. १५/१/०४<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ३० | बाबनी राजन धोतरा | फोटो पास दि. १५/१/०४<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ३१ | रोशनलाल जयनारायण चव्हाण | फोटो पास दि. ३१/१/०४<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ३२ | बच्चा मानसी ठाकूर | फोटो पास दि. १५/१/०४<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ३३ | नारायण रामकिशन कागडा | फोटो पास दि. ३१/१/०४<br>मुलीच्या जन्मचा दाखला | |
| ३४ | शिल्पा नेलसन रोझरिओ<br>(नेलसन रोझारिओ) | फोटो पास दि. २१/१/०४<br>करारनामा | |
| ३५ | मोहम्मद मुक्तार शेख | फोटो पास दि. १२/२/०४<br>मुलाच्या जन्मचा दाखला | |
| ३६ | भारती अशोक गंगावणे | फोटो पास दि. २८/१/०५ | |
| ३७ | अंकूश संतराम शेलके | फोटो पास दि. ४/५/०५<br>मुलाच्या जन्मचा दाखला<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ३८ | पांडूरंग शिवराम भोरगे | फोटो पास दि. २३/१/०५<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स<br>बॅक पास बुक | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३९ | रामधनी हरवाल (हरीजन) | फोटो पास दि. ३०/१/०४<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ४० | बाबूलाल जमीर सय्यद | फोटो पास दि. १८/१/०४<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ४१ | सौ. प्रेमा लालजी राठोड | फोटो पास दि. १९/१/०४ | |
| ४२ | श्रीमती नरसम्मा वेकंटरामलू पाटी | फोटो पास दि. | |
| ४३ | श्री. चंद्रकांत जनार्दन खैरे | फोटो पास दि. २१/१/०४<br>निवडणूक ओळख पत्र<br>दि. १/१२/९४ | |
| ४४ | श्री. रामराज धुन्नू चौहान | फोटो पास दि. १२/१/०३ | |
| ४५ | शहजादा सिकंदर पठाण | फोटो पास दि. २८/२/०४<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ४६ | श्री. जियालाल रामदास कोरी | फोटो पास दि. २१/१/०४ | |
| ४७ | श्रीमती मोनिका कृष्ण वेकंटेश | मुलीच्या जन्माचा दाखला<br>फोटो पास दि २१/७/०४ | |
| ४८ | भुलन जरीया गुप्ता | फोटो पास दि १९/१/०४ | |
| ४९ | श्रीमती प्रिया भगवान पसुळेकर | फोटोपास दि.<br>०१/१२/९४ टॅक्स पावती<br>निवडणूक ओळख पत्र | |
| ५० | बालप्पा चिन्नप्पा मुत्तेरास | फोटो पास दि. २१/०१/०५<br>निवडणूक ओळख पत्र<br>दि. १/१२/९४ | |
| ५१ | श्री. केसु चंदु राठोड | फोटो पास दि २२/२/०५ | |
| ५२ | श्री. चांदगिरी अर्जुन नरसिंम्मा | फोटो पास दि २१/१/०४<br>निवडणूक ओळख पत्र<br>दि. १/१/९५<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ५३ | पी. मनी सावन्न मुत्तेरास | फोटो पास दि २१/१/०४<br>निवडणूक ओळख पत्र<br>दि. १/१२/९४<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ५४ | रामेश्वर विश्वानाथ वैरागडे | फोटो पास दि २१/१/०४<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ५५ | देवम्मा मल्लपा इटकेल | फोटो पास दि २८/१/०४<br>निवडणूक ओळख पत्र<br>दि. १/१२/९४<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ५६ | अनिल एस. डिलो | फोटो पास दि ३०/१/०४ | |
| ५७ | त्रिशला प्रकाश ढोले | फोटो पास दि २५/२/०४<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स<br>मुलाचे शाळेचा दाखला | |
| ५८ | विक्रम ल. जलगांवकर | फोटो पास दि १९/१/०४<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ५९ | डाया चुनीलाल सोलंकी | फोटो पास दि २९/१/०४<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ६० | राजेंद्र रामलखन चौधरी | फोटो पास दि १९/१/०४ | |
| ६१ | राजेंद्र नंदलाल जैसवाल | फोटो पास<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६२ | मशरु मेघो चव्हाण | फोटो पास दि. ५/१२/०३ | |
| ६३ | मसाराम खाजू परमार | फोटो पास दि. ५/११/०३ | |
| ६४ | मसरु अंब्रु चौव्हाण | फोटो पास दि. १४/७/०४ | |
| ६५ | अशोक तुलसीराम गायकवाड | | |
| ६६ | अनिष शेख शफी | फोटो पास दि. १६/२/०५<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ६७ | किशोर लाला जाधव | फोटो पास दि. ११/२/०४<br>मुलाचा जन्माचा दाखला<br>मुलाचा शाळेचा दाखला<br>रेशनिंग कार्डची झेरॉक्स | |
| ६८ | केदान विश्वानाथ सहाणी | रेशनकार्ड | |
| ६९ | हरिजन महेंद्रराम | फोटो पास दि. २४/२/०४ | |
| ७० | रामयल रुपा वाघेला | | |
| ७१ | लक्ष्मी ओमकार पाटील | फोटो पास दि. २१/९/०४<br>निवडणूक ओळख पत्र | |
| ७२ | मोहम्मद हुसेन नसरुल्ला | फोटो पास दि. २२/१/०४<br>रेंशनिंग कार्ड | |
| ७३ | रामचंदर सिताराम राजभर | फोटो पास दि. २२/१/०४<br>रेंशनिंग कार्ड | |

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ३०/१०/२००९

**प्रकरण क्र. २१ :-** महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**ठराव क्र. २५ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीवर ९ पालिका सदस्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम ३१ अ (३) अन्वये मा. वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य नेमणूकीबाबत मा. महासभेस अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार आहेत.

त्यानुसार वृक्षप्राधिकरण समितीवर खालील सदस्यांची एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | सौ. मर्लिन डिसा | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | सौ. दिप्ती शेखर भट | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | सौ. कल्पना हरिहर ठाकूर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | सौ. उमा विश्वनाथ सपार | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ५. | श्री. नुर मंहमद शेख | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ६. | सौ. सुनिता शशिकांत भोईर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ७. | सौ. कॅटलीन एंथोनी परेरा | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ८. | सौ. ज्योत्स्नां हसनाळे | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ९. | सौ. हेमा रविंद्र माळी | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १०. | सौ. नर्मदा वैती | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ११. | सौ. कल्पना महेश म्हात्रे | भारतीय जनता पार्टी |
| १२. | श्री. रामनारायण दुबे | भारतीय जनता पार्टी |
| १३. | श्री. अनंत रामचंद्र पाटील | शिवसेना |
| १४ | श्री. ॲन्थोनी एलेझार मेनेजीस | नामनिर्देशित सदस्य |

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर तथा पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका



## मा. महासभा दि. ३०/१०/२००९

**प्रकरण क्र. २२ :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नवीन आठ सदस्यांच्या नेमणूकीकरिता. तसेच स्थायी समितीच्या एक सदस्याने राजिनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये एक सदस्याची नेमणूक करणे.

निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे :-

१) श्री. मॉरस जोजफ रॉड्रीक्स
२) श्री. तुळशीदास दत्तू म्हात्रे
३) श्री. मिलन वसंत म्हात्रे
४) श्रीम. शानु जोरावर गोहिल
५) श्रीम. सुनिता कैलास पाटील
६) श्री. ध्रुवकिशोर मंसाराम पाटील
७) श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर
८) श्री. टेरी पॉल परेरा.

राजीनामा दिलेल्या सदस्याचे नाव :-

१) श्री. प्रकाश जिलेदार सिंग

**ठराव क्र.२६ :-**

लोकशाही आघाडीची १) सौ. प्रभात प्रकाश पाटील २) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी ३) श्री. दिनेश दगडू नलावडे ४) श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे व ५) सौ. सुधा वासुदेव व्यास, भारतीय जनता पार्टीचे श्री. शरद केशव पाटील आणि अपक्ष या गटाचे श्री. वर्षा गिरीधर भानुशाली याची नावे मी मंजुर करत आहे. आणि राष्ट्रवादी पक्षाने दिलेली १) श्री. बर्नट अल्बर्ट डिमेलो २) सौ. अनिता पाटील व ३) श्री. राजेश म्हात्रे ह्या तीन पैंकी दोन नावे आपली ताबडतोब द्यावी नंतर ते समाविष्ट करून घेण्यात यावी असे मी जाहिर करीत आहे.

**सही/-**
**महापौर तथा पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# "अभिनंदन ठराव" क्र. २७

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दिवसेन दिवस वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात होत असुन काही परिसरात ग्रामपंचायत पासुन अरुंद असलेल्या रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होत असुन पादचारी शालेकरी विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागतो. पादचारी व शालेकरी विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये म्हणुन या महासभेत ब-याच वेळा ना फेरीवाला क्षेत्रात फेरीवाल्यांना बसण्यास मनाई करण्याबाबत ठराव झाले. यावर मा. आयुक्त श्री शिवमुर्ती नाईक साहेब यांनी भाईंदर (पुर्व) भागातील मुख्य रस्त्यावर ना फेरीवाला क्षेत्रात बसणा-या सर्व फेरीवाल्यावर कठोर कारवाई करुन पादचारी व शालेय विद्यार्थ्यांना सहकार्य केले. या बद्दल मा. आयुक्त शिवमुर्ती नाईक साहेब यांचे मनःपुर्वक हार्दिक अभिनंदन!

कृपया यांनी अशीच कारवाई करुन नागरिकांना सुखसोयी उपलब्ध करुन द्याव्या हिच सदिच्छा!

पुन्हा एकदा हार्दिक अभिनंदन!

सूचक
सौ. सुनिता भोईर
[signature]

[signature]

अनुमोदक
प्रेमनाथ गजानन पाटील
[signature]

वरील कामांच्या खर्चाची तरतूद सन २०१५-१६ च्या वार्षिक अर्थसंकल्पात "विजबिलाचा खर्च

45

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/११/२००९

### // अभिनंदन ठराव //

ठराव क्र. २८

आंतराष्ट्रीय एक दिवसीय क्रिकेट सामन्यात श्री. सचिन तेंडुळकर यांनी १७,००० धावांचा विक्रम आणि सलग २० वर्षे खेळुन मुंबई, महराष्ट्र आणि भारत देशाचे नाव उज्जवल केले. आपल्या अप्रतिम खेळाने कोट्यावधी भारतीयांना तसेच क्रिकेट खेळणा-या देशातील नागरीकांना मनसोक्त आनंद दिला. श्री. सचिन तेंडुलकर यांनी क्रिकेटमध्ये मिळवलेले यश त्यांच्या या खेळाप्रती असलेली निष्ठा, कठोर परिश्रम आणि देशाप्रती असलेली उत्कट भावना यांचे प्रतिक आहे. त्यांच्या या खेळामुळे मुंबई, महराष्ट्र व भारताच्या नावलौकीकतेत खुप भर पडली आहे. अशा या मुंबई व महराष्ट्राच्या या लाडक्या सुपुत्राने क्रिकेटमध्ये बजावलेली कामगीरी अतुलनिय अशी असुन त्यांनी क्रिकेट विश्वात ध्रुव ता-यासारेख अढळ स्थान प्राप्त केले त्याबद्दल त्यांचे मिरा भाईंदर शहरातील नागरीक व सर्व सन्मानीय नगरसेवकांतर्फे हार्दिक अभिनंदनाचा ठराव मांडीत आहे.

**सुचक :-** ध्रुवकिशोर पाटील    **अनुमोदन :-** प्रविण पाटील

ठराव वाचुन कायम करण्यात येत आहे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

46

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/११/२००९

**// अभिनंदन ठराव //**

ठराव क्र. २९

वर्ल्ड बॅक इंन्स्टीट्युटची मान्यता असलेल्या यशोदा (पुणे) व मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने घेतलेल्या ॲडवान्स पोष्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन अर्बन मॅनेजमेंट या प्रतिष्ठेच्या परिक्षेत आपले उपायुक्त (मुख्यालय) मा. श्री. सुधीर राउत यांनी महाराष्ट्र राज्याच्या गुणवत्ता यादीत प्रथम व राष्ट्रीय गुणवत्ता यादीत तृत्तीय स्थान पटकावले असुन नागरी व्यवस्थापन, नगररचना व नागरी पर्यावरण या विषयांमध्ये विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा मान मिळविल्या बद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन तसेच मा. उपायुक्त, श्री. संभाजी पानपट्टे यांनी गुणवत्ता यादीत पाचवे स्थान पटकावले बद्दल त्यांचे ही अभिनंदनाचा ठराव मांडीत आहे.

**सुचक :-** (स्वाक्षरी) **अनुमोदन :-** (स्वाक्षरी)

ठराव वाचुन कायम करण्यात येत आहे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/११/२००९.

प्रकरण क्र. २३ :- दि. १९/११/२००८ व दि. २९/११/२००८ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ७७ :-

दि. १९/११/२००८ व दि. २९/११/२००८ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. शि. ...      अनुमोदन :- श्री. एस. ए. खान

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/११/२००९

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम १ (के) अन्वये प्रस्ताव**

**प्रकरण :- मिरा भाईंदर महानगरपालिकेचे महापालिका निधीतून नियमबाह्य निधीच्या वापराबाबत.**

**ठराव ३१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे महापौर श्री. नरेंद्र मेहता यांच्या वैयक्तीक संरक्षणासाठी महापालिकेच्या निधीतून दि. २२/०९/२००९ रोजी रु. ४,८८,२८६/- चे देयक पोलीस निरीक्षक, मिरारोड पोलीस ठाणे यांना अदा करण्यात आले. सदरहू प्रकरणात मा. महासभा तसेच मा. स्थायी समिती यांची कोणतीही मान्यता नसताना सदरची देयके अदा करण्यात आलेली आहेत. याबाबतची कोणतीही तरतूद मागील अर्थसंकल्पात निर्देशित नसताना मा. आयुक्त यांनी असे देयक अदा करणे हे नियमबाह्य आहे. त्याचप्रमाणे सदरचे देयक आचारसंहिता काळात देण्यात आल्याने मा. आयुक्त यांनी आचारसंहिता भंग केली आहे. या ठरावानुसार नियमबाह्य दिलेले देयक मा. महापौर यांच्याकडून ताबडतोब वसूल करण्यात यावे व महापालिकेच्या निधीचा गैरवापर करुन नुकसान केल्याबद्दल त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावे. असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्रीम. सुधा व्यास**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

(सही)

**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका


## मा. महासभा दि. २०/११/२००९

**प्रकरण क्र. २४ :-** **संगणक चालक व लघुलेखक यांचेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र.** ३२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यात आलेला असुन संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृतांत तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने मा. महासभा दि. २०/०६/२००६, ठराव क्र. २९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणुक करण्यात आलेली होती. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकामार्फत त्यांना वेळोवळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. लघुलेखक/संगणक चालक पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे दि. २६/०७/२००६ रोजी मंजुरीसाठी पाठविला असता नगरविकास विभागाने पत्र क्र. मिभामपा-११०६/१३९०/नवि-२८, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, दि.२९/०९/२००६ च्या पत्रान्वये संगणक चालकाचे काम मंजुर पदावर कार्यरत कर्मचारी किंवा बाहयमार्गाने (Outsourcing) करुन घेणे अपेक्षित आहे असे नमुद केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दि. ०९/०१/२००८ रोजीच्या मा. महासभेत लघुलेखक व संगणक चालक यांचेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे असा विषय चर्चेस आला असता सर्व संगणक चालक व लघुलेखक यांची शैक्षणिक पात्रता व कामाची क्षमता याची माहिति घेणेसाठी मा.महापौर सो. यांचे अध्यक्षाखाली एक समिती गठित करण्यात येवून समितीत संगणक विषयी तज्ञ व्यक्तीद्वारे संगणक चालक व लघुलेखक यांची शैक्षणिक पात्रता व संगणक विषयीचे ज्ञान तपासुन गठीत समितीद्वारे मा.महासभेपुढे अहवाल सादर करण्यात आला होता. या अहवालानुसार संगणक चालक व लघुलेखक यांना ११ महिन्यांची दि.०३/०७/२००८ पासुंन मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदत दि. ३१/०५/२००९ रोजी संपलेली आहे. म्हणुन मा. महासभा दि. १८/०६/२००९ मध्ये विषय घेवुन ठराव क्र. ५ नुसार संगणक चालक यांना रु. ५०००/- (२६ दिवसांसाठी) व लघुलेखक रु.६०००/- (२६ दिवसांसाठी) याप्रमाणे मानधनावर नेमणुक करणेस मंजुरी दिली आहे. या ठरावाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी व शासनाकडे पुन्हा प्रस्ताव पाठविण्यांत यावा. प्रस्तावावर शासनाकडुन मंजुरी येईपर्यंत मानधनावर काम करणाऱ्या संगणक चालक व लघुलेखकांना सेवेत कार्यरत ठेवावे. जे.एन.एन.यु.आर. एम. मधील नविन योजना कार्यान्वित करण्यासाठी जादा संगणक प्रशिक्षित कर्मचारी लागणार असुन त्यासाठी स्थायी लिपीक वर्गातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल** **अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. प्रफुल्ल पाटील व अनुमोदक श्रीम. सुनिता भोईर यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

सदर ~~सेवकचालक~~ संगणकचालक व लघुलेखक यांना दर ११ महिन्यानंतर १ दिवसाचा खंड देउन पुन्हा सेवेत ठेवण्यात यावे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला.**

Mendonca

**पिठासीन अधिकारी**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/११/२००९

50

प्रकरण क्र.२५ :- मिरा-भाईंदर महानगरपालिकच्या हद्दीतील घरे, दुकाने व इतर मालमत्तांना नंबर प्लेट लावणे कामी खाजगी संस्थांकडुन निविदा मागविणे बाबत.

ठराव क्र. ३३ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांवर मालमत्ता क्र. दर्शविणारे ~~स्टेनलेस स्टीलच्या~~ अल्युमिनियम स्टेनलेस स्टीलचे नंबर प्लेट लावणेकामी खाजगी संस्थांनी प्रशासनाशी तयारी दर्शविली आहे.

महानगरपालिका हद्दीत सन २००८-०९ पर्यंत एकूण मालमत्तांची संख्या ३५,५११ व खातेदारांची संख्या २,५२,५३९ इतकी असून सन २००९-१० या आर्थिक वर्षात मालमत्ता ४० हजार व खातेदार ३ लाख इतकी संभाव्य वाढ होणार आहे. विविध मालमत्तांना नंबर प्लेट लावल्यास पत्रव्यवहाराच्याकामी, रेशनकार्ड कामी, जनगणनेकामी, असेसमेंटकामी, निवडणुककामी, महानगरपालिकेच्या कर वसूलीच्या सोईच्या दृष्टीने मोलाची मदत होणार आहे. सदर कामी प्रत्येक मालमत्ताधारकांकडुन मंजूर संस्थेने त्यांचे मनुष्यबळ वापरुन मालमत्तेवर दर्शनी भागावर ठरवून दिलेल्या आकाराची स्टेनलेस स्टील [illegible] लावावी असे ठरविणे इष्ट होईल. याकामी मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ४६ दि. ०७/०८/२[illegible] अन्वये निविदा मागविणेस मंजूरी दिली होती. त्या अनुषंगाने दि. ०२/०९/२००९ रोजीच्या [illegible] वृत्तमानस या वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करण्यांत आली असून आलेल्या एकुण [illegible] निविदाधारकांपैकी मे. महाशक्ती महीला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्या. यांची [illegible] सर्वात कमी (रु. ६०/- प्रती नग) दराची निविदा स्विकारुन त्याप्रमाणे रितसर मालमत्ता धारकांकडून त्या संस्थेने शुल्क स्वतः वसूल करावे हि अट ठरवून सदर निविदा धारकास मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील घरे, दुकाने, झोपडपट्ट्या व इतर मालमत्तांना नंबर प्लेट लावणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- [signature]

अनुमोदक :- [signature]

ठराव सर्वानुमते मंजूर

[signature]

महापौर

मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

५१

**मा. महासभा दि.20/ 11/ २००९**

**प्रकरण क्र. 26.....:- महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास कार्यात्तर मंजुरी मिळणेबाबत...**

**ठराव क्र. 38**

महानगरपालिकेच्या कर्मचारी संघटना यांनी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान मिळणेची मागणी केलेली असुन राज्य शासनाकडुन शासकिय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्यात येत नाही. मात्र यापूर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६१/ नवि-२४, दि.२७/११/२००२ अन्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री.महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.३१/१०/२००२ रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

**"महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देतांना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल."**

वरील प्रमाणे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. ३१/१०/२००२ रोजी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व आयुक्त, सर्व महानगरपालिका यांच्या झालेल्या बैठकित ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईल – १०९७/ प्र.क्र.२६१/ नवि-२४, दि. २७/११/२००२ अंतर्गत उपरोक्त नमुद शासनाचे निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित असुन गेल्यावर्षी मा. महासभा दि.१०/१०/२००८ ठराव क्र. ४१ अन्वये महानगरपालिकेच्या वर्ग- २ ते ४ संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना रु.५,८३०/- महापालिका शिक्षकांना रु. ५,८३०/- व रोजंदारी कर्मचारी व सुवर्ण जयंती मध्ये ठोक वेतनावर काम करणारे व मानधनावरील कर्मचारी संगणक चालक यांना रु. ३६३०/-, अस्थायी बालवाडी शिक्षकांना रु. ११००/- याप्रमाणे सानुग्रह अनुदान वाटपास मंजुरी दिलेली आहे.

सन २००८-०९ या वर्षी कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमीत्त सानुग्रह अनुदान देण्याविषयी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटनेने पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | म्युनिसिपल लेबर युनियन | रु. ७५००/- |
| २) | मिरा भाईंदर कामगार सेना | रु. १००००/- |
| ३) | कास्ट्राईब कर्मचारी महासंघ | रु. ८०००/- |
| ४) | श्रमजीवी वाराई माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार संघटना (रजि.) | रु. ८०००/- |

सन २००९-१० च्या अदांजपत्रकात सानुग्रह अनुदान वाटपाकरीता तरतुद लेखाशिर्ष "संकिर्ण" 'फ' (१६) मध्ये रु. ११०.०० लाख आहे. महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्गांची संख्या पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचारी | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २००८-०९ | सन २००८-०९ या वर्षात कार्यरत कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले अनुदान (२००८-०९) | |
|---|---|---|---|---|
| १) | महापालिका आस्थापनेवरील वर्ग- २ ते ४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १३९१ | रु. ५८३०/- | ८१,०४,६७२/- |
| २) | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | २०२ | रु. ५८३०/- | ११,४०,७३७/- |
| ३) | रोजंदारी कर्मचारी, सुवर्ण जयंती योजना, | २ + २ + १ = ५ | रु. ३६३०/- | १८,१५०/- |
| ४) | संगणक चालक, लघुलेखक | ७९ | रु. ३६३०/- | २,८३,७४६/- |
| ५) | बालवाडी शिक्षिका | ९ | रु. ११००/- | ९,२५८/- |
| | | | **एकुण** | **९५,५६,५६३/-** |

परंतु यावर्षी दि. ३१/०८/२००९ रोजी पासुन राज्यात राज्य निवडणुक आयोगाने विधान सभेची आंचार संहिता लागु केलेली आहे. राज्यात आचारसंहिता लागु असल्यामुळे महानगरपालिकेची आमसभा सुध्दा घेता येत नाही. परंतु आचांर संहिता कालावधीत दिवाळी आल्यामुळे दि. २७/११/२००२ च्या शासनाचे पत्रान्वये व कर्मचारी संघटनाच्या मागणीनुसार उक्त तपशिलाप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी दिलेल्या सानुग्रह अनुदानानुसार यावर्षी मा. महासभेने गतवर्षी मान्यता दिल्याप्रमाणेच सन २००८-०९ या वर्षात नियमित कार्यरत कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान दिल्याने एकुण रक्कम रु.९५.५७ लाख खर्च झालेला आहे.

तरी महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांस सन २००८-०९ चे सानुग्रह अनुदान वाटप करणेस झालेल्या रु. ९५.५७ लाख या खर्चास ही सभा कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचक :- 

अनुमोदन :- 

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचुन कायम करण्यात आला,**

**महापौर**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

[illegible]

[illegible]

[illegible]

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि. २०/११/२००९

प्रकरण क्रमांक ( २७ ) :- भाईदर (पूर्व) व (पश्चिम) यांना जोडणारा रेल्वे खालील सबवे बांधणे कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

ठराव क्र. ( ३५ ) :-

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीत भाईदर (पूर्व) व (पश्चिम) यांना जोडणारा रेल्वे खालील सबवे बांधणे कामी सर्वप्रथम तत्कालिन नगरपरिषद असताना सर्वसाधारण सभा दि. २५/०६/२००१ ठराव क्र. ३६४ अन्वये व तद्नंतर मा. महासभा दि. ०३/०८/२००४ ठराव क्र. २३ अन्वये व मा. महासभा दि. १०/१०/२००८ ठराव क्र. ४३ अन्वये मंजूऱ्या प्राप्त आहेत. सदर कामी रु. ९.५९ कोटीच्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त असून रेल्वे प्रशासनाने सदरचे काम स्वतः हाती न घेता महानगरपालिकेस स्वतः निविदा मागवून करण्यास मान्यता दिली आहे. तथापी सदरचे काम रेल्वेच्या अंगीकृत असलेल्या सल्लागारामार्फत पार पाडण्याबाबतच कळविलेले आहे. त्यानुसार सदर कामी आतापर्यंत पाच वेळा निविदा मागवून ठेकेदारांनी एकदाही निविदा सादर केलेली नाही. सदर काम हे Box Pushing पध्दतीने करणे बाबत रेल्वेने मंजूरी दिली आहे. तथापी प्रत्यक्षात जागेवरील मातीचा दर्जा अतिशय कमी असल्याने व खाडीचे पाणी जमिनीखाली असल्याने Box Pushing System ने सबवे Tilt होण्याची शक्यता आहे.

सदर सबवेच्या ठिकाणची माती कमी दर्जाची असल्याने सदर मातीचे नमूना तपासण्याकरीता I.I.T. Mumbai यांना कळविल्यानुसार त्यांनी Test Report सादर केलेला असून त्यानुसार Box Pushing ने Subway करणे शक्य नाही. त्याऐवजी Alternative Technology वापरून Micro Tunneling System ने सबवे बांधणे कामी रु.४०.०० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिकेने फेर निविदा मागविताना Box Pushing व Trench less Micro Tunneling System ने दर भरणेबाबत निविदा फॉर्म मध्ये नमूद केले आहे. सदर निविदाची प्रक्रिया सुरू असून ही सभा रु. ४०.०० कोटीच्या सुधारीत खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर निविदा बाबत पुढील प्रक्रिया करून मा. स्थायी समिती सभेत निविदा ठेवण्यात याव्यात. सदर कामी चालू वर्षाकरीता सन २००९ — १० या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद असून ३१ मार्च २०१० पर्यंत लागणारी

54

वाढीव तरतूद पुर्नविनियोजनद्वारे करण्यात यावी. सदर कामाकरीता रेल्वे प्रशासनाची मान्यता घेउुन काम करण्यात यावे.

सुचक :- श्रीमती. शानु गोहिल | अनुमोदन :- श्री. मदन सिंह

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात यावा.

पिठासिन अधिकारी

2009-10/DKV/DK/T 2

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/११/२००९

**प्रकरण क्र. २८ :-** जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्नःनिर्माण अभियान (JNNURM) बी.एस.यु.पी प्रकल्पास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**ठराव क्रमांक ३६ :-**

केंद्र शासनाच्या जवाहलाल नेहरु नागरी पुर्नःनिर्माण अभियानांतर्गत शहरी भागातील झोपडपट्टीवासी यांचे जीवनमान उंचावण्याकरीता शहरी गरीबांकरीता मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) हा उप कार्यक्रम राबविण्यांत येतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बी.एस.यु.पी फेज -१ मध्ये काशी गावातील जनतानगर व मिरा गावातील काशीचर्च येथील झोपडपट्टीवासीयांकरीता BSUP प्रकल्पाचा आराखडा तयार केला आहे. सदर योजने मध्ये ४१३६ घरे प्रस्तावित केले आहेत. BSUP योजना अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीचा आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | केंद्र शासन हिस्सा | राज्य शासन हिस्सा | मनपा हिस्सा | झोपडपट्टी धारक हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १) | घराची किंमत Housing Cost | ५० % | ३० % | ९ % | ११ % |
| २) | मुलभूत सुविधा Infrastructure and common amenity | ५० % | २५ % | २५ % | - |

मिरा भाईंदर मनपा बी.एस.यु.पी प्रकल्प टप्पा-१ च्या रु.३००.०० कोटी रकमेच्या प्रकल्पास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे. एच्छद्द या उपक्रमाची अंमलबजावणी नियोजनाच्या दृष्टीने प्रभावी व सुरळितप्रमाणे करता यावी म्हणून सदर योजनेसाठी २.५ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेबाबत तरतूद विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट करणेबाबत उक्त अधिनियमांचा कलम ३७ अन्वये फेर कार्यवाही पर्ण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेचा हिस्सा अंदाजे ७२.३५ कोटी एवढा अपेक्षित आहे. सदर प्रकल्पा अंतर्गत तोडल्या जाणाऱ्या दुकानाच्या मोबदल्यात दुकाने महानगरपालिकेच्या नियमावलीनुसार देण्यात येतील. सदर खर्च महानगरपालिकेने सदर जागेत योग्य ठिकाणी BSUP Cross subsidy Commercial

*project* उभारुन भागवावा. त्याकामी निविदा मागवून पुढील कार्यवाही करावी. सदर कामी आवश्यक मान्यता प्राप्त करुन घेउन त्वरीत निविदा मागविण्यात याव्यात. तसेच सदर भागातील रहीवाशांची राहण्याची आवश्यक ती व्यवस्था मौजे घोडबंदर येथील आरक्षण क्र. ३२६ ट्रक टर्मिनल या आरक्षणाच्या ३.०० एकर जागेत करावी. सदर आरक्षणात ट्रान्झिट कॅम्प म्हणून ३.०० एकर जागा आरक्षित करण्यास व तसा फेरबदल करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करण्यास आवश्यक कार्यवाही करण्यास तसेच हरकती व सुचना मागवून त्यावर सुनावणी घेउन अंतिम प्रस्ताव राज्या शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे. अथवा दरमहा भाडे देण्यास व खर्चास देखिल ही सभा मंजूरी देत आहे. तथापी सदर ठरावाची पुढील अंमलबजावणी वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर करावी. अस्तित्वात असलेल्या सर्व झोपडीधारकांना घरे / दुकाने देण्यात यावीत. मा. आयुक्त यांनी सदर प्रकल्पाच्या नकाशांना तातडीने मंजूरी दयावी.

**सुचक :- श्रीम. ज्योत्सना हसनाळे** **अनुमोदन :- श्री. प्रफुल्ल पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

दि. २९/०९/२०१० (दि. १४/०९/२०१० रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभेत इतिवृत्तांत कायम करताना सुचक यांनी या ठरावामध्ये नजरचूकीने राहिलेले वाक्य समाविष्ठ करण्यास सांगितले त्यानुसार सदरचे वाक्य ठरावामध्ये समाविष्ठ करण्यात येत आहे.

**पिठासन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईदर महानगरपालिका

57

## मा. महासभा दि. २०/११/२००९

प्रकरण क्र. ( २९ ) काशिमिरा, भाईंदर गोराई मनोरी रस्त्याची सुधारणा करणे कामाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबत.

ठराव क्र. ( ३७ )

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील काशिमिरा, भाईंदर, गोराई, मनोरी रस्त्याची सुधारणा करण्याचे काम एम.एम.आर.डी.ए. मार्फत हाती घेण्यात आलेले असून त्या अंतर्गत सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तन व गोराई पर्यंतच्या रस्त्याचे मजबुती करणाचे काम पूर्ण झाले आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि. १०/१०/२००८ ठराव क्र. ४६ अन्वये एम.एम.आर.डी.ए. ला मुर्धा, राई व मोर्वा येथील ब्रिजची पुर्नबांधणी करण्याबाबत विनंती करण्यात आलेली होती. त्यानुसार एम.एम.आर.डी.ए. ने मुर्धा, राई व मोर्वा येथील ब्रिज बांधणे कामी निविदा मागविलेली असून ठेकेदारास कार्यादेश देण्याची प्रक्रिया सुरू आहे. सदर काम लवकरच सुरू होईल.

सदर रस्त्याच्या कामा अंतर्गत महामार्ग क्र. ८ वरील शिवाजी महाराज पुतळा ते गोल्डन नेस्ट सार्कल पर्यंत सर्व्हीस रोड, रस्त्याच्या डीव्हायडरची पूर्नबांधणी, सिल्व्हर पार्क, एस.के.स्टोन, कनकिया सर्कल येथे पूल (Vehicular Subway) बांधणे तसेच सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत नाला बांधणे व रस्ता तयार करण्याचे काम हाती घेण्याबाबत एम.एम.आर.डी.ए. यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सदर कामाकरीता एम.एम.आर.डी.ए. कडे निधी देण्याविषयी मागणी करण्यास सुचित केले. त्यानुसार सदर कामी रू. ४४,५१,२५,६००/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कामी सर्व निधी एम.एम.आर.डी.ए महानगरपालिकेस अनुदान रूपाने उपलब्ध करुन घ्यावे. सदर कामाच्या खर्चास व एम.एम.आर.डी.ए. कडून अनुदान प्राप्त झाल्यावर निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :-
श्री. मिलन गो. पाटील

अनुमोदन :-
श्री. भगवती शर्मा

**वरील ठरावाची श्री. लक्ष्मण जंगम यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

१) शिवार उदयान २) दिपक हॉस्पीटल व ३) गोल्डन नेस्ट सार्कल येथे देखिल Vehicular Subway बांधण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासिन अधिकारी

[illegible]

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/११/२००९

**प्रकरण क्र. ( ३० )** जैसल पार्क ते घोडबंदर कडे जाणारा खाडी समांतर डी.पी. रस्ता तयार करणे बाबत सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबत.

**ठराव क्र. ( ३८ )**

भाईंदर (पूर्व) येथे जैसल पार्क ते घोडबंदरकडे जाणारा खाडीसमांतर १८.०० मीटर व ३०.०० मीटर रूंदीचा डी.पी. रोड असून सदर रस्त्याच्या सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव मा. महासभेत ठेवण्यात आला होता. तथापी मा. महासभा दि. ०१/०७/२००९ ठराव क्र. २३ अन्वये सदर रस्त्याचे काम JNNURM अंतर्गत प्रस्तावित करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. सदर रस्त्याचे काम JNNURM अंतर्गत तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालात समाविष्ट करून सदर प्रकल्प अहवाल MMRDA मार्फत राज्य शासनाकडे पाठविण्यात आला होता. सदर सविस्तर प्रकल्प अहवालास राज्य शासनाची मान्यता प्राप्त आहे. तथापी केंद्र शासनाने महाराष्ट्राकरीता असलेला निधी संपल्याने सद्यस्थितीत केंद्र शासनाकडे तूर्तास सविस्तर प्रकल्प अहवाल पाठवू नये असे कळविल्याने सदर सविस्तर प्रकल्प अहवाल MMRDA कडे प्रलंबित आहे.

JNNURM अंतर्गत प्रस्तावित कामांपैकी केंद्र शासनामार्फत पाणीपुरवठा योजना, मलःनिस्सारण योजना, परीवहन व्यवस्था, संगणक प्रणाली इ. प्रकल्प अहवालांना प्राधान्य देण्याचे धोरण असल्याने महानगरपालिकेमार्फत तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता मिळण्यास बराच विलंब लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर काम रस्त्याच्या सविस्तर प्रकल्प अहवालातून वगळण्यात यावे व इतर रस्त्यांच्या कामांचा सविस्तर प्रकल्प अहवालात समाविष्ट करावा.

याबाबत MMRDA च्या अधिकाऱ्याशी चर्चा केली असता जैसल पार्क ते घोडबंदर हा रस्ता छत्रपती शिवाजी महाराज मार्गास समांतर असा एकमेव ३०.०० मीटर रूंदीचा रस्ता असल्याने भाईंदर (पूर्व) येथील व छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील वाहतुकीचा ताण कमी करण्याकरीता सदर रस्ता होणे आवश्यक असल्याचे मत प्रदर्शित करून सदर

[illegible]

[illegible] [illegible]

[illegible]

[illegible]

59

रस्त्याच्या कामास MMRDA मार्फत कर्ज निधी देण्यात येईल असे सांगितले. सदर रस्त्यास एस.एन. कॉलेज समोरील रस्ता, गोल्डन नेस्ट, दिपक हॉस्पीटल जवळील रस्ता, रामदेव पार्क रस्ता, कनकिया, एस.के.स्टोन, हटकेश उदयोग नगर समोरील डी.पी. रस्ते जोडल्यास शहरातील सर्व वाहतूक सुरळित होईल. सदर रस्ता हा CRZ ने बाधित होत असून सदर प्राधिकरणाची मान्यता घेण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच महानगरपालिकेमार्फत मा. उच्च न्यायालयात अर्ज करून सदर रस्त्याचे काम हाती घेण्याबाबत परवानगी घेण्याचे काम देखिल सुरू आहे. सदर रस्त्याकरीता मे. आर्किझम यांनी रू. ४९,४०,१४,६८०/- रकमेचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. सदर काम CRZ प्राधिकरण व मा. उच्च न्यायालयाची परवानगी आल्यानंतर सुरू करण्यात यावे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामी आवश्यक निधिची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी व तसेच शासकिय / निमशाकिय / खाजगी संस्थेकडून कर्ज उपलब्ध करून घेण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे.

सूचक :- **श्रीमती. शानू गोहिल**

**अनुमोदन :- श्री. मदन सिंह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**पिठासन अधिकारी**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. २०/११/२००९

**प्रकरण क्रमांक** ( ३१ ) :- मिरारोड येथील वाहनतळ आरक्षण क्र. १८४ विकसित करणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक** ( ३९ )

मिरारोड परिसरात शांती नगर, गोकूळ व्हिलेज, सृष्टी, गोल्डन नेस्ट, कनाकिया, पुनमसागर हे परिसर येतात. तसेच घोडबंदर व दहिसर चेकनाका परिसरातील नागरीक रेल्वे प्रवासासाठी मिरारोड स्टेशन येथून प्रवास करतात.

मिरारोड परिसरातील तसेच घोडबंदर व दहिसर चेकनाका परिसरातील नागरीक साधरणतः अडीच ते तीन लाख असून त्यातील साधारणः एक लाख प्रवासी रेल्वेने प्रवास करतात. त्यातील साधरणतः पाच हजार प्रवासी स्वतःच्या मोटर सायकल व सायकल मिरारोड स्टेशन येथे पार्क करतात. ते करताना कोणतेही नियोजन नसल्यामुळे वाहतुकीची कोंडी होते व नागरीकांना त्रास सहन करावा लागतो.

महानगरपालिके मार्फत पार्किंगचा ठेका देण्यात आलेला असून सदरचा ठेकेदार हा रस्त्यावरच वाहने पार्क करतो. त्यामुळे महानगरपालिकेस १५,५६,०००.०० एवढया वार्षिक उत्पन्ना शिवाय बाकी कुठलाही फायदा होत नाही. तसेच वाहतुकीची कोंडी दुर होत नाही. सदरचा ठेकेदाराकडे केवळ ५०० मोटर सायकल व ५० सायकल पार्क करण्याची क्षमता आहे.

मिरारोड येथील आरक्षण क्रमांक १८४ येथे बहुमजली वाहनतळ उभारल्यास अनेक वाहने तेथे राहू शकतील व महानगरपालिकेस जास्त प्रमाणात उत्पन्न मिळेल. महानगरपालिकेस जर स्वखर्चाने अत्याधुनिक वाहन तळ उभारावयाचा असेल तर साधरणः अंदाजे ५.०० करोड खर्च अपेक्षित आहे व तो चालविण्यासाठी पुन्हा ठेका द्यावां लागेल.

सदर प्रकल्पाचा BOT तत्वावर प्रस्ताव मागविल्यास महानगरपालिकेचा खर्च वाचू शकेल व उत्पानात वाढ होईल. सदर प्रकल्प BOT तत्वावर देण्यात महानगरपालिकेचे आर्थिक हित जोपासले जाईल, नागरीकांच्या वाहनांची सुरक्षितता आबादित राहून वाहतूक कोंडी होणार नाही. सदर आरक्षणाच्या जागेवर मोठया प्रमाणावर दुचाकी व चार चाकी वाहने उभी राहण्याच्या दृष्टीने अनुभवी खाजगी संस्था / विकासक, एजन्सी कडून प्रस्ताव मागविण्यास ही सभा मान्यता देत आहे. आयुक्त यांनी याबाबत सविस्तर अभ्यास करून आवश्यक अटीशर्तीचा महानगरपालिकेच्या हिताचा विचार करून निविदा फॉर्म तयार करावा.

**सुचक :-** श्री. एल. ए. खान

**अनुमोदक :-** निर्मला सोवळ

**ठराव सर्वानूमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

PJK/DK/09-10/T 14

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मा.महासभा दि. २०/११/२००९**

**प्रकरण क्रमांक ( ३२ ) :-** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मार्फत संपूर्ण अनुदानातून बांधलेल्या वस्ती स्वच्छता गृहावर जाहिरातीचा हक्क देणे बाबत.

**ठराव क्रमांक ( ४१ )**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (MMRDA) एम.एम.आर हद्दीत १०० % अनुदानातून वस्ती स्वच्छतागृह बांधण्याची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सदर योजनेतून ५६ ठिकाणी वस्ती स्वच्छता गृहाची कामे फेज -१ मध्ये पूर्ण झालेली असून फेज – २ मध्ये ९८ कामे सुरु असून लवकरच पूर्ण करण्यात येणार आहेत. सदर वस्ती स्वच्छता गृहावर जाहिरातीचा हक्क मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला देण्याकरीता महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव करुन पाठविण्याबाबत मा. महानगर आयुक्त यांनी दि.२६ मे २००९ रोजीच्या सोबत जोडलेल्या पत्रान्वये विनंती केली आहे. तरी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला सदर वस्ती स्वच्छता गृहावर जाहिरातीचा हक्क देण्याकरीता ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- (भगवती शर्मा)

अनुमोदक :- (हरी परेरा)

**ठराव सर्वानूमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

PJK/DK/2009-10/T13

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दिनांक २० /११ /२००९.

## ।। ठराव ।।

**विषय :- केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत बस खरेदी वरील जकात कर व वॅट कराच्या रक्कमेत माफी देणेबाबत....**

**प्रकरण क्रमांक** :- ३३

**ठराव क्रमांक** :- ५९

मिरा भाईंदर महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत ५० बस खरेदी करण्याचे प्रयोजन केले आहे व त्याकामी १) ५० बस चेसीज खरेदी करणे व २) ५० बस चेसीजवर बॉडी बिल्डिंग करणे या स्वतंत्र्य कामांची निविदा प्रसिध्द करुन पुढील कार्यवाही केली आहे. सदर ५० बसच्या खरेदीवर जकात व वॅट कराच्या रक्कमेत केंद्र शासन अनुदान देणार नसल्याने त्याचा भार महानगरपालिकेच्या तिजोरीवर पडणार आहे.

केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत करावयाच्या बस खरेदीवरील जकात व वॅट कराच्या नियमानुसारच्या रक्कमेत माफी दिल्यास महानगरपालिकेस आर्थिक सुसहाय्यता होईल. सबब सदर ५० बस खरेदीवरील जकात व वॅट च्या नियमानुसारच्या रक्कमेत माफी देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सूचक :- तुळशीराम म्हात्रे

अनुमोदक :- भगवती शर्मा

ठराव वाचून कायम केला

महापौर,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/११/२००८

**प्रकरण क्र. ३४ :- प्राथमिक आरोग्य केंद्र (टेंबा) भाईंदर (प.) येथील प्रस्तावित २०० खाटांच्या रूग्णालयकरिता शासन निर्णयानुसार आवश्यक कर्मचारी आकृतीबंधाबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ४२**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील टेंबा भाईंदर (प.) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत मोकळी जागा यांचा ताबा पत्र जा. क्र./ठाजिप/नियोजन/वशी/२४१/०७ आरोग्य विभाग जिल्हा परिषद, ठाणे दि. १०.०८.२००७ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे देण्यात आला आहे.

तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यामध्ये दाखल जनहित याचिका क्र. ३८/२००६ निकाल दि. २५.०४.२००६ श्री. मिलन वसंत म्हात्रे विरूध्द महाराष्ट्र राज्य व अन्य या निर्णयास ठरवून दिलेल्या कालमर्यादेस अधिन राहून सदर ठिकाणी २०० खाटांचे रूग्णालय उभारण्याचे प्रस्तावित आहे. तसेच मा. महासभेने टेंबा, भाईंदर (प.) येथे रूग्णालयाच्या इमारतीचे बांधकामास मंजूरी दिलेली आहे. त्यासाठी रूग्णालयाचे काम काही कालावधीतच सुरू होणार आहे. संबंधित रूग्णालयामध्ये विविध वैद्यकीय विभाग शासन नियमांनुसार सुरू करणे आवश्यक आहे. सदर विभागांसाठी विविध संवर्गातील कर्मचारी वर्गाची गरजेनुसार नेमणूक करणे आवश्यक आहे. तसेच सदर पदांच्या आकृतीबंधास मा. महासभेची मंजूरी घेवून पदनिर्मितीचा प्रस्ताव (आकृतीबंध) शासनाकडे पाठविणे गरजेचे आहे, जेणेकरून पुढील काही कालावधीत या पदांना शासनाची मंजूरी प्राप्त होईल व पर्यायाने सर्व पदे नियमित होतील व कर्मचारी भरतीच्या वेळेस ही पदे कायमस्वरूपी असल्याने संपूर्ण पदे भरली जातील.

याप्रकारे उपरोक्त रूग्णालयाचे प्रशासकीय, दैनंदिन वैद्यकीय कामे प्रभावशाली पध्दतीने करणे शक्य होईल. पर्यायाने रूग्णालयात दाखल होणाऱ्या रूग्णांना प्रभावी वैद्यकीय सेवा देता येईल. तरी उपरोक्त रूग्णालयाकरिता आवश्यक कर्मचारी वर्गाच्या नेमणूकीचा प्रस्ताव तयार करणे, मा. महासभेची मंजूरी घेणे व शासनास मंजूरीसाठी पाठविणे आवश्यक आहे.

तसेच शासन निर्णय क्र.जिरूप /२००४ / प्र.क्र.२४ / आरोग्य ३, मंत्रालय मुंबई - ४०००३२., दि. २६ मे २००४ नुसार उपरोक्त २०० खाटांच्या रूग्णालयास आवश्यक असणाऱ्या कर्मचारी वर्गाचा आरोग्य विभागाकडुन प्राप्त आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदनाम | प्रमाणित कर्मचारी वर्ग | आवश्यक पदे | वेतन श्रेणी |
|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वर्ग – १** | | | | |
| १ | जिल्हा शल्यचिकित्सक | १ | - | १००००-३२५-१५२०० |
| २ | निवासी वैद्यकीय अधिकारी (चिकित्सा) | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| ३ | निवासी वैद्यकीय अधिकारी | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| ४ | वैद्यकीय अधिकारी (भिषक) | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| ५ | वैद्यकीय अधिकारी (शस्त्रक्रिया) | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| ६ | वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र) | १ | १ | १००००-३२५-१५२०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | बालरोग तज्ज्ञ | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| ८ | अस्थिव्यंग शल्यचिकित्सक | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| ९ | बधिरीकरण शास्त्रज्ञ | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| १० | क्ष-किरण शास्त्रज्ञ | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| ११ | शरीरविकृती चिकित्सक | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| १२ | मनोविकृती चिकित्सक | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| १३ | वैद्यकीय अधिकारी (चर्मरोग) | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| १४ | वैद्यकीय अधिकारी (क्षयरोग चिकित्सक) | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| १५ | नेत्रशल्यचिकित्सक | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| १६ | वैद्यकीय अधिकारी (कान, नाक, घसा तज्ज्ञ) | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| | **एकूण** | **१६** | **१५** | |
| **सामान्य राज्य सेवा, वर्ग - २** | | | | |
| १ | दन्तशल्यचिकित्सक | १ | १ | ८०००-२७५-१३५०० |
| | **एकूण** | **१** | **१** | |
| **महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वर्ग - २** | | | | |
| १ | वैद्यकीय अधिकारी (रक्तसंक्रमण अधिकारी धरून) | १५ | १५ | ८०००-२७५-१३५०० |
| २ | अधिसेविका, वर्ग – २ | -- | -- | ६५००-२००-१०२०० |
| | **एकूण** | **१५** | **१५** | |
| **वर्ग -३ शुश्रृषा विभाग** | | | | |
| १ | अधिसेविका | १ | १ | ६५००-२००-१०२०० |
| २ | सहाय्यक अधिसेविका | १ | १ | ६५००-२००-१०२०० |
| ३ | परिसेविका | १४ | १४ | ५५००-१७५-९००० |
| ४ | बालरोग परिचारीका | २ | २ | ५५००-१७५-९००० |
| ५ | आरोग्य परिचारीका | १ | १ | ५५००-१७५-९००० |
| ६ | मनोविकृती परिचारिका | १ | १ | ५५००-१७५-९००० |
| ७ | अधिपरिचारीका (प्रत्येक ४ खाटांमागे १) | ६० | ६० | ५०००-१५०-८००० |
| | **एकूण** | **८०** | **८०** | |
| **अवैद्यकीय कर्मचारी, वर्ग – ३** | | | | |
| ८ | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता | १ | १ | ५५००-१७५-९००० |
| ९ | मनोविकृती सामाजिक कार्यकर्ता | १ | १ | ५५००-१७५-९००० |
| १० | आहारतज्ज्ञ | १ | - | ५०००-१५०-८००० |
| ११ | रक्तपेढी तंत्रज्ञ | ३ | ३ | ५०००-१५०-८००० |
| १२ | क्ष-किरण तंत्रज्ञ | ३ | ३ | ५०००-१५०-८००० |
| १३ | इ. सी. जी. तंत्रज्ञ | १ | १ | ५०००-१५०-८००० |
| १४ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ३ | ३ | ५०००-१५०-८००० |
| १५ | भौतिकोपचार तज्ज्ञ | १ | १ | ५५००-१७५-९००० |
| १६ | औषध निर्माता / मिश्रक | ५ | ५ | ४५००-१२५-७००० |
| १७ | दंत आरोग्यक | १ | १ | ४०००-१००-६००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | दंत यांत्रिक | १ | १ | ३२००-४९०० |
| १९ | वाहनचालक | १ | १ | ३०५०-४५९० |
| २० | रूग्णवाहीका चालक | २ | २ | ३०५०-४५९० |
| २१ | भांडार तथा वस्त्रपाल | १ | -- | ३०५०-४५९० |
| २२ | अभिलेखापाल | १ | १ | ४५००-७००० |
| २३ | वैद्यकीय अभिलेखापाल | -- | -- | |
| २४ | वीजतंत्री | १ | -- | ३०५०-४५९० |
| २५ | स्वच्छता निरिक्षक | १ | १ | ४०००-६००० |
| २६ | दूरध्वनी चालक | २ | २ | ३२००-४९०० |
| २७ | शिंपी | १ | -- | ३०५०-४५९० |
| २८ | नळ कारागीर | १ | -- | ३०५०-४५९० |
| २९ | सुतार | १ | -- | ३०५०-४५९० |
| | **एकूण** | **३३** | **२७** | |
| **वर्ग – ४ कर्मचारी** | | | | |
| १ | मुकादम | २ | -- | २६१०-४००० |
| २ | बाह्यरूग्ण सेवक | ५ | ५ | २५५०-३२०० |
| ३ | अपघात विभाग सेवक | ६ | ६ | २५५०-३२०० |
| ४ | रक्तपेढी परिचर | २ | २ | २६१०-४००० |
| ५ | प्रयोगशाळा परिचर | २ | २ | २५५०-३२०० |
| ६ | क्ष-किरण परिचर | २ | २ | २५५०-३२०० |
| ७ | शस्त्रक्रियागृह परिचय | ३ | ३ | २७५०-४४०० |
| ८ | व्रणोपचारक | २ | २ | २७५०-४४०० |
| ९ | कक्षसेवक | २० | २० | २५५०-३२०० |
| १० | सफाईकामगार | २६ | - | २५५०-३२०० |
| ११ | शिपाई | ६ | ४ | २५५०-३२०० |
| १२ | धोबी | ३ | -- | २६१०-४००० |
| १३ | न्हावी | २ | -- | २६१०-४००० |
| १४ | मुख्य स्वयंपाकी | -- | -- | २७५०-४४०० |
| १५ | स्वयंपाकी | -- | -- | २६१०-४००० |
| १६ | सहाय्यक स्वयंपाकी | २ | -- | २५१०-३२०० |
| १७ | उदवाहन चालक | (३) | - | २६१०-४००० |
| १८ | पहारेकरी | (४) | - | २५५०-३२०० |
| १९ | माळी | (२) | - | २५५०-३२०० |
| | **एकूण** | **८३** | **४६** | |
| **प्रशासनिक विभाग** | | | | |
| १ | मुख्य प्रशासकीय अधिकारी, वर्ग – १ | -- | -- | ८०००-२७५-१३५०० |
| २ | प्रशासकीय अधिकारी, वर्ग – २ | १ | १ | ६५००-२००-१०५०० |
| ३ | कार्यालयीन अधिक्षक, वर्ग – ३ | १ | १ | ५५००-१७५-९००० |
| ४ | लघुटंकलेखक (मराठी) | १ | १ | ४०००-६००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | वरिष्ठ लिपीक | ३ | ३ | ४०००-६००० |
| ६ | कनिष्ठ लिपिक तथा टंकलेखक | ५ | ५ | ३०५०-४५९० |
| ७ | टंकलेखक | १ | १ | ३०५०-४५९० |
| ८ | लेखापाल / सहाय्यक अधिक्षक | १ | १ | ५०००-१५०-८००० |
| | **एकूण** | **१३** | **१३** | |
| | **एकूण** | **२४१** | **१९७** | |

## मासिक व वार्षिक एकूण वेतन खर्च

| अ. क्र. | पदनाम | वेतन श्रेणी | मासिक वेतन | एकूण मासिक वेतन | वार्षिक वेतन |
|---|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वर्ग – १** | | | | | |
| १ | जिल्हा शल्यचिकित्सक | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| २ | निवासी वैद्यकीय अधिकारी (चिकित्सा) | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ३ | निवासी वैद्यकीय अधिकारी | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ४ | वैद्यकीय अधिकारी (भिषक) | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ५ | वैद्यकीय अधिकारी (शस्त्रक्रिया) | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ६ | वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र) | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ७ | बालरोग तज्ञ | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ८ | अस्थिव्यंग शल्यचिकित्सक | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ९ | बधिरीकरण शास्त्रज्ञ | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| १० | क्ष-किरण शास्त्रज्ञ | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ११ | शरीरविकृती चिकित्सक | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| १२ | मनोविकृती चिकित्सक | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| १३ | वैद्यकीय अधिकारी (चर्मरोग) | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| १४ | वैद्यकीय अधिकारी (क्षयरोग चिकित्सक) | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| १५ | नेत्रशल्यचिकित्सक | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| १६ | वैद्यकीय अधिकारी (कान, नाक, घसा तज्ञ) | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| | | **एकूण** | **४४२४००** | **४४२४००** | **५३०८८००** |
| **सामान्य राज्य सेवा, वर्ग - २** | | | | | |
| १ | दंतशल्यचिकित्सक | ८०००-२७५-१३५०० | २२३४० | २२३४० | २६८०८० |
| | | **एकूण** | **२२३४०** | **२२३४०** | **२६८०८०** |
| **महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वर्ग - २** | | | | | |
| १ | वैद्यकीय अधिकारी (रक्तसंक्रमण अधिकारी धरून) | ८०००-२७५-१३५०० | २२३४० | ३३५१०० | ४०२१२०० |
| २ | अधिसेविका, वर्ग – २ | ६५००-२००-१०२०० | - | - | - |
| | | **एकूण** | **२२३४०** | **३३५१००** | **४०२१२००** |
| **वर्ग -३ शुश्रृषा विभाग** | | | | | |
| १ | अधिसेविका | ६५००-२००-१०२०० | १७६५८ | १७६५८ | २११८९६ |
| २ | सहाय्यक अधिसेविका | ६५००-२००-१०२०० | १७६५८ | १७६५८ | २११८९६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | परिसेविका | ५५००-१७५-९००० | १५००३ | २१००४२ | २५२०५०४ |
| ४ | बालरोग परिचारीका | ५५००-१७५-९००० | १५००३ | ३०००६ | ३६००७२ |
| ५ | आरोग्य परिचारीका | ५५००-१७५-९००० | १५००३ | १५००३ | १८००३६ |
| ६ | मनोविकृती परिचारिका | ५५००-१७५-९००० | १५००३ | १५००३ | १८००३६ |
| ७ | अधिपरिचारीका (प्रत्येक ४ खाटांमागे १) | ५०००-१५०-८००० | १३७०२ | ८२२१२० | ९८६५४४० |
| | | **एकूण** | **१०९०३०** | **११२७४९०** | **१३५२९८८०** |
| **अवैद्यकीय कर्मचारी, वर्ग – ३** | | | | | |
| ८ | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता | ५५००-१७५-९००० | १५००३ | १५००३ | १८००३६ |
| ९ | मनोविकृती सामाजिक कार्यकर्ता | ५५००-१७५-९००० | १५००३ | १५००३ | १८००३६ |
| १० | आहारतज्ञ | ५०००-१५०-८००० | १३७०२ | १३७०२ | १६४४२४ |
| ११ | रक्तपेढी तंत्रज्ञ | ५०००-१५०-८००० | १३७०२ | ४११००६ | ४९३२७२ |
| १२ | क्ष-किरण तंत्रज्ञ | ५०००-१५०-८००० | १३७०२ | ४११००६ | ४९३२७२ |
| १३ | इ. सी. जी. तंत्रज्ञ | ५०००-१५०-८००० | १३७०२ | १३७०२ | १६४४२४ |
| १४ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ५०००-१५०-८००० | १३७०२ | ४११००६ | ४९३२७२ |
| १५ | भौतिकोपचार तज्ञ | ५५००-१७५-९००० | १५००३ | १५००३ | १८००३६ |
| १६ | औषध निर्माता / मिश्रक | ४५००-१२५-७००० | १२३४८ | ६१७४० | ७४०८८० |
| १७ | दंत आरोग्यक | ४०००-१००-६००० | ९६४० | ९६४० | ११५६८० |
| १८ | दंत यांत्रिक | ३२००-४९०० | ७७९२ | ७७९२ | ९३५०४ |
| १९ | वाहनचालक | ३०५०-४५९० | ७४४१ | ७४४१ | ८९२९२ |
| २० | रूग्णवाहीका चालक | ३०५०-४५९० | ७४४१ | १४८८२ | १७८५८४ |
| २१ | भांडार तथा वस्त्रपाल | ३०५०-४५९० | - | - | - |
| २२ | अभिलेखापाल | ४५००-७००० | १२३४८ | १२३४८ | १४८१७६ |
| २३ | वैद्यकीय अभिलेखापाल | - | - | - | - |
| २४ | वीजतंत्री | ३०५०-४५९० | - | - | - |
| २५ | स्वच्छता निरिक्षक | ४०००-६००० | ९६४० | ९६४० | ११५६८० |
| २६ | दूरध्वनी चालक | ३२००-४९०० | ७७९२ | १५५८४ | १८७००० |
| २७ | शिंपी | ३०५०-४५९० | - | - | - |
| २८ | नळ कारागीर | ३०५०-४५९० | - | - | - |
| २९ | सुतार | ३०५०-४५९० | - | - | - |
| | | **एकूण** | **१८७९६१** | **१४४४४९८** | **४०१७५६८** |
| **वर्ग – ४ कर्मचारी** | | | | | |
| १ | मुकादम | २६१०-४००० | - | - | - |
| २ | बाह्यरूग्ण सेवक | २५५०-३२०० | ७२९६ | ३६४८० | ४३७७६० |
| ३ | अपघात विभाग सेवक | २५५०-३२०० | ७२९६ | ४३७७६ | ५२५३१२ |
| ४ | रक्तपेढी परिचर | २६१०-४००० | ६२५० | १२५०० | १५०००० |
| ५ | प्रयोगशाळा परिचर | २५५०-३२०० | ७२९६ | १४५९२ | १७५१०४ |
| ६ | क्ष-किरण परिचर | २५५०-३२०० | ७२९६ | १४५९२ | १७५१०४ |
| ७ | शस्त्रक्रियागृह परिचर | २७५०-४४०० | ७५२७ | २२५८१ | २७०९७२ |
| ८ | व्रणोपचारक | २७५०-४४०० | ७५२७ | १५०५४ | १८०६४८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | कक्षसेवक | २५५०-३२०० | ७२९६ | १४५९२० | १७५१०४० |
| १० | सफाईकामगार | २५५०-३२०० | - | - | - |
| ११ | शिपाई | २५५०-३२०० | ७२९६ | २९१८४ | ३५०२०८ |
| १२ | धोबी | २६१०-४००० | - | - | - |
| १३ | न्हावी | २६१०-४००० | - | - | - |
| १४ | मुख्य स्वयंपाकी | २७५०-४४०० | - | - | - |
| १५ | स्वयंपाकी | २६१०-४००० | - | - | - |
| १६ | सहाय्यक स्वयंपाकी | २५१०-३२०० | - | - | - |
| १७ | उदवाहन चालक | २६१०-४००० | - | - | - |
| १८ | पहारेकरी | २५५०-३२०० | - | - | - |
| १९ | माळी | २५५०-३२०० | - | - | - |
| | | **एकूण** | **६५०८०** | **३३४६७९** | **४०१६१४८** |
| **प्रशासनिक विभाग** | | | | | |
| १ | मुख्य प्रशासकीय अधिकारी, वर्ग – १ | ८०००-२७५-१३५०० | - | - | - |
| २ | प्रशासकीय अधिकारी, वर्ग – २ | ६५००-२००-१०५०० | १७६५८ | १७६५८ | २११८९६ |
| ३ | कार्यालयीन अधिक्षक, वर्ग – ३ | ५५००-१७५-९००० | १५००३ | १५००३ | १८००३६ |
| ४ | लघुटंकलेखक (मराठी) | ४०००-६००० | ९६४० | ९६४० | ११५६८० |
| ५ | वरिष्ठ लिपीक | ४०००-६००० | ९६४० | २८९२० | ३४७०४० |
| ६ | कनिष्ठ लिपिक तथा टंकलेखक | ३०५०-४५९० | ७४४१ | ३७२०५ | ४४६४६० |
| ७ | टंकलेखक | ३०५०-४५९० | ७४४१ | ७४४१ | ८९२९२ |
| ८ | लेखापाल / सहाय्यक अधिक्षक | ५०००-१५०-८००० | १३७०२ | १३७०२ | १६४४२४ |
| | | **एकूण** | **८०५२५** | **१२९५६९** | **१५५४८२८** |
| | | **एकूण** | **९२९६७६** | **३८३६०७६** | **३२७१६५०४** |

वरीलप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्र (टेंबा) भाईंदर (प.) येथील प्रस्तावित २०० खाटांच्या रूग्णालयाला आवश्यक कर्मचारी आकृतीबंध प्रस्ताव पदनिर्मितीसाठी शासनाकडे पाठविणेस हि सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :-**          **अनुमोदन :-**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला,**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

[illegible] [illegible]

[illegible]

६९

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/११/२००९

**प्रकरण क्र. ३५ :-** सन्मा. सदस्य श्री. शेख नुर मोहम्मद यांचे दिनांक १६/११/२००९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मे. R.N.A. (A.A.) बिल्डर्स यांच्या अनधिकृत बांधकाम व सदोष S.T.P. बाबत धोरणात्मक कारवाई करणेबाबत, तसेच दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत.

**(सन्मा. सदस्य श्री. शेख नुर मोहम्मद हे गैरहजर असल्याने सदरचा विषय फेटाळण्यात आला.)**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०७/०१/२०१०

प्रकरण क्र. ३६ :- दि. ११/१२/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

(भिवंडी पूर्व विधानसभेची आचारसंहिता लागल्याने सभा रद्द करण्यात आली.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०७/०१/२०१०

प्रकरण क्र. ३७ :- सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी मा. स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम २३ अन्वये एका सदस्याची उर्वरित कालावधीसाठी नेमणूक करणे.

(भिवंडी पूर्व विधानसभेची आचारसंहिता लागल्याने सभा रद्द करण्यात आली.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०७/०१/२०१०

प्रकरण क्र. ३८ :- केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत येणाऱ्या बस मार्गस्थ करणेच्या धोरणाबाबत.

(भिवंडी पूर्व विधानसभेची आचारसंहिता लागल्याने सभा रद्द करण्यात आली.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०७/०१/२०१०

प्रकरण क्र. ३९ :- मिरा रोड येथिल रूग्णालय इमारतीत रक्तपेढी चालविण्यासाठी अशासकिय संस्थांना चालविण्यास देण्याकरिता विचार विनिमय होणेबाबत.

(भिवंडी पूर्व विधानसभेची आचारसंहिता लागल्याने सभा रद्द करण्यात आली.)

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०७/०१/२०१०

प्रकरण क्र. ४० :- मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मे. रिलायन्स एनर्जी लि. कंपनी मार्फत देखभाल व दुरूस्ती करण्यात येत असलेले स्ट्रीट लाईट पोल मनपाच्या ताब्यात घेवून खाजगी ठेकेदारास वार्षिक ठेकापद्धतीने देखभाल व दुरूस्तीसाठी देणे व टाटा पावर कंपनीकडून वीज पुरवठा घेणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

(भिवंडी पूर्व विधानसभेची आचारसंहिता लागल्याने सभा रद्द करण्यात आली.)

75

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०७/०१/२०१०

प्रकरण क्र. ४१ :- उत्तन येथिल घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालानुसार शिफारशींची अंमलबजावणी करणे कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणे.

(भिवंडी पूर्व विधानसभेची आचारसंहिता लागल्याने सभा रद्द करण्यात आली.)

76

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/०२/२०१०

अभिनंदन ठराव :- ४२ (अ)

**विषय :-** **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखा परिक्षण विभागास ISO 9001-2000 प्रमाणपत्र मिळालेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने ISO 9001-2000 या प्रमाणपत्रासाठी इंटरटेक या संस्थेकडे दि. ०१/०८/२००७ रोजी नोंदणी केलेली होती. या संस्थेने या कालावधीपासून महानगरपालिकेच्या लेखापरिक्षण विभागाची तपासणी चालू ठेवलेली होती त्यानुसार आवश्यक बाबींची पूर्तता केल्याने महानगरपालिकेस दि. ०३/११/२००९ पासून ISO 9001-2000 प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. ह्याचे सर्वस्वी श्रेय महानगरपालिकेचे मा. आयुक्त व मुख्य लेखा परिक्षक श्री. दादासाहेब आनंदराव पाटील यांना व त्यांच्या कर्मचाऱ्यांना जात आहे. ISO 9001-2000 हे प्रमाणपत्र मिरा भाईंदर महानगरपालिकेस मिळणे ही बाब महापालिकेसाठी अभिमानास्पद आहे. तरी याबाबत त्यांचे अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

सुचक :- भगवती शर्मा

अनुमोदक :- एस. ए. खान

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२०१०.

प्रकरण क्र. ४२ :- दि. ११/१२/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ८३ :-

दि. ११/१२/२००८ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. भगवती शर्मा

अनुमोदन :- श्री. अनिल सावंत

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२०१०

**प्रकरण क्र. ४३ :-** सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी मा. स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम २३ अन्वये एका सदस्याची उर्वरित कालावधीसाठी नेमणूक करणे.

**ठराव क्र. ४४:-**

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा दि. ०२/१२/२००९ रोजी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या स्थायी समिती सदस्य पदावर संयुक्त लोकशाही आघाडीच्या सदस्या सौ. सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू यांची उर्वरित कालावधीसाठी नेमणूक करण्यात येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**पिठासिन अधिकारी**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२०१०

**प्रकरण क्र. ४३ :-** सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी मा. स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम २३ अन्वये एका सदस्याची उर्वरित कालावधीसाठी नेमणूक करणे.

**ठराव क्र. ४४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा दि. ०२/१२/२००९ रोजी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या स्थायी समिती सदस्य पदावर संयुक्त लोकशाही आघाडीच्या सदस्या सौ. सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू यांची उर्वरित कालावधीसाठी नेमणूक करण्यात येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**पिठासिन अधिकारी**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

४०


**श्री. शफीक अहमद सादत खान**
बी.ए.एल.एल.बी.
**अध्यक्ष**
**प्रभाग समिती क्र. 4**
प्रतोद / गटनेता - संयुक्त लोकशाही आघाडी
मिरा भाईंदर महानगरपालिका
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय,
छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

नशेमन को. ऑप. हौ. सोसायटी लि., फ्लॅट नं. G -1, बि. नं. 52, नया नगर, स्टेशन रोड, मिरारोड (पूर्व), ता. जि. ठाणे - 401 107.
दूरध्वनी (निवास) : 2811 0336 कार्यालय : 2855 4173 मोबाईल : 9322668845 / 20642821


जावक क्र. 2009-10 दिनांक : 11-2-2010

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. महासभा दि. 11. 02. 2010

प्रकरण क. 43 ः
ठराव ः

प्रति,
मा. नगर सचिव साहेब,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सदस्या. सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा दि. 02. 12. 2009. रोजी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर सयुक्त लोकशाही आघाडीच्या सदस्या सौ. सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू यांची उर्वरित कालावधीसाठी नेमणूक करण्यात यावी.

कृपया याची नोंद घ्यावी.

मंजूर
[illegible]

आपला विश्वासू,

श्री. शफीक अहमद सादत खान
अध्यक्ष
प्रभाग समिती क. 4
गटनेता
संयुक्त लोकशाही आघाडी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/०२/२०१०

**प्रकरण क्र. ४४ :-** **परिवहन समितीवर नगरसेवक किंवा बाहेरुन सदस्य घेणेबाबत धोरण ठरविणेबाबत विचार विनिमय करणे.**

**ठराव क्र. ४५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन समितीवरील निम्मे ६ (सहा) सदस्य माहे फेब्रुवारी २००९ च्या पहिल्या तारखेस निवृत्त झाले आहेत. निवृत्त झालेल्या सदस्यांच्या जागी प्रशासनाने नेमकी कोणती पध्दत अवलंबावी याबाबत नगरविकास विभागाकडून मार्गदर्शन मागविण्यात आलेले होते. क्र. मिभामनपा/११०९/२५९/नवि-२८ नगरविकास विभाग दि. २० जानेवारी २०१० नुसार मा. उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र. ५१७५/२००७ प्रकरणी दि. २५/०७/२००७ रोजी दिलेला निर्णय व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २५ मधील तरतुदीकडे लक्ष वेधले आहे.

परिवहन समितीवर पालिका सदस्य म्हणून निवडून आलेल्या सदस्यांमधून काही सदस्य नियुक्त / नेमणूक करावयाचे असतील तरच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१(अ) मधील तरतुदी लागू होतील. तथापी महानगरपालिकेने रिक्त पदांवरील नियुक्तीसाठी पालिका सदस्य म्हणून बाहेरुन सदस्यांची नियुक्ती करावयाचे ठरविल्यास कलम ३१(अ) च्या तरतुदी लागू होणार नाहीत. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन समितीवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २५ (२) मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या मते ज्यांना प्रशासनाचा किंवा परिवहनाचा अनुभव असेल व अभियांत्रिकी, औद्योगिक, वाणिज्यिक, वित्तीय किंवा कामगार विषयक बाबतीत ज्यांची क्षमता दिसून आली असेल व जे पालिका सदस्य नसतील अशा व्यक्तिंमधून परिवहन समितीवर सदस्य नेमणूक करण्यात यावी. सदरची नेमणूक ही गुप्त मतदान पध्दतीने घेण्यात यावी. सदरचा ठराव फक्त ह्या वर्षीच्या परिवहन सदस्य नेमणूकीसाठी लागू राहील. व ठरावानुसार परिवहन सदस्य निवडणुकीच्या कार्यक्रम तातडीने घ्यावा. असा ठराव मांडीत आहे.

सुचक :- अनुमोदन :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(पथदिवे)" या लेखाशिर्षकात रु.१८००.०० लक्ष इतकी तरतुद करण्यात आली असून सद्यस्थितीत रु.१७,३०,१३,०४०/- इतकी तरतूद शिल्लक आहे.

वरील कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास व वार्षिक मुदतीच्या

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२०१०

**प्रकरण क्र. ४५ :-** राज्य ग्रंथालय परिषदेवर २ सदस्य नामनियुक्त करणेबाबत.

**ठराव क्र.४६:-**

या प्रकरणा संबंधी कोणतीही परिपूर्ण माहिती गोषवाऱ्यामध्ये दिलेली नसून हा विषय ग्रंथालयाशी संबंधीत असल्यामुळे नामनियुक्त सदस्यांची शैक्षणिक पात्रता व त्यांची जबाबदारी याबाबती काहीही माहिती देण्यात आलेली नाही. म्हणून प्रकरण क्र. ४५ चा ठराव परिपूर्ण माहिती घेवून पुढील मा. महासभेमध्ये आणावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- अनुमोदक :-

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

८३

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.१९/०२/२०१०

**प्रकरण क्र. ( ४९ ) - आरक्षण क्र. ९१ (स्टेडीयम) करिता जागा भूसंपादन करणेबाबत विचार विनिमय करणे.**

**ठराव क्र. ८७ -**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि.१४/०५/९७ अन्वये व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दि.१५/०७/९७ व दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

मंजूर विकास योजनेत मौजे - भाईंदर, स.क्र. २२९(७५८), २३०(७५७) या जागेत आ.क्र. ९१ (स्टेडीयम), क्षेत्र १८ हे., ४५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता, पूर्वेकडे रहिवास विभाग, भागशः स्मशानभूमी विस्तारीकरण व आ.क्र. ८९ (स्मशानभूमी विस्तारीकरण), क्षेत्र ०.७७ हे. व उर्वरीत जागा नाविकास विभागात सामाविष्ट होत आहे.

सदरची जागा तात्कालीन नगरपरिषदेने सरकारी जागा समजून जागेची मागणी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे दि.०८/०९/१९९३ रोजी केलेली होती. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी आदेश क्र. महसूल/कक्ष-१/मेज-१/एलबीपी/विकास आराखडा/२/९४/२१/३-९४ अन्वये मौजे भाईंदर, स.क्र. २२९पै., २३०पै. स्टेडीयम १८.० हे. ही जागा तात्कालीन नगरपरिषदेच्या ताब्यात देण्यात आलेली होती. तथापी, सदरची जागा निश्चितपणे सरकारी नाही, असे मा. जिल्हाधिकार, ठाणे यांचे निदर्शनास आल्याने पत्र क्र. महसूल/कक्ष-१/मेज-१/एलबीपी/वि.आ./२/९४, दि.१५/०९/९४ व दि.२१/०३/९४ अन्वयेचा आदेश रद्द करुन जमीनीचा ताबा देवू नये, असे आदेश नगरपरिषदेस देणेत आलेले होते.

त्यानंतर, तात्कालीन नगरपरिषद कालावधीपासून तसेच महानगरपालिका स्थापनेपासून सॉल्ट विभाग, मा. जिल्हाधिकारी, ठाणे, मंडळ अधिकारी - ३, विभागाशी संपर्क साधून पत्रव्यवहार करुनही जागेच्या मालकीबाबत निश्चितपणे बोध होत नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या ताब्यात जागा येण्यास विलंब होत आहे. तसेच सदरची जागा सि.आर.झेड. ने बाधीत होत असल्याने विकसीत करणेपूर्वी मा. शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत साधारणतः ७ ते ८ एकर जमीन महानगरपालिकेच्या ताब्यात असून वापर सुरु आहे. तथापी, जागा महानगरपालिकेच्या ताब्यात नसल्याने व सि.आर.झेड. ने बाधीत असल्याने स्टेडीयम विकसीत करणेस अडथळा निर्माण होत आहे.

त्यामुळे जागा मालकीचा संभ्रम पाहता व जागा सि.आर.झेड. ने बाधीत होत असल्याने महानगरपालिकेची तातडीची निकड लक्षात घेता व लोकप्रतिनिधी सर्वसामान्य जनता याची गरज लक्षात घेता, प्रशासनाने तातडीने शासनाकडे प्रस्ताव सादर करुन सि.आर.झेड. मंजूरीबाबत व विनामुल्य जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबत प्रशासनाने तातडीने मा. शासनाचे प्रस्ताव सादर करणे व विनामुल्य जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे व जागेचा आगाऊ ताबा महानगरपालिकेकडे देणेबाबत प्रस्ताव शासनाकडे सादर करणेकामी किंवा भूसंपादन व कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन आरक्षण क्र. ९१ (स्टेडीयम) ची जागा ताब्यात घेण्यास ही महासभा मंजूरी देत आहे.

सुचक - अनुमोदक

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

84

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.१५/०२/२०१०

**प्रकरण क्र.(४७) - ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे झाली आहे अशा कर्मचा-यांना मोफत घरे देण्याबाबत.**

**ठराव क्र.४८ -**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/युडी-१२, दि.१४/०५/९७ तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर झालेली असून ती अनुक्रमे दि.१५/०७/९७ व दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. सदर विकास योजनेत एकूण १९ महसूली गावांचा समावेश असून महानगरपालिकेच्या क्षेत्राची व्याप्ती ७९४०.५६ हेक्टर इतकी आहे.

सदर मंजूर विकास योजनेमधील जागांवर सफाई कामगारांसाठी सेवेत असतांना सेवा निवासस्थाने बांधण्याचा तसेच सेवानिवृत्तीनंतर २५ वर्षे सेवा झाली असल्यास मालकी तत्वावर मोफत सदनिका देणेसाठीच्या गृहयोजनेबाबत शासनाने (पत्र क्र. सकानि-२००७/प्र.क्र.१७६/२००७/नवि-६, दि.२२/१०/२००७ अन्वये निर्देश दिलेले आहेत. शासनाच्या निर्देशाची व नियमावलीची छायाप्रत सोबत सादर.

महानगरपालिकेतील सफाई कामगारांसाठी सेवेत असतांना सेवा निवासस्थाने बांधण्याचा तसेच सेवानिवृत्तीनंतर २५ वर्षे सेवा झाली असल्यास मालकी तत्वावर मोफत सदनिका देण्याबाबत दि.२२/१०/२००८ च्या शासन निर्णयाद्वारे शासनाने निर्णय घेतला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभा दि.२०/०२/२००९ चे प्रकरण क्र. ९७ व ठराव क्र. ८९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महानगरपालिकेने विकसकांना जाहीर आव्हान करुन योजनेत सहभागी होणेस सुचित केले आहे. त्यानुसार काही विकासक सदर योजनेत सहभागी होणेस इच्छुक आहेत. त्यानुसार मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये एम.एम.आर.डी.ए. च्या रेन्टल हाऊसिंगच्या धर्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजनेतील २६९.०० चौ.फुटाचे सदनिका करिता फक्त मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना विकास नियंत्रण नियमावलीत श्रम साफल्य सदनिकाकरिता विकास नियंत्रण नियमावलीत सवलत देणेचे अधिकार राहातील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजनेत प्राप्त होणा-या मोफत सदनिकेच्या उपलब्ध होणारा वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय क्षेत्रात वापरता येईल. त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार विकास नियंत्रण नियमावलीत बदल करण्यास परवानगी देण्याबाबतची विनंती शासनास सादर करणेकामी ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक -** श्री. भगवती शर्मा

**अनुमोदक -** श्री. एस. ए. खान

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

85

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि.११/०२/२०१०

प्रकरण क्रमांक ( ४८ ) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रिलायन्स एनर्जी लि. कंपनी मार्फत देखभाल दुरुस्ती करण्यात येत असलेले स्ट्रीट लाईट पोल मनपाच्या ताब्यात घेवून खाजगी ठेकेदारास वार्षिक ठेकापध्दतीने देखभाल व दुरुस्तीसाठी देणे व टाटा पावर कंपनीकडून वीज पुरवठा घेणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. ( ४९ ) :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत रिलायन्स एनर्जी लि. मार्फत वीजपूरवठा करण्यात येतो तसेच उपनगरच्या धर्तीवर सार्वजनिक रस्त्यावर महानगरपालिकेच्या शिफारसीवरुन सार्वजनिक रस्त्यावर स्वखर्चाने स्ट्रीट लाईट बसविण्यात येते. रस्त्यावरील केबल्स, स्ट्रीट लाईट पोल देखिल महानगरपालिकेच्या मागणीनुसार स्वखर्चाने स्थलांतरीत करण्यात येतात.

मिरा भाईंदर महानगरपालिकेस रिलायन्स एनर्जी लि. यांचे कडील स्ट्रीट लाईट पोल विकत घ्यावयाचे असल्यास स्ट्रीट लाईट पोल व केबलची किंमत तसेच रिलायन्स एनर्जी लि. ची सर्व प्रलंबित देयके तातडीने करावी लागतील महानगरपालिकेची सदर रक्कम भरण्याची आर्थिक स्थिती नाही.

या करीता सर्वप्रथम टाटा पावरकडे महानगरपालिकेमार्फत रिलायन्स एनर्जी लि. यांना स्ट्रीट लाईट पोल व सर्व प्रलंबित देयके भरण्याची तयारी आहे. याबाबत विचारणा करावी तसेच महानगरपालिकेने स्वतःच्या मालमत्ताना टाटा पावर कडून वीजपूरवठा घेतल्यास त्याचा दर काय राहील ? याबाबत सुध्दा माहिती घ्यावी. स्ट्रीट लाईट पोलचे टाटा पावर मार्फत सर्व रक्कम भरुन रिलायन्सच्या धर्तीवर चालविण्यास तयार आहेत का ? व स्ट्रीट लाईट पोलवर जाहीरात करण्यास महानगरपालिकेस परवानगी देणार का ? याबाबत टाटापावरकडे विचारणा करुन सर्व लेखी माहिती घेऊन सदर प्रस्ताव पुन्हा महासभेपुढे ठेवण्यात यावा.

सुचक :-

श्री. भगवती शर्मा

अनुमोदन :-

श्री. लक्ष्मण जंगम

ठराव सर्वानूमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२०१०

प्रकरण क्र. ४९ :- उत्तन येथील घनकचरा प्रकल्प ठिकाणी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालानुसार अंमलबजावणी करणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

ठराव क्र. ५० :-

सदर प्रकल्पाला खर्च रु. ७ करोड २७ लाख ५८ हजार ५४६ रु. इतका खर्च दाखवलेला असून या प्रकल्पाचा करार हेंजर बायोटेक या कंपनी बरोबर झालेल्या बीओटी च्या करारानुसार ठरले असून उपरोक्त काम करणे हे त्या हेंजर बायोटेकच्या ठेकेदाराची जबाबदारी आहे. त्यामुळे हे काम त्याच्याकडून करुन घ्यावे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- डॉ. राजेंद्र जैन

अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दिनांक ११/०२/२०१०

**विषय :- केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत येणाऱ्या बस मार्गस्थ करणेच्या धोरणाबाबत....**

**प्रकरण क्रमांक ५० :-**

**ठराव क्रमांक ५९ :-**

केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहरातील नागरिकांना परिवहन सेवा उपलब्ध करुन देण्याकरिता ५० बस खरेदि करण्याचे प्रयोजन केले आहे व त्या प्रस्तावास केंद्र शासन व राज्य शासन यांनी मंजुरी दिली आहे. सदर मंजुरीच्या अनुषंगाने ५० बस खरेदि (५० चेसीज़ खरेदि करणे व ५० बस चेसीजवर बॉडि बिल्डिंग करणेच्या दोन स्वतंत्र्य कामाकरिता) करण्याच्या दृष्टीकोनातुन महानगरपालिकेने राज्य स्तरिय दैनिक वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन संबधितांकडून देकार मागवण्यात आले होते. प्राप्त झालेल्या देकारांबाबत आवश्यक ती सर्व कार्यवाहि पूर्ण करुन प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर मंजुरी करिता ठेवला असता ठराव क्रमांक :- ७६, दि. १७/१२/२००९ अन्वये मा. स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. सदर प्रकल्पाकरिता एकूण खर्चाच्या ३५% व १५% रक्कम अनुक्रमे केंद्र शासन व राज्य शासन अनुदानाच्या स्वरुपात देणार असुन उर्वरित ५०% रक्कम महानगरपालिकेस उभारांवयाची आहे. केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत घ्यावयाच्या बस पी.पी.पी. (Public Private Partnership) तत्वावर मार्गस्थ करण्याचे शासनाने निश्चित केले आहे व त्यामुळे प्रकल्पाबाबत महानगरपालिकेवर कोणत्याहि स्वरुपाचा आर्थिक भार पडणार नाहि. याबाबत माहनगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

प्रकल्पाअंतर्गत घ्यावयाच्या ५० बस पी.पी.पी. तत्वावर मार्गस्थ करावयाच्या प्रस्तावाकरिता तीन पध्दती आहेत.... १) ५०% गुंतवणूक, २) ७५% गुंतवणूक व ३) १००% गुंतवणूक. याबाबत विस्तृत :- प्रकल्पा करिता येणाऱ्या खर्चापैकी मा. महासभेने मंजुरी दिलेल्या धोरणत्मक निर्णयाच्या अनुषंगाने वरिल प्रमाणातील गुंतवणूकीची रक्कम खाजगी संस्थांकडून महानगरपालिकेने उभारावयाची व त्या खाजगी संस्थांनी मा. महासभेच्या धोरणात्मक निर्णयास अधीन राहून निश्चित केलेल्या दराने महानगरपालिकेस रॉयल्टी द्यावयाची. सदर पी.पी.पी. तत्वावर बस सुरु करणेकरिता चालक, वाहक, तिकिट तपासनीस, कार्यालयीन कर्मचारी, देखभाल-दुरुस्ती, इंधन, वंगण, बस डेपोकरिता जागा व अन्य LIABILITY संबधीत कंत्राटदारावरच राहिल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेच आर्थिक हित जोपासले जाईल. प्रकल्पात कार्यरत असणाऱ्या सर्व कर्मचारी/अधिकारी यांना अदा करावयाचे किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी, वैद्यकिय सुविधा, बोनस, गणवेष इत्यादि बाबतचे दायीत्व कंत्राटदारावर राहिल्याने त्याबाबत भविष्यात उद्‌भवू शकरणाऱ्या समस्यांना महानगरपालिकेस सामोरे जावे लागणार नाहि. सदर प्रकल्प पी.पी.पी. तत्वावर सुरु केल्यास महानगरपालिकेने उभारलेली रक्कम कंत्राटदार गुंतवणुकीच्या माध्यमातुन महानगरपालिकेस देईल व त्यामुळे कोणताहि आर्थिक भार न सोसता महानगरपालिकेस **"रॉयल्टी"** च्या रुपाने उत्पन्न प्राप्त होणार आहे.

केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत बस खरेदि करण्याच्या प्रकल्पास खालिलप्रमाणे खर्च होणार आहे....

| अ. क्र. | बसची संख्या | प्रकल्पाचा खर्च | | | | प्रकल्पाकरिता केंद्र शासनाने अंदाजलेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| | | चेसीज | बॉडी बिल्डिंग | एकुण खर्च | ५० बस करिता | |
| १. | ५० | रु. १२,८७,५७६/- प्रती चेसीज | रु. ६,९०,०००/- प्रती बस | रु. १९,७७,५७६/- प्रती बस | रु. ९,८८,७८,८००/- | रु. ११,००,००,०००/- |

प्रकल्पाच्या वरिल खर्चाची रक्कम उभारणेबाबत.....

| अ. क्र. | प्रकल्पाचा एकुण खर्च | केंद्र शासन अनुदान ३५% | राज्य शासन अनुदान १५% | मनपास सुरुवातीस उभारावयाची रक्कम ५०% | पी.पी.पी. च्या माध्यमातुन उभारावयाची रक्कम (१००% गुंतवणूक) |
|---|---|---|---|---|---|
| १. | रु. ९,८८,७८,८००/- ५० बस करिता | रु. ३,४६,०७,५८०/- | रु. १,४८,३१,८२०/- | रु. ४,९४,३९,४००/- | रु. ४,९४,३९,४००/- |

केंद्रशासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत ५० बस खरेदि करणेकरिता महानगरपालिकेने उभारावयाची रक्कम पी.पी.पी. तत्वावर उभारावयाची असल्याने ती १०० टक्के रक्कम खाजगी संस्थेने गुंतवणूक करुन महानगरपालिकेच्या ५० बस परवानगी प्राप्त मार्गावर मार्गस्थ कराव्यात व त्यापोटि महानगरपालिकेस घ्यावयाचा रॉयल्टीचा दर व पद्धत निश्चित करणेची कार्यवाहि मा. आयुक्त सो., व मा. स्थायी समितीने संयुक्तपणे करणेचे अधिकार हि महासभा देत आहे. देकार धारकाने बस पार्किंग करिता (डेपो) स्वतःहा पुरेशी जागा उपलब्ध करावयाची आहे. तसेच तिकिट दराबाबत मा. महासभेची अनुमती व एकत्रित परिवहन प्राधिकरणाची मंजुरी प्राप्त झालेल्या दरानेच तिकिट विक्री करावी लागेल. तिकिटांची छपाई महानगरपालिकेकडून करुन घ्यावी लागेल व त्याच्या खर्चाची रक्कम देकार धारकाने महानगरपालिकेकडे जमा करावी. मंजुर देकार धारकाने गरजेनुसार तिकिटांची मागणी महानगरपालिकेकडे करावी व तिकिट घेणेच्या वेळी रॉयल्टिची रक्कम महानगरपालिकेकडे अगोदर भरणा करणे आवश्यक राहिल. तसेच जो देकारधारक जास्तीत जास्त दराने रॉयल्टी देईल त्याच्या देकारास मंजुरी देण्यात येईल

याकामी स्थानिक व राज्य स्तरिय वर्तमानपत्रात तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या वेब साईटवर निविदा सूचना प्रसिद्ध करुन इच्छूकांकडून देकार मागवणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास हि महासभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

सूचक :- (श्री. लक्ष्मण जंगम)

अनुमोदक :- (श्री. भगवती शर्मा)

**ठराव वाचून कायम केला**

**महापौर,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**

D:\My Document S.A. Tayshete Gothwara-Tarav\Tarav - Adhikari-Karmachari 27-10-09.doc

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२०१०

**प्रकरण क्र. ५१ :-** **मिरारोड येथील रूग्णालय इमारतीत रक्तपेढी चालविण्यासाठी अशासकीय संस्थांना चालविण्यास देणेकरिता विचार विनिमय होणेबाबत.**

**ठराव क्र. ५२ :**

मिरा भाईदर महानगरपालिकेच्या आरक्षण क्र. १९२, १९३ मध्ये रूग्णालयाची इमारत बांधून तयार झालेली आहे. सदर इमारतीत तळमजल्यावर रक्तपेढी सुरू करणे प्रस्तावित आहे. रक्तपेढीतील अंतर्गत बांधकाम जवळपास पूर्ण झालेले आहे. तसेच रक्तपेढी चालविण्यासाठी आवश्यक 1. Central Drugs Standard Control Organization Govt. of India 2. State Blood Transfusión Council Govt. of Maharashtra यांची परवानगी घेण्यात आलेली आहे.

सदर रक्तपेढी रूग्णालयाच्या सोबत चालू करणे गरजेचे आहे. ही रक्तपेढी अनुभवी अशासकीय संस्थेस योग्य त्या अटीशर्तीनुसार चालविण्यास दिल्यास आर्थिक बचत होईल. तसेच त्यांच्या अनुभवाचा फायदा महापालिकेस होईल.

तरी अशासकीय संस्थेस रक्तपेढी सुरु करणेकरिता आवश्यक जागा, अखंडीत विज जोडणी, पाणी जोडणी, दुरध्वनी जोडणी, फर्निचर (टेबल, खुर्ची, रॅक्स), वातानुकुलन यंत्रे, उपकरणे व साहित्य, संगणक सुवीधा महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात याव्यात तसेच विज, दुरध्वनी यांचे मासिक देयक, द्रावणे तपासणी किट्स इतर आवश्यक सर्व साहित्य व परवाने मंजूरी अशासकीय संस्थेने पुरवठा करून रक्तपेढी सुरू करावी व त्यासाठी रक्ताचा कमीत कमी दर देणाऱ्या अशासकीय संस्थेस रक्तपेढी चालविण्याची जाहिर निविदा राज्यस्तरिय, जिल्हास्तरिय जास्त खप असणाऱ्या दैनिकात प्रसिध्दी कराव्यात. तसेच महानगरपालिकेच्या दाखल रूग्णांना रक्तपेढीनी मोफत रक्त पुरवठा करण्यात यावा व इतर महानगरपालिका हद्दीतील रूग्णांना कमीत कमी दरात रक्त पुरवठा करावा याबाबत ठराव मांडत आहे.

**सुचक :-** **अनिल सावंत** **अनुमोदक :- भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

(स्वाक्षरी)

महापौर

**मिरा भाईदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/०२/२०१०

**प्रकरण क्र. ५१ :-** **मिरारोड येथील रूग्णालय इमारतीत रक्तपेढी चालविण्यासाठी अशासकीय संस्थांना चालविण्यास देणेकरिता विचार विनिमय होणेबाबत.**

**ठराव क्र. ५२ :**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरक्षण क्र. १९२, १९३ मध्ये रूग्णालयाची इमारत बांधून तयार झालेली आहे. सदर इमारतीत तळमजल्यावर रक्तपेढी सुरू करणे प्रस्तावित आहे. रक्तपेढीतील अंतर्गत बांधकाम जवळपास पूर्ण झालेले आहे. तसेच रक्तपेढी चालविण्यासाठी आवश्यक 1. Central Drugs Standard Control Organization Govt. of India 2. State Blood Transfusión Council Govt. of Maharashtra यांची परवानगी घेण्यात आलेली आहे.

सदर रक्तपेढी रूग्णालयाच्या सोबत चालू करणे गरजेचे आहे. ही रक्तपेढी अनुभवी अशासकीय संस्थेस योग्य त्या अटीशर्तीनुसार चालविण्यास दिल्यास आर्थिक बचत होईल. तसेच त्यांच्या अनुभवाचा फायदा महापालिकेस होईल.

तरी अशासकीय संस्थेस रक्तपेढी सुरू करणेकरिता आवश्यक जागा, अखंडीत विज जोडणी, पाणी जोडणी, दुरध्वनी जोडणी, फर्निचर (टेबल, खुर्ची, रॅक्स), वातानुकुलन यंत्रे, उपकरणे व साहित्य, संगणक सुवीधा महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात याव्यात तसेच विज, दुरध्वनी यांचे मासिक देयक, द्रावणे तपासणी किट्स इतर आवश्यक सर्व साहित्य व परवाने मंजूरी अशासकीय संस्थेने पुरवठा करून रक्तपेढी सुरू करावी व त्यासाठी रक्ताचा कमीत कमी दर देणाऱ्या अशासकीय संस्थेस रक्तपेढी चालविण्याची जाहिर निविदा राज्यस्तरिय, जिल्हास्तरिय जास्त खप असणाऱ्या दैनिकात प्रसिध्दी कराव्यात. तसेच महानगरपालिकेच्या दाखल रूग्णांना रक्तपेढीनी मोफत रक्त पुरवठा करण्यात यावा व इतर महानगरपालिका हद्दीतील रूग्णांना कमीत कमी दरात रक्त पुरवठा करावा याबाबत ठराव मांडत आहे.

**सुचक :- अनिल सावंत** **अनुमोदक :- भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२०१०

**प्रकरण क्र. ५१ :- मिरारोड येथील रूग्णालय इमारतीत रक्तपेढी चालविण्यासाठी अशासकीय संस्थांना चालविण्यास देणेकरिता विचार विनिमय होणेबाबत.**

ठराव क्र. ५२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरक्षण क्र. १९२, १९३ मध्ये रूग्णालयाची इमारत बांधून तयार झालेली आहे. सदर इमारतीत तळमजल्यावर रक्तपेढी सुरु करणे प्रस्तावित आहे. रक्तपेढीतील अंतर्गत बांधकाम जवळपास पूर्ण झालेले आहे. तसेच रक्तपेढी चालविण्यासाठी आवश्यक १. Central Drugs Standard Control Organization Govt. of India २. State Blood Transfusión Council Govt. of Maharashtra यांची परवानगी घेण्यात आलेली आहे.

सदर रक्तपेढी रूग्णालयाच्या सोबत चालू करणे गरजेचे आहे. ही रक्तपेढी अनुभवी अशासकीय संस्थेस योग्य त्या अटीशर्तीनुसार चालविण्यास दिल्यास आर्थिक बचत होईल. तसेच त्यांच्या अनुभवाचा फायदा महापालिकेस होईल.

तरी अशासकीय संस्थेस रक्तपेढी सुरु करणेकरिता आवश्यक जागा, अखंडीत विज जोडणी, पाणी जोडणी, दुरध्वनी जोडणी, फर्निचर (टेबल, खुर्ची, रॅक्स), वातानुकुलन यंत्रे, उपकरणे व साहित्य, संगणक सुवीधा महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात याव्यात तसेच विज, दुरध्वनी यांचे मासिक देयक, द्रावणे तपासणी किट्स इतर आवश्यक सर्व साहित्य व परवाने मंजूरी अशासकीय संस्थेने पुरवठा करून रक्तपेढी सुरु करावी व त्यासाठी रक्ताचा कमीत कमी दर देणाऱ्या अशासकीय संस्थेस रक्तपेढी चालविण्याची जाहिर निविदा राज्यस्तरिय, जिल्हास्तरिय जास्त खप असणाऱ्या दैनिकात प्रसिध्दी कराव्यात. तसेच महानगरपालिकेच्या दाखल रूग्णांना रक्तपेढीनी मोफत रक्त पुरवठा करण्यात यावा व इतर महानगरपालिका हद्दीतील रूग्णांना कमीत कमी दरात रक्त पुरवठा करावा याबाबत ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. अनिल सावंत

अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

51

# मिरा भाईंदर महानगरपालिका ९२

## मा. महासभा दि. ११/०२/२०१०

**प्रकरण क्र. (५२) – मिरा भाईंदर शहरासाठी विकास नियंत्रण नियमावलीत हॉस्पीटल, शाळा, कॉलेज व सार्वजनिक सोई सुविधा करिता वापर करण्यात येणा-या इमारतींना वाढीव चटईक्षेत्र मिळणेबाबत.**

ठराव क्र. ५३ –

मिरा भाईंदर शहराची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि.१४/०५/९७ अन्वये व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दि.१५/०७/९७ व दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण १९ महसूली गावांचा समावेश असून एकूण क्षेत्र ७९४०.५६ हे. आहे. त्यापैकी २१३४.७९ हे. क्षेत्र हे मंजूर विकास योजना प्रमाणे विकसनशील (Developable) क्षेत्र आहे.

सदर विकसनशील क्षेत्रापैकी बहूतांश भाग हा सि.आर.झेड. ने तसेच सॉल्ट विभागाच्या जमीनीनी बाधीत होत आहेत. तसेच मंजूर विकास योजनेत एकूण ३८६ आरक्षणे असून त्यापैकी १५६ आरक्षणे सि.आर.झेड. ने बाधीत होत आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका ही मुंबई व ठाणे महानगरपालिकेच्या लगत असल्याने शहराचा विकास झपाट्याने होत आहे. लोकसंख्या वाढीचा वेग शहराचा दशकातील २९७% असा आहे. आजमितीस शहराची लोकसंख्या सुमारे १० लक्ष इतकी आहे. महानगरपालिका क्षेत्रात लोकसंख्येच्या मानाने अद्यावत हॉस्पीटल, शाळा, कॉलेज नाहीत. तसेच विकसनशील क्षेत्र सि.आर.झेड. सॉल्ट विभागाने प्रभावित असल्यामुळे फक्त २५% इतकेच क्षेत्रावर विकास होवू शकतो. शहरात हॉस्पीटल, शाळा, कॉलेज, सार्वजनिक सोईसुविधा विकसीत करण्याकरिता आवश्यकते प्रमाणे जमीन उपलब्ध नाही. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार शासनाने दि.०८/०२/२०१० अन्वये निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार हॉस्पीटल बांधणेकरिता वाढीव म्हणजे ३.० (म्हणजे मुळ मंजूर १.० + वाढीव १.० + वाढीव १.०) चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध झाल्यास मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना वाढीव लोकसंख्येप्रमाणे जास्त प्रमाणात सोईसुविधा उपलब्ध होवू शकतील. सदर विषयाच्या अनुषंगाने हॉस्पीटल, शाळा, कॉलेज, सार्वजनिक सोईसुविधा करिता इमारतींना ३.० चटईक्षेत्र निर्देशांक मिळावा असा विकास नियंत्रण नियमावलीतील क्र. ३३/२ क्रमांने शासकीय, सार्वजनिक संस्था तसेच नोंदणीकृत धर्मदाय ट्रस्टच्या वैद्यकिय इमारतीसाठी शासनाच्या मान्यतेने अतिरिक्त एक वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. मुंबई उपनगरातील अंधेरी ते ठाणे जिल्ह्यातील डहाणू या परिसरात अद्यायावत व सुसज्ज असा दवाखाना / हॉस्पीटलची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे नागरीकांची वैद्यकियदृष्ट्या अत्यंत गैरसोय होत आहे. मिरा भाईंदर शहर हे मुंबई महानगरपालिका क्षेत्रास लागून असून १० लक्ष लोकसंख्याचे वाढते शहर असून मिरा भाईंदर शहरात अद्यायावत व सुसज्ज असे हॉस्पीटल असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सद्यस्थितीत

अनुज्ञेय असलेल्या २.० चटईक्षेत्र निर्देशांक अजुन १.० वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक मिळण्यासाठी काही संस्थांची विनंती आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करता खालील बाबींची पूर्तता करणा-या संस्थांना सद्यस्थितीत अनुज्ञेय असलेल्या २.० चटईक्षेत्र निर्देशांकापेक्षा अजुन वाढीव १.० चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्यात यावा.

१) भूखंडाचे क्षेत्र कमीत कमी ४०००.०० चौ.मी. असावे.

२) असा भूखंड कमी कमी १५.०० मी. रुंदीच्या रस्त्यांवर स्थित असावा.

३) सदर दवाखांना / हॉस्पीटल कमीत कमी २०० खाटांचा आवश्यक आहे.

४) सदर हॉस्पीटल मल्टीस्पेशलीस्ट असणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे तरतूद परिपत्रकाद्वारे ३३/२ मध्ये सामाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ फेरबदल करण्याची कारवाई करण्यात यावी. वरील प्रमाणे फेरबदलाची सर्व वैधानिक कारवाई करण्यासाठी तसेच प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी शासनास सादर करण्यासाठी मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे मौजे, स.क्र. ५०६, ५०७/१पै. मध्ये आ.क्र. १८३ (दवाखाना व प्रसुतिगृह) या जागेतील नियोजित बांधकाम परवानगी मधील अट क्र. ३४ मध्ये सुट देण्याबाबत.

विषयांकित प्रकरणी मंजूर विकास योजनेतील आ.क्र. १८३ (दवाखाना व प्रसुतिगृह) या आरक्षणाचा विकास करण्यासाठी जमीन मालकांस म्हणजेच मे. दी उमराव इंस्टीट्युट ऑफ मेडिकल सायन्स ॲन्ड रिसर्च यांना नियमाप्रमाणे परवानगी देण्यात आली आहे. त्यामध्ये सदर आरक्षण दवाखाना व प्रसुतिगृह यासाठी असल्यामुळे आरक्षणाच्या १०% इतके बांधकाम क्षेत्र दवाखान्यासाठी व रुग्णालयासाठी संख्याच्या एकूण खाटांपैकी १५% खाटा आग्रहाप्रमाणे नगर परिषदसाठी उपलब्ध करुन देण्यात यावे, अशी अट परवानगीमध्ये नमुद करण्यात आली होती.

मंजूर विकास योजनेप्रमाणे सदर आरक्षण दवाखाना व प्रसुतिगृह साठी असून सदर आरक्षणाचे विकासकाचे माध्यमातून सर्वसाधारण जनतेस आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणे हा महत्वाचा उद्देश आहे. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार संस्थेस आरक्षणाचे कारणामुळे ठराविक आकाराचे बांधकाम करुन ते महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन उर्वरीत आरक्षणाचे जागेवर लगतच्या वापर विभागाप्रमाणे रहिवास / वाणिज्य वापर सुध्दा करता येवू शकला असता, तथापी, अर्जदार संस्थेने तसे न करता सदर जागेवर रुग्णालयाचे बांधकाम प्रस्तावित केले असून, सदर संस्थेचा सदर हेतू पाहूनच यापूर्वी शासनाने या ठिकाणी रुग्णालयाचे बांधकामास अनुमती दर्शविली आहे. प्रस्तुत आरक्षणाचे समावेशक आरक्षणाचे माध्यमातून विकासाबाबतची तरतूद नियम क्र. ९, टेबल क्र. ३ मधील अ.क्र. V (I) मध्ये नमुद आहे. त्यातील शेवटची बाब खालीलप्रमाणे आहे.

The Municipal Corporation may hand over the Dispensary & Maternity Home, Community Centre / Hall or Primary Health Centre to a Public Organisation for operation & maintenance of terms decided by it.

मौजे भाईंदर पूर्व, स.क्र. ५०६, ५०७/१पै. मध्ये आ.क्र. १८३ (दवाखाना व प्रसुतिगृह) या जागेतील बांधकाम **"रुग्णालय"** म्हणून झालेले आहे. त्यामुळे शहरात अद्यावत व सुसज्ज दवाखान्याची

सुविधा उपलब्ध झालेली आहे. तसेच समावेशक आरक्षणाचे माध्यमातून आरक्षणाचा विकास जागेवर झालेला असून त्यामध्ये दवाखानाचे क्षेत्र महानगरपालिकेने घेवून चालवणे व्यवहारीक होत नाही.

सदर संस्था ही धर्मदाय नोंदणीकृत असून विरार - वसई ते मिरा भाईंदर क्षेत्रात मोठे रुग्णालय नसलेने मिरा भाईंदर क्षेत्रातील नागरीकांना तातडीचे उपचाराकरिता बोरवली येथे जावे लागते. सदर स्वयंपूर्ण रुग्णालय मिरा रोड येथे होत असलेने आ.क्र. १८३ चे नामनिधान **"रुग्णालय"** असे करावे व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार विहीत कार्यवाही प्रशासनाने करावी. तसेच मुळ मंजूर बांधकाम प्रस्तावातील दवाखाना व प्रसुतिगृहाच्या १०% बांधकाम क्षेत्र हस्तांतरण व १५% राखीव खाटा महानगरपालिकेस ठेवणेची अट रद्द करण्यात येत आहे.

त्यानुसार आयुक्तांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार विकास योजनेत व विकास नियंत्रण नियमावलीतील आवश्यक ते बदल प्रस्तावित करणेस ही महासभा मंजूरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. भगवती शर्मा व अनुमोदक श्री. अनिल सावंत यांनी खालील सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र. २६३ टाउन हॉल व ड्रामा थिएटर करीता आरक्षित आहे. सदर आरक्षण जमीन मालकानी विकसित करण्यासाठी मागणी केली आहे. याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. तथापी शासनाने महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत सदर आरक्षण जमीन मालकाने समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून आरक्षण विकसित करणे संदर्भात तरतूद नसल्याने सदर प्रस्तावाचा सद्यस्थितीत विचार करता येत नाही असे महानगरपालिकेस कळविलेले आहे.

तरी सदर आरक्षण क्र. २६३ समावेश आरक्षणाच्या तरतूदी अन्वये करुन घेण्याकरीता MRTP Act 1966 मधील कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास ही सभा मान्यता देत आहे. मा. आयुक्त यांनी पुढील सर्व कार्यवाही पार पाडून शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. प्रफुल्ल पाटील व अनुमोदक श्री. प्रेमनाथ पाटील यांनी खालील सुचना मांडली.**

गोषवाऱ्यामध्ये नमुद केलेल्या विषयानुसार हॉस्पीटल, शाळा, कॉलेज व धोकादायक / मोडकळीस आलेल्या इमारतीच्या पुर्नविकासासाठी अतिरिक्त ३ चटईक्षेत्र देण्यात यावे. परंतु प्रत्यक्षात वापरात असलेल्या चटईक्षेत्रा व्यतिरिक्त १ चटईक्षेत्रापेक्षा जास्त मंजूर करण्यात येऊ नये. सदरचा ठराव कोणत्याही वैयक्तिक किंवा एका विकास प्रस्तावास मान्य न करता संपूर्ण मिरा भाईंदर क्षेत्रासाठी लागू करण्यात लागू करण्यात यावा.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. शानु गोहिल | १ | श्री. सिंह मदन उदितनारायण | निरंक |
| २ | श्रीम. पाटील उमाताई शाम | २ | सौ. म्हात्रे कल्पना महेश | |
| ३ | श्री. नलावडे दिनेश दगडू | ३ | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | |
| ४ | श्री. वेतोस्कर राजेश शंकर | ४ | श्रीम. बाविधर सिसिलीया विजय | |
| ५ | सौ. सुनिता कैलास पाटील | ५ | सौ. पांडे स्नेहा शैलेश | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | सौ. सावळे निर्मला बाबुराव | ६ | श्री. दुबे रामनारायण सदानंद | |
| ७ | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | ७ | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | |
| ८ | सौ. सुनिता शशिकांत भोईर | ८ | श्री. पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ९ | श्री. पाटील प्रफुल्ल काशीनाथ | ९ | श्री. पाटील अनंत रामचंद्र | |
| १० | श्री. म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | १० | श्री. पालांडे प्रशांत भगवंतराव | |
| ११ | श्रीम. शेख मुसरर्तबानु इब्राहिम | ११ | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | |
| १२ | श्री. जंगम लक्ष्मण गणपत | | | |
| १३ | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | | | |
| १४ | श्री. जुबेर अब्दुल्ला इनामदार | | | |
| १५ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | | | |
| १६ | श्री.वासुदेव भास्कर मुंज | | | |
| १७ | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | | | |
| १८ | श्री. शेख नुर मोहम्मद अेहमद | | | |
| १९ | श्री. शफीक अहमद सादत खान | | | |
| २० | श्री. प्रमोद जयराम सामंत | | | |
| २१ | श्रीम. मर्लिन डिसा | | | |
| २२ | सौ. वैती विजया हेमचंद्र | | | |
| २३ | सौ. ठाकूर कल्पना हरिहर | | | |
| २४ | श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | |
| २५ | श्री. मोदी चद्रकांत भिकालाल | | | |
| २६ | सौ. सरिता चंद्रकांत वैती | | | |
| २७ | श्री. अनिल दिवाकर सावंत | | | |
| २८ | श्री. शेख सलिम दाउद | | | |
| २९ | श्री. हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | |
| ३० | श्री. गणेश गोपाळ शेट्टी | | | |
| ३१ | श्री. पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | | | |
| ३२ | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | | | |
| ३३ | सौ. नयना गजानन म्हात्रे | | | |
| ३४ | सौ. तिवारी दिव्या अशोक | | | |
| ३५ | सौ. वैती नर्मदा यशवंत | | | |
| ३६ | श्री. पाटील जयंत महादेव | | | |
| ३७ | श्री. म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | | | |
| ३८ | श्री. पाटील मिलन गोविंदराव | | | |
| ३९ | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | | | |
| ४० | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | | | |
| ४१ | श्रीम. परेरा कॅटलीन ॲन्थोनी | | | |
| ४२ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | | |
| ४३ | श्री. शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ४४ | श्रीम. चक्रे वंदना रामदास | | | |
| ४५ | श्रीम. माळी हेमा रविंद्र | | | |
| ४६ | श्रीम. हसनाळे ज्योत्स्नाजालींदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | | | |
| ४७ | श्री. परेरा टेरी पॉल | | | |
| ४८ | श्री. मोहन महादेव जाधव | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

(स्वाक्षरी) ५/१/१०

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२०१०

**प्रकरण क्र. ५३ :-** शाळा आरक्षण बी.ओ.टी. वर विकसित करणेकरिता नियमावली ठरविणेबाबत.

**ठराव क्र. ५४ :-**

सदर गोषवारा उशिरा दिलेला असून त्यामध्ये सविस्तर माहिती देण्यात आलेली नाही तरी महापालिकेने एकूण शाळांची किती आरक्षणे बी.ओ.टी. वर दिलेली आहेत व त्यामुळे किती महसूल २००७-०८, २००८-०९ व २००९-१० या वर्षात मिळालेला आहे. याची सविस्तर माहिती देवून पूढील महासभेत सदर विषय घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्री. राजेश वेतोसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.११/०२/२०१०

प्रकरण २ नियम (के) अन्वये

प्रकरण क्र. (५४) - **मिरा भाईंदर शहरासाठी विकास नियंत्रण नियमावलीचे T.D.R. GENERATING SECTOR व T.D.R. RECEIVING SECTOR साठी कलम ३७(१) नुसार विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल प्रस्ताव मा. नगर विकास विभागास पाठविणेस मान्यता देणेबाबत.**

**ठराव क्र. ५५ -**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि.१४/०५/९७ अन्वये व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दि.१५/०७/९७ व दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

सदर विकास नियंत्रण नियमावली T.D.R. GENERATING SECTOR व T.D.R. RECEIVING SECTOR बाबत खालील प्रमाणे मंजूर तरतूद केलेली आहे.

**(१)**

| ORIGINATING ZONE | RECEIVING ZONE |
|---|---|
| I | I |
| II | IV, V-A, VI-A |
| III | IV, VI-A |
| IV | IV, VI |
| V | IV, VI-A |
| V-A | V-A, VI-A |
| VI | VI-A, VI |
| VI-A | VI-A |
| VII-A | VII-A, VII-B |
| VII-B | VII-B |
| VIII | VIII |

त्यानंतर मिरा भाईंदर महानगरपालिकामार्फत शासनास सादर केलेल्या कलम ३७ च्या फेरबदल प्रस्तावास नियम क्र. ३९ मध्ये बदल करुन T.D.R. GENERATING SECTOR व T.D.R. RECEIVING SECTOR बाबत खालीलप्रमाणे तरतूद प्रस्तावित केलेली होती. त्यानुसारचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

(२)

| T.D.R. GENERATING SECTOR | T.D.R. RECEIVING SECTOR |
|---|---|
| I | I |
| II | IV, V, V-A, VI, VI-A |
| III-A | III-A, IV, V, V-A, VI, VI-A |
| III-B | IV, V, V-A, VI, VI-A |
| IV | IV, V, V-A, VI, VI-A |
| V | IV, V, V-A, VI, VI-A |
| V-A | IV, V, V-A, VI, VI-A |
| VI | V, VI, VI-A |
| VI-A | V, VI, VI-A |
| VII-A | VII-A, VII-B |
| VII-B | VII-A, VII-B |
| VIII | VIII |

शासनास सादर केलेल्या तक्ता क्र. २ च्या तरतूदीस शासनाने मान्यता दिलेली नाही. त्यामुळे वरील तक्त्यामध्ये फेरबदल करुन खालीलप्रमाणे नव्याने प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

सेक्टर II चे व IIA व IIB असे दोन भाग केलेले असून IIA हा पूर्णतः Congested असून ब-याच प्रमाणात आरक्षण आहे. तसेच IIB या सेक्टरमध्ये बरीच मोकळी जागा असल्यामुळे व त्याठिकाणी IIA व IIB चा वापर होवू शकतो. त्यामुळे विकासकाचा समतोल साधला जाईल.

SECTOR III मध्ये दोन भाग केलेले असून III-A व III-B असे केलेले आहे, कारण सेक्टर III-B हा एकदम CONGESTED ZONE असून III-A हा मोकळी जागा व नविन डेव्हलपमेंट जास्तीचे असल्यामुळे तिथे टी.डी.आर. वापरणेस परवानगी देण्यात यावी.

SECTOR V मध्ये यापूर्वी RECEIVING SECTOR नसल्यामुळे त्यामध्ये टी.डी.आर. वापरण्यात येत नव्हता. परंतू सदर सेक्टरमध्ये रहिवास विभागात अंतर्गत असलेली जागा बहुतांश खुली आहे. तसेच इतरही इमारतीचे बांधकाम चालू आहे. तरी सदर जागेवर टी.डी.आर. वापरणेस परवानगी मिळावी, जेणेकरुन तिथे चालू असलेल्या व विकसीत होणा-या जागा विकसीत होवू शकतील.

SECTOR VII-A व VII-B करिता यापूर्वी प्रस्तावित केलेल्या RECEIVING SECTOR मध्ये खालील कारणाने फेरफार करणेची आहे.

SECTOR VII-A चे एकुण सेक्टर चे क्षेत्र हे अंदाजे २१०.०० हेक्टर असून VII-B चे विकासनशील क्षेत्र हे अंदाजे ११५.०० हेक्टर आहे, असे एकूण ३२५.०० हेक्टर क्षेत्र हे विकसनशील क्षेत्र आहे. त्यावर अंदाजे वेगवेगळी २३.६८५ हेक्टर क्षेत्राची आरक्षणे प्रस्तावित केलेली आहेत. म्हणजे आरक्षणाव्यतिरिक्त तेथे ३०१.३१५ हेक्टर क्षेत्र रहिवास विभाग व औद्योगिक विभागामध्ये सामाविष्ट आहे.

शासनाचे औद्योगिक झोनचा रहिवास झोनमध्ये बदल शक्य असलेने शासनाचे निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका मधील औद्योगिक झोनमध्ये बहुतांशी ठिकाणी रहिवास विभागात बदल करुन त्यानुसार विकासाचा कल वाढलेला दिसून येत आहे. यामुळे सद्यस्थितीत SECTOR VII-A व VII-B मध्ये III-A व III-B या सेक्टर मधील टी.डी.आर. वापरणेकरिता फेरबदल करणे आवश्यक आहे.

| T.D.R. GENERATING SECTOR | T.D.R. RECEIVING SECTOR |
|---|---|
| I | I |
| II-A | IV, II-B |
| II-B | II-B, IV |
| III-A | III-A, IV, V, V-A, VI, VI-A, VII-A, VII-B |
| III-B | IV, V, V-A, VI, VI-A, VII-A, VII-B |
| IV | IV, V, V-A, VI, VI-A |
| V | IV, V, V-A, VI, VI-A |
| V-A | IV, V, V-A, VI, VI-A |
| VI | V, VI, VI-A |
| VI-A | V, VI, VI-A |
| VII-A | VII-A, VII-B |
| VII-B | VII-A, VII-B |
| VIII | VIII |

तसेच सन २००१ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या ५ लक्ष २० हजार इतकी होती. आता सुमारे १० लक्ष इतकी या शहराची लोकसंख्या आहे. लोकसंख्या वाढीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असल्याने वरीलप्रमाणे सेक्टर निहाय टी.डी.आर. वापरणेस मंजूरी मिळाल्यास शहरात लोकसंख्येचा समतोल साधला जाईल.

तरी वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे मंजूरीसाठी शासनाकडे सादर करावा असा मी मा. महासभेपुढे ठराव मांडत आहे.

सुचक - अनुमोदक -

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२०१०

**दुखवटा ठराव ५६ :-**

आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कर निर्धारक व संकलक श्री. विजय पाटील यांच्या आई कै. सुमन सदानंद पाटील तसेच परिवहन समितीचे स्थायी कर्मचारी श्री. जगदिश म्हात्रे यांचे वडील कै. मुंकुद म्हात्रे तसेच कै. भालचंद्र प्रल्हाद थिटे व कै. जयवंती अनंत पाटील यांचे निधन झाल्याने मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २४/०२/२०१०

**प्रकरण क्र.५५:-** **मिरा भाईंदर महानगरपालिका सदस्यांपैकी एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(२) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे महापौर पदावर निवड करुन नवीन महापौर निवडण्यात येईपर्यंत पद धारण करतील.**

**ठराव क्र. ५७ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(२) मधील तरतुदींनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महापौर पदाकरिता निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस नामनिर्देशन पत्रे मागविली असता एकूण पाच उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती. त्या उमेदवारांची नांवे पुढीलप्रमाणे :-

१) तुळशीदास द. म्हात्रे

२) पाटील प्रेमनाथ गजानन

३) प्रफुल्ल काशिनाथ पाटील

४) प्रविण मोरेश्वर पाटील

५) म्हात्रे कल्पना महेश

महापौर पद हे एकच पद असल्याने, या पदासाठी ५ उमेदवार आहेत. म्हणून सभागृहात पिठासिन अधिकारी यांनी ज्या कोणी उमेदवारांस आपली उमेदवारी मागे घ्यायचीं असल्यास त्यांच्या करिता नियमानुसार नामनिर्देशन पत्र मागे घेण्याकरिता १५ मिनिटांचा अवधी दिला असता १) **श्रीम. म्हात्रे कल्पना महेश, २) श्री. पाटील प्रेमनाथ गजानन व ३) श्री. प्रफुल्ल काशिनाथ पाटील** यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याचा अर्ज पिठासिन अधिकारी यांचेकडे सुपूर्द केला. '' **महापौर** '' पदाच्या निवडणुकीसाठी दोनच उमेदवार शिल्लक राहिले. त्यानंतर उमेदवारांच्या बाजूने ''**हात वर**'' करुन मतदान घेतले असता १) **श्री. तुळशीदास द. म्हात्रे** यांना ६० इतकी मते व २) **श्री. प्रविण मोरेश्वर पाटील** यांना १३ इतकी मते मिळाली. तसेच ०२ सदस्य तटस्थ राहिले.

या दोन्ही उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते **श्री. तुळशीदास द. म्हात्रे** यांना **जास्त मते** मिळाल्याने **श्री. तुळशीदास द. म्हात्रे** हे ''**महापौर**'' पदी बहुमताने निवडून आल्याचे मी जाहीर करीत आहे.

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २४/०२/२०१०

**प्रकरण क्र.५६:-** **मिरा भाईंदर महानगरपालिका सदस्यांपैकी एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(२) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे उपमहापौर पदावर निवड करुन नवीन उपमहापौर निवडण्यात येईपर्यंत पद धारण करतील.**

**ठराव क्र. ५८ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(२) मधील तरतुदींनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उपमहापौर पदाकरिता निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस नामनिर्देशन पत्रे मागविली असता एकूण सहा उमेदवारांनी सात नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती. त्या सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे :-

१) दुबे रामनारायण सदानंद

२) पुरोहित मधुसुदन मनोहरलाल

३) प्रशांत भगवंतराव पालांडे

४) मेन्डोन्सा स्टीवन जॉन

५) मोहन महादेव जाधव

६) शेख आसिफ गुलाब

श्री. शेख आसिफ गुलाब यांच्या सुचक श्रीम. अनिता जयवंत पाटील ह्यांचे नगरसेवकपद रद्द झाल्याने त्यांचे नामनिर्देशन पत्र अवैध ठरविले. उपमहापौर पद हे एकच पद असल्याने, या पदासाठी ५ उमेदवार आहेत. म्हणून सभागृहात कोणत्याही उमेदवारांस आपली उमेदवारी मागे घ्यावयाची आहे त्यांनी १५ मिनिटांत मागे घ्यावी असे घोषित केल्यावर उक्त कालावधीत १) **श्री. पुरोहित मधुसुदन मनोहरलाल २) श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे** व **३) श्री. मोहन महादेव जाधव** यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याचा अर्ज सुपूर्द केला. **''उपमहापौर''** पदाच्या निवडणुकीसाठी दोनच उमेदवार शिल्लक राहिले. त्यानंतर उमेदवारांच्या बाजूने **''हात वर''** करुन मतदान घेतले असता **१) श्री. दुबे रामनारायण सदानंद** यांना **१५** इतकी मते व **२) श्री. मेन्डोन्सा स्टीवन जॉन** यांना **५९** इतकी मते मिळाली. तसेच **०२** सदस्य तटस्थ राहिले.

या दोन्ही उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते **श्री. मेन्डोन्सा स्टीवन जॉन** यांना मिळाल्याने **श्री. मेन्डोन्सा स्टीवन जॉन** हे **''उपमहापौर''** पदी बहुमताने निवडून आल्याचे मी जाहीर करीत आहे.

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०३/२०१०

१०२

अभिनंदन ठराव ५९ :-

मा. शिवमुर्ती नाईक यांनी भिवंडी महापालिकेच्या आयुक्तपदी असतांना २००६-०७ सालात केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल मुख्यमंत्री अशोक चव्हाण, उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ, राज्यमंत्री श्रीम. फौजीया खान व मा. श्री. जे. पी. डांगे मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते राजीव गांधी प्रशासकिय गतीमानता अभियान स्पर्धे अंतर्गत व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले.

भिवंडी महानगरपालिकेत आयुक्त म्हणून असतांना मा. शिवमुर्ती नाईक साहेब यांनी खालिलप्रमाणे उल्लेखनीय कामे केली होती.

१. भिवंडी निजामपुर महानगरपालिका हद्दीत ३२ कि.मी. रस्ता रूंदिकरण केले. सदर रस्ता रुंदीकरण करतांना ४५०० बांधकामे कोणतीही नुकसान भरपाई न देता तोडली.

२. मा. सर्वोच्य न्यायालयात दावा जिंकून महानगरपालिकेचे ३३ कोटी रक्कम वाचविली.

३. ६४ कोटी रक्कमेचे जकातीची ते येण्यापुर्वी मंजुर झालेली व शासनाकडे पाठविलेली निविदा रद्द करून व फेरनिविदा मागवून ९३ कोटीचे कंत्राट देउन महानगरपालिकेचे २९ कोटीने उत्पन्न वाढविले.

४. गैवी नगर शांतीनगर क्षेत्र पाणी पुरवठा योजनेमधून २४ तास पाणी येत होते परंतु शहरात मात्र दिवसातुन १ तास पाणी मिळत होते. यावर उपायुक्त व शहर अभियंता यांना कारवाई वेळी मारहाण झाली होती व महानगरपालिका जाळण्यासाठी २५००० लोकांचा मोर्चा आला होता. त्यानंतर मा. आयुक्तांनी स्वतः महानगरपालिकेचा २५०० कर्मचारी वर्ग घेउन २४ तासात जलवाहिनी बदल करून २४ तास पाणी बंद करून, सकाळी व संध्याकाळी समान पाणी दिले व संपुर्ण शहरास जादा पाणी न वाढवता दोन्ही वेळेस पाणी पुरवठा करून शहरातील पाणी टंचाई दुर केली.

५. भिवंडी शहरालगत असलेली ३.५० कि.मी. लांबीची खाडी ५० फुट रूंद होती ती २०० फुट रूंद केली व खोली वाढविली त्यामुळे दरवर्षी पुरामुळे होणारी वित्त व मनुष्यहानी ३७ इंच एवढा मोठा पाउस होउनही झाली नाही. या उलट कल्याण डोंबिवली महानगरपालिका व ग्रामिण भागात सुद्धा महानगरपालिकेमार्फत स्वच्छता करिता सहकार्य केले.

६. भिवंडी महानगरपालिकेच्या प्रशासकिय इमारतीवर कोणतःही खर्च न करता बी.ओ.टी. तत्वावर विकासकाकडून इमारत बांधून घेउन महानगरपालिकेचे १४ कोटी वाचविले. त्याउलट महानगरपालिकेचा सुमारे ३.३३ कोटी जमा करून घेउन फायदा केला.

७. तसेच बाजार वसुली सुरू करून परवाना शुल्काद्वारे उत्पन्न वाढवून १.०० कोटी रकमेचा फायदा केला.

८. प्रत्येक प्रभागात कम्युनिटी सेंटर बांधले. तलावाचे नुतनीकरण केले.

[illegible]

९. कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या कामाचा मोबदला देण्याबाबतचा दावा जिंकून व यशस्वी वाटाघाटी करून मनपाचे रू. ११ कोटी वाचविले.

१०. भिवंडी महानगरपालिकेच्या नावावर ६७ हेक्टर जमिन करून घेतली.

११. भिवंडी निजामपूर महानगरपालिकेतील अभिलेखाची शिस्तबध्द वर्गवारी करुन घेतली. सर्व जुन्या ६३ वाहनांचा लिलाव करुन त्यातून आलेल्या निधीतून वाहन चालकाच्या पगाराच्या खर्चात पूर्ण बचत करुन भत्त्याचे वाटप व कनिष्ठ थरापर्यंत अधिकारांचे विकेंद्रीकरण केले.

१२. नागरी सुविधा केंद्राची स्थापना, एक खिडकी योजना, प्राथमिक शाळांना संगणक पूरवठा, बीओटी तत्वावर शॉपिंग सेंटर व शौचालये बांधून देखभाल दुरुस्तीसह होणाऱ्या खर्चात कपात केली.

१३. वाचनालये, नाट्यगृह, व्यायामशाळा, आरोग्य केंद्र, रुग्णालये, २३ कब्रस्ताने, १८ स्मशानभूमीची उभारणी केली. वायरलेस सोलर ट्राफीक सिग्नल उभारणी, सोलर स्ट्रीट लाईट, सोलर ब्लीकंर यांचा वापर करुन खर्चात बचत केली.

१४. भिवंडी निजामपूर महानगरपालिकेची पाणी पूरवठा योजना पी.पी.पी. या तत्वावर चालविण्याचे प्रस्तावित करुन सदर योजनेस शासनाची मान्यता प्राप्त झाली. त्यामुळे महानगरपालिकेचे सुमारे ४५० कोटी रक्कम वाचवून शहरात रु. ६.०० प्रति १००० लिटर या दराने पाणी उपलब्ध होईल. तसेच सदर योजना ३० वर्षानंतर महानगरपालिकेकडे हस्तांतर होईल.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेत आयुक्त पदावर कार्यरत असतांना महानगरपालिकेतील रस्ता रूंदीकरण, महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणे, विकास कामे अशी अनेक लोकोपयोगी कामे श्री. शिवमुर्ती नाईक साहेब यांनी केली आहेत. आपल्या कल्पंनेत असलेली जुनी भिवंडीची प्रतिमा डोक्यात ठेवून आपण जर आता भिवंडीला गेलात तर ती भिवंडी कुठे गेली? असे आश्चर्याने म्हणण्याची पाळी आपणांवर येईल. वरील सर्व उपक्रम कल्पकतेने राबविणारे व इतरांनाही या पासुन अंमलबजावणी धडे घेता येईल असा भिवंडीचा कायापालट करणारे भिवंडी निजामपुर महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त मा. श्री. शिवमुर्ती नाईक यांना प्रशस्तीपत्रक देउन राज्य शासनामार्फत गौरविण्यात आले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका श्री. शिवमुर्ती नाईक यांच्या अभिनंदनाचा ठराव मा. सभागृहासमोर मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासिन अधिकारी**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०३/२०१०

प्रकरण क्र. ५७ :- दि. १७/१२/२००८ व दि. १६/०१/२००९ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ६० :-

दि. १७/१२/२००८ व दि. १६/०१/२००९ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- अनुमोदन :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०३/२०१०

**प्रकरण क्र. ५८ :-** **मा. महासभा दि. २९/११/२००८, ठराव क्र. ७३ नुसार महिला व बालकल्याण समितीवर नउ सदस्यांची नेमणूक करणे.**

**ठराव क्र.६१:-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१(१)१(अ) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठित करण्याची तरतूद आहे. दि. २९/११/२००८, ठराव क्र. ७३ ने नउ(९) सदस्यांची महिला व बालकल्याण समिती गठित केलेली होती.

महिला व बालकल्याण समिती समिती गठित केल्याबाबत मा. उच्च न्यायलय रिट याचिका क्र. २७३२३/२००८ दाखल केली होती. ती याचिका उच्च न्यायालयाने दि. ०४/११/२००९ रोजी फेटाळलेली आहे. महिला व बालकल्याण समिती ९ सदस्यांची गठित करणेकरिता आजमितीस असलेल्या सदस्य संख्येवरुन १) सयुक्त लोकशाही आघाडी - ०५, २) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - ०२, ३) भारतीय जनता पक्ष - ०१ व ४) शिवसेना – ०१ तौलानिक संख्या निश्चित करण्यात येत आहे. त्यानुसार खालील प्रमाणे नउ महिला सदस्यांची नावे महिला व बालकल्याण समितीवर नामनिर्देशित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पक्षाचे/आघाडीचे नाव |
|---|---|---|
| १. | श्रीम. सय्यद नुरजहॉं नजर हुसैन | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | सौ. उमा श्याम पाटील | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | सौ. सुनिता कैलाश पाटील | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | श्रीम. मुसर्रतबानो इब्राहीम शेख | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ५. | श्रीम. कांचन शेखर पुजारी | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ६. | श्रीम. नर्मदा यशवंत वैती | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ७. | सौ. कॅटलीन एंथोनी परेरा | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ८. | सौ. मिरादेवी रामलाल यादव | भारतीय जनता पार्टी |
| ९. | श्रीम. मंदाकिनी आत्माराम गावंड | शिवसेना |

महापौर तथा पिठासिन अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०३/२०१०

**प्रकरण क्रमांक ( ६० ) भाईंदर (पूर्व) येथे स्काय वॉकच्या आखणी मध्ये बदल करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**ठराव क्रमांक ( ६३ )**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पूर्व) येथे रेल्वे समांतर स्काय वॉक बांधणे कामी मा. महासभा दि. १८/०९/२००८ ठराव क्र. ३७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सदर कामी निविदा मागविण्यात आली होती. तथापी सदर स्काय वॉकचे कॉलम हे रेल्वे कुंपणभिंतीत घेण्यास रेल्वे प्रशासनाने परवानगी दिलेली नाही व रेल्वे समांतर केबिन रोडवर कॉलम घेतल्यास वाहतूकीस अडथळा होईल. परंतू नवघर रोड वरील वाहतूकीचा ताण पहाता सदर ठिकाणी स्काय वॉक बांधल्यास वाहतूकीस अडथळा होणार असल्याने सदर ठिकाणी स्काय वॉक बांधण्यात येउ नये. असा मी ठराव मांडत आहे. व इतर ठिकाणी योग्य जागा शोधून पुनःश्च ता निर्णय आणावा

**सुचक :-** **अनुमोदन :-**

**ठराव सर्वानूमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**पिठासन अधिकारी**

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०३/२०१०

**प्रकरण क्रमांक ( ६० ) भाईदर (पूर्व) येथे स्काय वॉकच्या आखणी मध्ये बदल करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**ठराव क्रमांक ( ६३ )**

मिरा भाईदर महानगरपालिका हद्दीत भाईदर (पूर्व) येथे रेल्वे समांतर स्काय वॉक बांधणे कामी मा. महासभा दि. १८/०९/२००८ ठराव क्र. ३७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सदर कामी निविदा मागविण्यात आली होती. तथापी सदर स्काय वॉकचे कॉलम हे रेल्वे कुंपणभिंतीत घेण्यास रेल्वे प्रशासनाने परवानगी दिलेली नाही व रेल्वे समांतर केबिन रोडवर कॉलम घेतल्यास वाहतूकीस अडथळा होईल. परंतू नवघर रोड वरील वाहतूकीचा ताण पहाता सदर ठिकाणी स्काय वॉक बांधल्यास वाहतूकीस अडथळा होणार असल्याने सदर ठिकाणी स्काय वॉक बांधण्यात येउु नये. असा मी ठराव मांडत आहे. व इतर ठिकाणी योग्य जागा शोधून पुनःश्च हा विषय आणावा.

सुचक : [signature]

अनुमोदन :- [signature]

ठराव सर्वानूमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला.

[signature]
पिठासन अधिकारी

# मिरा-भाईदर महानगरपालिका

१०८

## मा.महासभा दि. २०/०३/२०१०

**प्रकरण क्रमांक ( ६१ )** :- महाराष्ट्रातील नागरीक स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्यक्षेत्रात नागरी पायाभूत व सामाजिक सुविधांच्या बळकटीकरणासाठी " महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान" मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीत राबविणे बाबत.

**ठराव क्रमांक ( ६४ )** :-

महाराष्ट्र राज्यातील काही शहरामध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी केंद्र शासनाचा JNNURM अभियान राबविण्यात येत असून त्याचधरतीवर " महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान" या नावाखाली सर्व समावेशक अभियान राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

" महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान" अंतर्गत खालील पायाभूत सुविधांचा विकास करण्याचे आहे.

१) नागरी दळणवळणाचे साधनांचा विकास या अंतर्गत नागरी रस्ते व पूल, उड्डाणपूल, ROBs/RUBs पर्जन्य जलवाहिन्या, नागरी परीवहन व्यवस्था, Traffic Signalling System , वाहनतळ इत्यादींचा समावेश आहे.

२) घनकचरा व्यवस्थापन :- नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० च्या अनुशंगाने आवश्यक त्या पायाभूत सुविधा विकसित करणे व उपाययोजना करणे.

३) नागरी रस्त्यावरील पथदिव्यामध्ये उर्जा बचतीच्या योजना राबविणे. तसेच नागरी भागात सौर उर्जावर आधारीत पथदिवे बसविणे.

४) नागरी भागात विहीतमानकानुसार सामाजिक सोयी व सुविधांचा विकास करणे.

५) नागरी तिर्थ क्षेत्रांचा सुनियोजीत विकास करणे.

६) गिरीस्थानांचा सुनियोजीत विकास करणे.

७) नागरी भागातील सार्वजनिक पुरातत्वन वास्तूचे जतन तसेच नागरी भागात उदयान, तलाव, नैसर्गिक जल स्त्रोत यांच्या संबधित विकास करणे.

८) पाणिपुरवठा, मल:निस्सारण व नागरी स्वच्छता या क्षेत्रात शासनाच्या मानांकाप्रमाणे पायाभूत सुविधा विकसित करणे किंवा त्यांचा दर्जा वाढ करणे.

९) शालेय शिक्षणाशी निगडीत पायाभूत सुविधांचा विकास करणे.

१०) नागरी आरोग्याशी निगडीत पायाभूत सुविधांचा विकास करणे.

११) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी आवास योजना राबवून गलिच्छ वस्ती मुक्त शहरे निर्माण करणे. या कार्यक्रमात नागरी क्षेत्रात वाढत्या गलिच्छ वस्त्यांचा प्रश्न

सोडविण्याकरीता आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरबाधणी कार्यक्रम हाती घेणे.

१२) नागरी क्षेत्रात पर्यावरणात सुधारणा घडवून आणणे यासाठी उपायायोजना करणे.

या अभियाअंतर्गत सहभाग घेण्यासाठी शहराचा पुढील २० वर्षाचा विकास लक्षात घेवून शहर विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे असे नमूद केलेले आहे. त्याप्रमाणे मिरा-भाईंदर शहराचा विकास आराखडा तयार करण्यात आलेला आहे. "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान" सहभागी होण्यासाठी संबधित स्थानिक स्वराज्य संस्थेने म्हणजेच महानगरपालिकेने शासना बरोबर सामंजस्याचा लेखी करार करून शासनाने विहित केलेल्या सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी कालबध्द कार्यक्रम मान्य करणे बंधनकारक असून व याबाबत ठराव करणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्प मान्यता व संनियत्रंण समितीच्या मान्यतेनंतर शासनस्तरावर प्रचलित कार्यनियमावलीनुसार प्रकल्पांना अंतिम मान्यता देण्यात येणार असून मंजूर प्रकल्पांना पुढे विशद केल्यानुसार अर्थसहाय्य, अनुदान व कर्ज या स्वरूपात टप्प्याटप्प्याने कामाच्या प्रगती नुसार रक्कम उपलब्ध होणार आहे.

अ) जे प्रकल्प पुर्णतः सार्वजनिक – खाजगी - सहभाग तत्वावर राबविता येतील. त्यांसाठी कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्याची आवश्यकता भासणार नाही.

ब) जे प्रकल्प केवळ सार्वजनिक – खाजगी - सहभाग या तत्वावर पुर्णतः राबविण्यात येणार नाहीत व ज्यांच्यासाठी काही प्रमाणात Viability Gap Funding साठी अर्थसहाय्य लागेल. त्यास ५० % शासकिय अनुदान (वर्धन क्षमता तफावतीच्या रकमेपैकी) व २० % MUIDCL / MMRDA मार्फत कर्ज

क) सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर आधारीत नसलेल्या प्रकल्पांसाठी ५० % शासकिय अनुदान व ५० % MUIDCL / MMRDA मार्फत कर्ज उपलब्ध होवू शकेल.

या महाअभियाना अंतर्गत कर्ज स्वरूपातील रकमा MUIDCL / MMRDA मधून घेता येणार आहेत. या अभियाना अंतर्गत घ्यावयाच्या प्रकल्पास प्रशासकिय मंजूरी देवून त्यासाठी अनुदानाचा हिस्सा मंजूर करून त्याकरीता कर्जाचा हिस्सा मंजूर करण्यासाठी संबधित विभागामार्फत प्रस्ताव MUIDCL MMRDA कडे पाठविण्यात येणार असून सदरीचे कर्ज मंजूर झाल्यानंतर अनुदानाच्या रकमेचे वितरण संबधित मंत्रालय विभागामार्फत करण्यात येणार असून कर्जाचे वितरण MUIDCL / MMRDA मार्फत करण्यात येईल. मंजूर प्रकल्पांना अनुज्ञेय शासनाचे अनुदान दोन टप्प्यात मंजूर करण्यात येणार असून अनुदानाचा ५० % भाग प्रकल्प मंजूरीनंतर वितरीत होणार असून उर्वरीत ५० % अनुदान प्रथम टप्प्याच्या अनुदाच्या ७० % रक्कम खर्च झाल्यावर उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर वितरीत करण्यात येणार आहे. नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत हाती घ्यावयाच्या नगरविकास विभागाच्या पायाभूत सुविधाशी निगडीत प्रकल्पाकरीता शासन स्तरावरून अनुदानाचा हिस्सा उपलब्ध करून देण्यासाठी नगरविकास विभागाच्या स्तरावर स्वतंत्र "लेखाशिर्ष" उघडून त्याअंतर्गत दरवर्षी नियतव्ययाच्या उपलब्धतेनुसार तरतूद करण्यात येणार आहे.

सदर अभियान राबविण्याकरीता मंत्रालय स्तरावर आयुक्त तथा संचालक, नगरपरीषद संचनालय येथे एक स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद संचानालय हे या महाअभियानाचे राज्यस्तरीय नोडल एजन्सी म्हणून काम पाहणार आहेत.

[illegible]

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने JNNURM अंतर्गत शहर विकास आराखडा तयार केलेला आहे. सदर शहर विकास आराखडयास राज्य व केंद्र शासनाची मान्यता प्राप्त आहे. सदर शहर विकास आराखडयात आवश्यक बदल करुन सदर शहर विकास आराखडा "महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियान" योजनेकरीता सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर योजनेंतर्गत केंद्र शासनाने निधि अभावी परत पाठविलेले व राज्य शासनाच्या सुकाणू समितीने मंजूरी दिलेले खालील सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानांतर्गत आवश्यक ते बदल करुन शासनाकडे पाठविण्यास तसेच इतर खालील सविस्तर प्रकल्प अहवालास व सदर सविस्तर प्रकल्प अहवालाच्या खर्चास देखिल ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | एकात्मिक नाला प्रकल्प | रु.२८९.०० कोटी |
| २) | एकात्मिक रस्ते प्रकल्प (रिंग रुट, विकास आराखडयातील रस्ते.) | रु.२००.०० कोटी |
| ३) | मार्केट इमारती बांधकाम | रु. २५.०० कोटी |
| ४) | मैदाने / उदयाने तलाव विकसीत करणे | रु. २५.०० कोटी |
| ५) | जैसल पार्क येथे सबवे बांधणे. | रु. ४५.०० कोटी |
| ६) | ई-गव्हर्नस | रु. १०.०० कोटी |
| ७) | अग्निशमन केंद्र उभारणे | रु. १५.०० कोटी |
| ८) | कॉंक्रीट रस्ते | रु. ३०.०० कोटी |
| ९) | घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प | रु. ७५.०० कोटी |

सदर महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानातंर्गत राज्य शासनाने शासन निर्णयात नमूद केल्यानूसार महानगरपालिकेस लागणारी रक्कम उभी करण्यास व आवश्यक ते कर्ज उभारण्यास तसेच सदर योजनेंतर्गत राज्य शासनाने ज्या प्रमुख सुधारणांचा अंगीकार करण्यास बंधनकारक केले आहे. त्या सुधारणांचा (Reforms) अंगीकार करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यकती सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. लक्ष्मण जंगम** **अनुमोदन :- भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०३/२०१०

**प्रकरण क्र. ६२ :- संगणक चालक व लघुलेखक यांना महानगरपालिका आस्थापनेवर नेमणुक करणे बाबत.**

**ठराव क्र.** ६५ **:-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यांत आलेला आहे. संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृत्तांत तयार करणेकामी लघुलेखकाची आवश्यकता असल्याने मा. महासभा दि. २०/०६/२००६ ठराव क्र. २९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणूक करण्यांत आलेली आहे. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकेमार्फत त्यांना वेळोवेळी मुदत वाढ देण्यांत आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील नागरी सुविधा केंद्र तसेच सर्व विभागातील संगणकावर काम करणारे संगणक चालक व लघुलेखक हे सर्वही मिरा भाईंदर शहरातील स्थानिक रहीवासी असून गेली अनेक वर्षे ते महानगरपालिकेत निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करुन आपली सेवा देत आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अपुरा कर्मचारी वर्ग व वाढत्या कामाची व्याप्ती लक्षात घेता मानधनावरील कार्यरत संगणक चालक व लघुलेखक यांची मा. महासभा दि. २०/११/२००९ ठराव क्र. ३२ नुसार त्यांना ११ महिन्यांची मुदतवाढ देण्यांत आली होती. तथापि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) अन्वये ६ महिन्यांची मुदतवाढ देण्याची तरतुद असल्याने सदर ठरावानुसार पहील्या ६ महिन्यांची मुदतवाढ ३०/०४/२०१० रोजी संपत असून त्यानंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देउन पुढील सहा महीन्यांच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यांत येत आहे. याबाबत शासनास नवी मुंबई महानगरपालिकेने जा.क्र.नमुंमनपा/प्रशा/आस्था-५/८९३/२०१० दि. ०२/०३/२०१० प्रमाणे केलेल्या कार्यवाही बाबत अवगत करावे.

वरील प्रमाणे संगणकचालक व लघुलेखक यांना देण्यांत आलेली मुदतवाढीची मुदत संपण्यापूर्वी प्रशासनाने शासन निर्णय क्र. आरईएम-१५९०/प्र.क्र.५८/२००९/१३ दि. १४/०१/२०१० च्यां आधारे मा. आयुक्त सो. यांचेकडील आदेश क्र. जा.क्र.मनपा/आस्था/३६८२/०९-१० दि. २४/०२/२०१० अन्वये त्यांना कार्यमुक्त करण्यांत आले. सदर शासन निर्णयाचा मसुदा वाचता हा निर्णय शासन सेवेतुन निवृत्त झालेल्या व पुन्हा सेवेत सामावुन घेतलेल्या तसेच निवृत्त होत असलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देउन सेवेत रुजु ठेवलेल्या व कराराव्दारे नियुक्त केलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना लागु होत आहे. सदर निर्णय वरील संगणक चालक व लघुलेखक यांना लागू होत नसुन त्यांना बेकायदेशीररित्या कार्यमुक्त केले असल्याने सदरचा मा. आयुक्तांनी दि. २४/०२/२०१० रोजी पारीत केलेला आदेश रद्द करण्यांत यावा.

तसेच यासर्वही संगणकचालक व लघुलेखक यांचा संगणकचालक कम लिपीक/ माहिती नोंदणीकार व लघुलेखक असा पदनिर्मीतीचा प्रस्ताव नव्याने तयार करुन तातडीने शासनाकडे पद मंजूरीसाठी पाठविण्यांत यावा. तसेच सदर पदनिर्मीतीच्या प्रस्तावास शासनाकडुन मंजूरी मिळाल्यानंतर सर्वप्रथम महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ठोक मानधनावर कार्यरत असणाऱ्या या सर्वही संगणकचालक कम लिपीक/ माहिती नोंदणीकार व लघुलेखक यांना महानगरपालिका सेवेत सामावून घेण्यांत यावे, असा ठराव मी मांडत आहे. तसेच प्रशासनाने तातडीने या ठरावाची अंमलबजावणी करावी.

**सुचक :- श्री. आसिफ शेख** | **अनुमोदन :- श्री. प्रफुल्ल पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०३/२०१०

**प्रकरण क्र. ६३ :-** सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांचे दिनांक १५/०३/२०१० रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.

---

समान दराने कर आकारणी करणेच्या ठरावास मुदतवाढ देणेबाबत.

ठराव क्र. :- ६६

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील एकाच इमारतीमधील सदनिका / दुकाने यांना वेगवेगळ्या दराने कर आकारणी झालेली होती. करिता एकाच इमारतीमधील सदनिका / दुकाने यांना समान दराने कर आकारणी करणेबाबत मा. महासभा दि. १८/०४/२००६, ठराव क्र. १४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तरी अजुनही बऱ्याच जुन्या इमारतींना समान दराने कर आकारणी झालेली नाही. वास्तविक पाहता पारित झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने आजपावेतो सर्व जुन्या इमारतींना समान दराने कर आकारणी होणे अपेक्षीत होते.

ज्या जुन्या इमारतींना समान दराने कर आकारणी झालेली नाही त्या सर्व इमारतींना माहे सप्टेंबर २०१० अखेर पर्यंत समान दराने कर आकारणी करणेत यावी असा मी ठराव मांडीत आहे.

सुचक :- श्री. मिलन पाटील    अनुमोदन :- श्री. आसिफ शेख

**ठराव सर्वानुमते मंजुर**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मुदतीत देखभाल दुरुस्ती करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ३१/०३/२०१०



**प्रकरण क्र. ६४ :-** मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००९-१० चे सुधारित व २०१०-११ चे मुळ "अ" + "क" + "अंध व अपंग" + "महिला बालकल्याण" + "JNNURM" + "P" अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ११/०३/२०१० नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १४८, ठराव क्र. ११८)

**ठराव क्र. :-** ६८

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००९-१० चे सुधारीत व सन २०१०-११ च्या मुळ अंदाजपत्रकाबाबतचे विवरणपत्र, अहवाल, मा. स्थायी समिती ठराव क्र. ११८, दि. ११/०३/२०१० विचारात घेवून सविस्तर चर्चा करुन मा. सदस्यांच्या सुचनेनुसार व आवश्यक त्या दुरुस्तीसह सन २००९-२०१० चे सुधारीत व सन २०१०-२०११ चे रक्कम रु. ११ लक्ष शिल्लकेचे मुळ अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजुरी देत आहे. शासनाकडील मिळणारे अनुदान पाच वर्षापर्यंत टप्प्याटप्प्याने मिळत होते ते बंद झाल्याने त्यानंतर मनपा स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मनपा स्वयंपूर्ण व्हावी यास्तव कर/दर वाढ करण्यात आल्याने वाढीव कर/दराचे उत्पन्नास शासनाची मंजूरी घेण्यात यावी.

**सन २००९-१० चे सुधारित अंदाज व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक** आकडे लाखात

| तपशिल | २००९-१० (सुधारीत अंदाज) | २०१०-११ (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अंदाजपत्रक "अ"+"ब"+"क"+"वृक्षप्राधिकरण"+"महिला व बालकल्याण"+ "JNNURM"+"P" एकूण जमा | ५१५६९.८६ | ५८३५५.८७ |
| अंदाजपत्रक "अ"+"ब"+"क"+"वृक्षप्राधिकरण"+"महिला व बालकल्याण"+ "JNNURM"+"P" एकूण खर्च | ४८६४८.१५ | ५८३४४.८७ |
| अखेरची शिल्लक | २९२१.७१ | ११.०० |

सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदक :- श्री. एस. ए. खान

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. एस. ए. खान व अनुमोदक श्रीम. शानु गोहिल यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

दि. ३१/०३/२०१० रोजी होणाऱ्या अर्थसंकल्पीय महासभेमध्ये मी अशी सुचना मांडतो की, मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे सन २००७-०८ ते २००९-१० या वर्षात पालिका हद्दीतील सृष्टी कॉम्प्लेक्स, शांती नगर, जेसल पार्क या वसाहतीतील रहिवाश्यांना चुकीच्या पध्दतीने लावण्यांत येणारा विशेष स्वच्छता कर १३% ऐवजी ६% दराने लावण्यांत यावा व सन २०१०-२०११ पासून ८% दराने लावण्यांत यावा आणि १३% लावलेला विशेष स्वच्छता कर रद्द करण्यांत यावा.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. भगवती शर्मा व अनुमोदक श्री. लक्ष्मण जंगम यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मंजूर केलेल्या सन २००९-२०१० या वर्षाच्या अर्थसंकल्पातील १) प्रभाग समिती निधी, २) नविन फायर फायटर खरेदी, ३) संगणक प्रणाली / नेटवर्कींग सुरु करणे, संगणक हार्डवेअर्स साहित्य खरेदी व इतर आवश्यक कामे ४) कल्वर्ट बांधकाम / भुयारी मार्ग तसेच JNNURM लेखाशिर्षाखाली जमा असलेली रक्कम ३१ मार्च २०१० रोजी खर्च न पडणारी रक्कम, १) नविन रस्ते बांधकाम २) नविन गटारे / नाले बांधकाम, ३) डी.पी. रोड बांधकाम, ४) रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा, ५) इंडस्ट्रीयल मधील रस्ते / गटारे सुधारणा, ६) सर्व धर्मीय उत्सव या लेखाशिर्षाखाली वर्ग करुन सर्व प्रलंबित देयके ३१ मार्च २०१० पूर्वी प्रदान करण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेने सन २०१०-२०११ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा या लेखाशिर्षाखाली केलेल्या तरतुदीनुसार वार्षिक दराची विभागवार निविदा मागविण्यास व खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या सौ. प्रभात पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

महिला व बालकल्याण अंदाजपत्रकात महिला भवन निर्मितीसाठी ठराविक (अंदाजित) रक्कमेची तरतुद करण्यात यावी अशी मी सुचना मांडीत आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विद्यार्थ्यांना I.A.S. / I.P.S. / M.P.S.C. या स्पर्धात्मक परिक्षांची तयारी करण्याकरीता शहरातील खाजगी संस्थेच्या सहकार्याने प्रशिक्षण संस्था / केंद्र महानगरपालिकेमार्फत चालु करण्याकरीता अर्थसंकल्पात रु. २०.०० लाख एवढी तरतूद करण्यात यावी.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

जे मालमत्ता करात भाडे तत्वावर ३७% दिले आहेत, त्यामध्ये १६% द्यावे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग | १ | मेहता नरेंद्र लालचंद्र | १) पाटील उमाताई शाम |
| २ | नलावडे दिनेश दगडू | २ | वर्षा गिरधर भानुशाली | २) शशिकांत जगन्नाथ भोईर |
| ३ | वेतोस्कर राजेश शंकर | ३ | भोईर राजु यशवंत | ३) पाटील प्रफुल्ल काशीनाथ |
| ४ | सुनिता कैलास पाटील | ४ | जाधव मोहन महादेव | ४) पाटील प्रेमनाथ गजानन |
| ५ | पाटील प्रभात प्रकाश | ५ | सिंह मदन उदितनारायण | ५) मिलन वसंत म्हात्रे |
| ६ | सावळे निर्मला बाबुराव | ६ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ७ | कुरेशी याकुब ईस्माईल | ७ | पाटील शरद केशव | |
| ८ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | ८ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | |
| ९ | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | ९ | बाविघर सिसिलीया विजय | |
| १० | जंगम लक्ष्मण गणपत | १० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | |
| ११ | सपार उमा विश्वनाथ | ११ | दुबे रामनारायण सदानंद | |
| १२ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | १२ | यादव मिरादेवी रामलाल | |
| १३ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | १३ | प्रविण मोरश्वर पाटील | |
| १४ | श्री.वासुदेव भास्कर मुंज | १४ | पाटील अनंत रामचंद्र | |
| १५ | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | १५ | श्री.पालांडे प्रशांत भगवंतराव | |
| १६ | शफीक अहमद सादत खान | १६ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| १७ | प्रमोद जयराम सामंत | १७ | म्हात्रे मोहन गोपाळ | |
| १८ | मर्लिन मर्विन डिसा | १८ | गणेश गोपाळ शेट्टी | |
| १९ | वैती विजया हेमचंद्र | १९ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | |
| २० | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | २० | व्यास सुधा वासुदेव | |
| २१ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | |
| २२ | मोदी चंद्रकांत भिकालाल | | | |
| २३ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | | | |
| २४ | भट दिप्ती शेखर | | | |
| २५ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २६ | शेख सलिम दाउद | | | |
| २७ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | |
| २८ | नयना गजानन म्हात्रे | | | |
| २९ | तिवारी दिव्या अशोक | | | |
| ३० | वैती नर्मदा यशवंत | | | |
| ३१ | पाटील जयंत महादेव | | | |
| ३२ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | | | |
| ३३ | पाटील मिलन गोविंदराव | | | |
| ३४ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | |
| ३५ | शेख आसिफ गुलाब | | | |
| ३६ | गोविंद हेलन जॉर्जी | | | |
| ३७ | डिमेलो बर्नड आल्बर्ट | | | |
| ३८ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | | | |
| ३९ | मेन्डोंसा स्टिवन जॉन | | | |
| ४० | शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ४१ | पाटील वंदना मंगेश | | | |
| ४२ | चक्रे वंदना रामदास | | | |
| ४३ | माळी हेमा रविंद्र | | | |
| ४४ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | | | |
| ४५ | परेरा टेरी पॉल | | | |

ठराव बहुमताने मंजुर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ३१/०३/२०१०

115

**प्रकरण क्र. ६५ :-** मिरा भाईदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००९-१० चे सुधारित व २०१०-११ चे मुळ "B" अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ११/०३/२०१० नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १४९, ठराव क्र. ११९)

**ठराव क्र. :-** ६८

मिरा भाईदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००९-१० सुधारीत व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. ११९, दि. ११/०३/२०१० विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००९-२०१० चे सुधारीत व सन २०१०-२०११ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मनपाकडील मंजुर अनुदान त्रैमासिक चार हप्त्यामध्ये वितरीत करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

आकडे लाखात

| तपशिल | २००९-१० (सुधारीत अंदाज) | २०१०-११ (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 1433.33 | 2571.90 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तांतरण | 225.00 | 233.30 |
| एकूण खर्च | 1647.00 | 2803.10 |
| शिल्लक | 11.33 | 2.10 |

सुचक :- श्री. भगवती शर्मा　　　　अनुमोदक :- श्री. एस. ए. खान

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ३१/०३/२०१०

**प्रकरण क्र. ६६ :-** मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणाचे सन २००९-१० चे सुधारित व २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ११/०३/२०१० नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १५०, ठराव क्र. १२०)

**ठराव क्र. :-** ७०

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००९-१० सुधारीत व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १२०, दि. ११/०३/२०१० विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००९-२०१० चे सुधारीत व सन २०१०-२०११ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे.

**आकडे लाखात**

| तपशिल | २००९-१० (सुधारीत अंदाज) | २०१०-११ (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | १९०.०० | २०४.०० |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तांतरण | १३७.०० | १४८.५० |
| एकूण खर्च | ३२६.०० | ३५१.५० |
| शिल्लक | १.०० | १.०० |

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

वृक्षप्राधिकरण अंदाजपत्रकात अद्यावत मध्यवर्ती गार्डनसाठी जागा व निधी यासाठी प्रोव्हीजन करण्यात यावी अशी मी सुचना मांडीत आहे.

**ठराव सुचनेसहित सर्वानुमते मंजुर**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका